CMYK

विनम्र अभिवादन



आचार्य विनोबा भावे यांची आज जयंती

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ११ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक ३१२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com




# अमित शहांकडे मुख्यमंत्रीपद मागितल्याचे वृत्त अजितदादांनी फेटाळले

## ▌अमित शहा यांच्याबरोबर मुख्यमंत्रीपदावर चर्चा नाही

## ▌मैत्रीपूर्ण लढतीबाबतच्याही वृत्तात अर्थ नसल्याचा दावा

**वृत्तसंस्था,**
**मुंबई, १० सप्टेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची मागणी केल्याचे वृत्त फ`टाळले आहे. मी अमित शहा यांची मुंबई विमानतळावर भेट घेतली. पण आमच्यात महायुतीमध्ये मैत्रीपूर्ण लढती आणि मुख्यमंत्रीपदाच्या मुद्यावर कोणतीही चर्चा झाली नाही. यासंबंधी एका इंग्रजी दैनिकाने दिलेले वृत्त निखालस खोटे आहे, मैत्रीपूर्ण लढतीला काहीही अर्थ नसतो, असेही अजित पवार वृत्तवाहिनीला प्रतिक्रिया देताना म्हणाले आहेत.

अजित पवार पुढे म्हणाले की, महायुतीच्या घटकपक्षांमध्ये २८८ पैकी काही जागांवर मतैक्य ठरले आहे. इतर जागावाटपावर अजून काही ठरलेले नाही, पण जसे जागावाटप फायनल होईल तशी माहिती मी आपल्याला देईन. पण माझे मत असे आहे की, अशा मैत्रीपूर्ण लढतीना कोणताही अर्थ नसतो. आम्ही आघाडीत असतानाही अशी निवडणूक कधी लढली नाही, असे त्यांनी माध्यमांना म्हटले आहे. मैत्रीपूर्ण लढत होणार आणि त्या सर्व थापा आहेत, असे काहीच होणार नाही. आम्ही सर्व जण बैठक घेऊन २८८ जागापैंकी महायुतीमधील कुठल्या कुठल्या पक्षाला द्यायच्या हे काही ठरले आहे, काही बाकी आहे. हे जेव्हा आमचे ठरेल तेव्हा मी यासंदर्भात माहिती देईल. महायुतीच्या योजना लोकांपर्यंत जास्तीत जास्त पोहचवणे हे आमचे लक्ष आहे, त्यादृष्टीने आम्ही काम करत आहोत. भाजप आणि शिवसेनेच्या जाहिरातीवर तुमचा फोटो नाही या प्रश्नावर बोलताना अजित पवार म्हणाले की, भाजप आणि एकनाथ शिंदे यांना मीच माझा फोटो तुमच्या जाहिरातीमध्ये लावू नका, माझे फोटो सगळीकडे फारच झाले थोडे कमी करावे म्हणून असे सांगितल्याचे म्हणत त्यांनी विषय टाळला. लाडकी बहिण योजना ही महायुतीची योजना आहे, त्यामुळे घटक पक्ष आपआपल्या परिने मत मांडण्याचा प्रयत्न करणार आणि ते महायुती म्हणून मांडणार, असेही पवार म्हणाले.



### शेतकऱ्यांच्या विषयावर चर्चा

अजित पवार म्हणाले की, राज्यात कापूस, सोयाबिनचा प्रश्न महत्त्वाचा आहे. सध्या आपल्याला कांदा निर्यात बंदी होऊ द्यायची नाही. शेतकऱ्यांना दोन पैसे त्यातून मिळत असतील तर मे मिळायला हवे अशा विषयावर माझी अमित शहा यांच्यासोबत चर्चा झाली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्र दौऱ्यावर आले असता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांची मुंबई विमानतळावर भेट घेतली. यावेळी या दोन्ही नेत्यांमध्ये जागा वाटपाच्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा झाली. या बैठकीत अजित पवार यांनी उघडपणे आपल्या मनातील मुख्यमंत्री पदाची मागणी अमित शहा यांच्याकडे केल्याचे देखील वृत्त आहे. राज्यांमध्ये देखील बिहार पॅटर्न राबवा आणि मुख्यमंत्री म्हणून माझे नाव घोषित करा, अशी मागणी त्यांनी अमित शहा यांच्याकडे केली असल्याची दावा एका इंग्रजी दैनिकाच्या माध्यमातून करण्यात आल्यानंतर राज्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

## आज महालक्ष्मी पूजन



## ▶▶ महत्त्वाचे...

### अपात्रता सुनावणीचा मुहूर्त पुन्हा लांबला

**नवी दिल्ली :** शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदार अपात्रता प्रकरणावरील सुनावणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात होणार होती. मात्र, संबंधित न्यायासनापुढे सुचीबद्ध असलेल्या पहिल्याच प्रकरणी दीर्घकाळ सुनावणी चालल्याने आज यावर सुनावणी होऊ शकली नाही. आता या प्रकरणी १८ सप्टेंबर रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे. दोन्ही पक्षांच्या आमदार अपात्रता प्रकरणी एकत्र सुनावणी घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाने ठरविले होते. यावर आजची तारीख देण्यात आली होती. यापूर्वीही या प्रकरणावरील सुनावणी वेळेच्या अभावामुळे लांबणीवर पडली होती.

### जयदीप आपटेच्या पोलीस कोठडीत वाढ

**सावंतवाडी :** मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे व बांधकाम रचना सल्लागार डॉ. चेतन पाटील यांची पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्याने आज दुपारी पुन्हा मालवण न्यायालयात हजर करण्यात आले. यामध्ये जयदीप आपटे याला दि. १३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी तर पाटील याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पाटील याची सावंतवाडी कारागृहात रवानगी करण्यात येणार आहे. राजकोट किल्ला येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी घडली होती. याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पुतळ्याचा ठेकेदार जयदीप आपटे, तांत्रिक सल्लागार चेतन पाटील या दोघांविरुद्ध विविध कलमान्वये येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# मनोज जरांगे-पाटील यांचे १७ तारखेपासून पुन्हा उपोषण

**वृत्तसंस्था,**
**जालना, १० सप्टेंबर**

मराठा आरक्षणासाठी १६ सप्टेंबर मध्यरात्री १२ वाजेपासून म्हणजे १७ सप्टेंबरपासून पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसण्याची घोषणा केली आहे. आम्हाला संपवण्याचा प्रयत्न होत आहे, पण मी मराठ्यांसाठी झुंज देण्याचा निर्धार केला आहे. माझी शहीद होण्याचीही तयारी आहे. त्यानुसार मी १७ तारखेपासून उपोषणाला बसणार आहे, असे जरांगे म्हणाले आहेत.



मनोज जरांगे यांनी गत महिन्यात २९ सप्टेंबरपासून उपोषणाला बसण्याची घोषणा केली होती. पण त्यांनी मंगळवारी आंतरवाली सराटीत पत्रकारांशी संवाद साधताना अचानक मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनापासून म्हणजे १७ सप्टेंबरपासून पुन्हा उपोषणाला बसण्याची घोषणा केली. त्यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी लावून धरली आहे. मी मराठ्यांसाठी झुंजणार आहे. तुम्ही आम्हाला संपवण्यासाठी झुंजा. मराठे मोठे न होण्यासाठी झुंजा. महाराष्ट्रातील सर्वच मराठा आमदारांना आमच्याविरोधात झुंजण्यास लावा. तुम्ही आमच्याविरोधात कितीही सापळे लावले, कट कारस्थान रचले, तरी मी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. मी शहीद होण्यास तयार आहे. तुम्हाला काय षडयंत्र करायचे आहेत ते करा. माझा लढा समाजासाठी आहे. मला माझा समाज मोठा करायचा आहे. इतरांना त्यांचा पक्ष मोठा करायचा आहे. आम्ही अंदाजानुसार २९ सप्टेंबर ही तारीख ठरवली होती. पण आता मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनापासूनच उपोषण सुरू करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. सरकार सगेसोयरेची अंमलबजावणी केव्हा करणार? हैदराबाद, सातारा संस्थान व बॉम्बे गव्हर्नमेंटचे गॅझेट केव्हा लागू करणार? मराठा आंदोलकांवरील गुन्हे केव्हा मागे घेणार? अशा विविध प्रश्नांची सरबत्तीही जरांगे यांनी यावेळी महायुती सरकारवर केली.

### अब्दुल सत्तार, मुंडेंनी नुकतीच घेतली होती भेट

उल्लेखनीय बाब म्हणजे गत २-३ दिवसांत आंतरवाली सराटीत मोठ्या घडामोडी घडल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी त्यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांचा निरोप घेऊन ते मुख्यमंत्र्यांना भेटले. त्यानंतर कृषिमंत्री धनंजय मुंडे हे सुद्धा आंतरवाली सराटीत दाखल झाले. त्यांच्यात नेमकी कोणती सल्लामसलत झाली हे समजले नाही. पण आता जरांगे यांनी पुन्हा उपोषणाला बसण्याची घोषणा करून ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी महायुतीच्या अडचणींत वाढ केली.


# गृहमंत्री असूनही काश्मीरला गेल्यावर घाबरलो होतो

## सुशीलकुमार शिंदेंच्या वक्तव्यावरून भाजपाचा काँग्रेसवर हल्लाबोल

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, १० सप्टेंबर**

त्यावेळी मी जरी देशाचा गृहमंत्री होतो, तरी जम्मू काश्मीरमधील परिस्थिती एवढी खराब होती की गृहमंत्री म्हणून काश्मीरला जाताना मी घाबरलो होतो... हे वक्तव्य आहे तत्कालीन गृहमंत्री व काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांचे.

त्यांच्या विधानामुळे भाजपाच्या हाती आयतेच कोलीत मिळाले असून त्यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे. सुशीलकुमार शिंदे यांच्या या एका वाक्यामुळे काँग्रेस पक्ष अडचणीत आला आहे. सुशीलकुमार शिंदे यांनी लिहिलेल्या 'फाईव्ह डिकेडस इन पॉलिटिक्स' या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे उपस्थित होते. त्यांच्यासमोरच सुशीलकुमार शिंदे यांनी गृहमंत्री म्हणून काश्मीरमध्ये जाताना घाबरलो होतो, असे काँग्रेसला अडचणीत आणणारे वक्तव्य केले आहे. मी गृहमंत्री असताना व काश्मीर दौऱ्यावर जाण्याआधी विजय धर यांच्याकडे जाऊन त्यांचा सल्ला घेतला होता. त्यांनी मला सल्ला दिला की, सुशील, इकडे तिकडे भटकू नकोस. तू लाल चौकात जा आणि तिथे भाषण कर. काही लोकांना भेट आणि डल झील फिरायला जा... त्या सल्ल्यानुसार मी दौरा केला आणि मला खूप प्रसिद्धी मिळाली. लोकांमध्ये संदेश गेला की, असा गृहमंत्री आहे जो न घाबरता जातो, पण मी अक्षरशः घाबरलो होतो. पण मी कोणाला सांगू शकत नव्हतो. येथे मी हे तुम्हाला फक्त हसवायला सांगितले, असेही शिंदे म्हणाले. सुशीलकुमार शिंदे यांनी एका वाक्यात तत्कालीन संपुआ सरकारच्या धोरणाच्या चिंध्या उडविल्यानंतर भाजपाला काँग्रेसला ठोकायची चांगली संधीच मिळाली. जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्यापूर्वी काश्मीर खोऱ्यात काय परिस्थिती होती हे सुशीलकुमार शिंदे यांच्या वक्तव्यातून स्पष्ट होते. शिंदे यांच्या वक्तव्याकडे काँग्रेसने लक्ष द्यावे, असा टोला भाजपा प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी मारला. जम्मू-काश्मीरमध्ये आता दहशतवाद आणि फुटीरतावादाचे कंबरडे मोडले आहे. आज लाल किल्ल्यापासूल लाल चौकापर्यंत देशाचा तिरंगा फडकतोय. दहशतवाद आणि दगडफेकीत प्रचंड घट झाली आहे. जिथे आधी गोळ्या झाडल्या जायच्या, आता तिथेच क्रिकेट खेळले जाते. त्यांच्या काळात गृहमंत्री जायला घाबरत होते. आता तर त्यांचे युवराज आणि त्यांची बहीण तेथे जाऊन बर्फाचा आनंद लुटून आले आहेत, याचीही भाजपाने आठवण करून दिली.



# के-५ क्षेपणास्त्राची लवकरच चाचणी

**नवी दिल्ली, १० सप्टेंबर**

चीन आणि पाकिस्तानकडून असलेला संभाव्य धोका ओळखून भारत सातत्याने नवीन आणि अत्याधुनिक क्षेपणास्त्रांच्या चाचण्या करीत आहे. जमिनीवरून तसेच लढाऊ विमानांद्वारे मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या चाचण्या घेतल्यानंतर संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात् डीआरडीओ आता पाणबुडीमधून सहजपणे मारा करू शकणाऱ्या के-५ क्षेपणास्त्राच्या चाचणीची तयारी करीत आहे.

भारतीय नौदलाच्या ताफ्यात असलेल्या क्षेपणास्त्रांना अद्ययावत करण्याच्या दिशेने डीआरडीओने पावले उचलली आहेत. यात के मालिकेतील क्षेपणास्त्राची आता भर पडणार आहे. के-५ असे या क्षेपणास्त्राचे नाव असून, ते अण्वस्त्रांनी सज्ज राहणार आहे. पाणबुडीतून अचूक मारा करणे शक्य व्हावे, यासाठी त्यात काही अत्याधुनिक उपकरणे जोडली जात आहेत. विशेष म्हणजे, आत्मनिर्भर भारत अभियानाचा भाग म्हणून हे क्षेपणास्त्र देशातच विकसित केले जात आहे. यावर दोन हजार किलोग्रॅम वजनाचे वॉरहेड बसविले जाणार आहे. पाच ते सहा हजार किलोमीटरपर्यंत मारा करण्याची त्याची क्षमता राहणार असल्याचे डीआरडीओच्या सूत्रांनी सांगितले. तथापि, हलक्या वॉरहेडसह ते आठ ते नऊ हजार किमीपर्यंत अचूक मारा करू शकणार आहे.



# विधानसभेसाठी भाजपाची व्यवस्थापन समिती

## ▌रावसाहेब दानवे पाटील यांनी दिली माहिती

## ▌राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार स्थापनेचा निर्धार


**मुंबई, १० सप्टेंबर**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रदेश भाजपातर्फे व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आल्याची माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री व या समितीचे अध्यक्ष रावसाहेब पाटील दानवे यांनी मंगळवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रपरिषदेत ते बोलत होते.

या समितीमध्ये तीन सहसंयोजक, विविध स्तरांवरच्या समित्यांचे प्रमुख तसेच विशेष आमंत्रित आणि पदसिद्ध सदस्यांचा समावेश आहे. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन करण्याच्या निर्धाराने पक्ष कार्यकर्ते सज्ज झाले असल्याचे दानवे यांनी नमूद केले.

दानवे म्हणाले की, बूथपर्यंतची यंत्रणा सक्षम करण्यासाठी पक्षातर्फे ही व्यवस्थापन समिती तयार करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीचे नियोजन, संचलन करण्यासाठी प्रदेश, जिल्हा, तालुका स्तरावर अधिवेशने झाली आहेत. विधानसभा निवडणूक व्यवस्थापन समिती अंतर्गत विविध स्तरांवर समित्या गठित करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे, अनुसूचित जाती राष्ट्रीय महामंत्री अशोक नेते, आ. श्रीकांत भारतीय यांची सहसंयोजक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.





विशेष आमंत्रित म्हणून केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे, माजी मंत्री गणेश नाईक, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहिर यांची नियुक्ती करण्यात आल्याचे दानवे यांनी नमूद केले. पदसिद्ध सदस्य म्हणून आ. रणधीर सावरकर, विक्रांत पाटील, माधवी नाईक, विजय चौधरी आणि संजय केनेकर काम पाहणार आहेत.

### विविध समित्यांचे प्रमुख खालीलप्रमाणे...

जाहीरनामा समिती - वन व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार विशेष संपर्क, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सामाजिक संपर्क - राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, महिला संपर्क -राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर, कृषी क्षेत्र संपर्क- खा. अशोक चव्हाण, लाभार्थी संपर्क -महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, युवा संपर्क -केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, प्रचार यंत्रणा संपर्क-– सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, सहकार क्षेत्र संपर्क - विधान परिषद गटनेते प्रवीण दरेकर, मीडिया- आ. अतुल भातखळकर, ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संपर्क- केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, अनुसूचित जाती संपर्क- माजी आमदार भाई गिरकर, अनुसूचित जमाती संपर्क- आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, सोशल मीडिया- आ. निरंजन डावखरे, निवडणूक आयोग संपर्क- विश्वास पाठक, तसेच महायुती निवडणूक अभियान समन्वयक म्हणून ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन काम पाहणार आहेत.

# मविआला १५४ जागा, तर महायुतीला १२८ जागा

**मुंबई, १० सप्टेंबर**

लोकपोलनं त्यांच्या एक्स अकाऊंटवर शेअर केलेल्या सर्व्हेच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला १४१ ते १५४ तर सत्ताधारी महायुतीला ११५ ते १२८ जागा मिळू शकतील. अपक्ष व इतर छोट्या पक्षांच्या मिळून ५ ते १८ जागा महाराष्ट्रात जिंकून येऊ शकतात. या आकडेवारीनुसार राज्यात महाविकास आघाडीला सत्तास्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ जुळवण्यात यश मिळू शकेल, असे निष्कर्ष वर्तविल्याने राजकीय चर्चा रंगल्या आहेत.

## 'लोकपोल'नं सर्व्हेच्या निष्कर्षांचे आकडे केले जाहीर!

महाराष्ट्रातील एकूण आकडेवारीप्रमाणेच विभागनिहाय आकडेही या अंदाजामध्ये वर्तवण्यात आले आहेत. त्यानुसार, विदर्भातल्या ६२ जागांपैकी महायुतीला १५ ते २०, मविआला ४० ते ४५ तर इतर १ ते ५ असं वर्गीकरण असू शकेल. उत्तर महाराष्ट्रातील ४७ जागांपैकी महायुतीला २० ते २५, मविआलाही तेवढ्याच म्हणजे २० ते २५ व इतर ० ते २ जागा निवडून येऊ शकतात. ठाणे-कोकणमधील एकूण ३९ जागांपैकी महायुतीला २५ ते ३०, मविआला ५ ते १० तर इतर १ ते ३ आमदार निवडून येऊ शकतात. या सर्व्हेतील अंदाजांनुसार, मुंबईतल्या ३६ मतदारसंघांपैकी १० ते १५ आमदार महायुतीचे, २० ते २५ आमदार मविआचे तर ० ते १ आमदार इतर पक्षांचे येऊ शकतात. पश्चिम महाराष्ट्रातील ५८ मतदारसंघांमध्ये महायुतीचे २० ते २५, मविआचे ३० ते ३५ तर १ ते ५ इतर आमदार येतील असा अंदाज आहे. तर मराठवाडा विभागातील ४६ मतदारसंघांपैकी १५ ते २० महायुतीचे, २५ ते ३० मविआचे तर ० ते २ इतर पक्षीय आमदार निवडून येण्याची शक्यता आहे. राजकीय मुद्द्यांवर सर्वेक्षण, अंदाज, मतचाचणी अशा विविध गोष्टींवर काम करणाऱ्या लोकपोलनं केलेल्या सर्व्हेचे निष्कर्ष जाहीर करण्यात आले आहेत. लोकपोलनं त्यांच्या अधिकृत एक्स अकाऊंटवर हे निष्कर्ष जाहीर केले आहेत.

**कसा करण्यात आला सर्व्हे?**

लोकपोलनं या निष्कर्षांबरोबरच हा सर्व्हे नेमका कसा करण्यात आला होता? याची माहिती दिलेली आहे. त्यानुसार, प्रत्येक विधानसभा मतदारसंघामधून ५०० मतदार अशा प्रकारे राज्यभरातील मतदारसंघातून जवळपास दीड लाख मतदारांचा या सर्व्हेमध्ये समावेश करण्यात आला होता. मतदार निवडण्यासाठी प्रत्येक मतदारसंघातील ३० मतदान केंद्रं निवडण्यात आली. २० ते ३० ऑगस्ट या १० दिवसांमध्ये हा सर्व्हे करण्यात आला. राज्यभरातल्या एकूण आकडेवारीप्रमाणेच महाराष्ट्रात विभागनिहाय निकाल कसा दिसू शकेल, याचाही अंदाज या सर्व्हेमध्ये वर्तवण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### गुरुवर्य झपके जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत भोसले, इंगोले प्रथम

**सांगोला, दि.१० सप्टेंबर-**

कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या ४३ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये ज्युनिअर कॉलेज गटामध्ये आदित्य भोसले प्रथम, ऐश्वर्या कोळेकर द्वितीय, राजकन्या भडकवाड तृतीय, सृष्टी लिगाडे चौथा, वेदिका टकले पाचवा तर आठवी ते दहावी गटामध्ये वैष्णवी इंगोले प्रथम, वर्षा गावडे द्वितीय, आशिष पाटील तृतीय, समृद्धी माळी चौथा, साक्षी बाबर पाचवा क्रमांक असे यश संपादन केले. पात्रता फेरी व अंतिम फेरी या स्वरूपात ही स्पर्धा झाली. यशस्वी विद्यार्थ्यांचा रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व झपके कुटुंबीयांकडून सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य विश्वेश झपके, हरिदास रणदिवे, प्रा. तुकाराम मस्के, सोमनाथ ढोले, डॉ. सचिन लादे, दीपक इरकल, सुनील जगताप, फारूक काझी, पतंगराव बाबर, बापूसो भंडगे, प्रसाद लोखंडे, राजेश्वरी कोरे-महिमकर, सरला खाडे-शिर्के, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. प्रास्ताविक अमोल गायकवाड यांनी तर निवेदन प्रा. धनाजी चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन उन्मेश आटपाडीकर यांनी तर आभार शहिदा सय्यद यांनी मानले.



### लोकसेवा विद्यालयाच्या आदर्श कोल्हे याची राज्यस्तरीय विज्ञान मेळाव्यासाठी निवड

**बार्शी, दि. १० सप्टेंबर-**

आगळगाव येथील लोकसेवा विद्यालयातील विद्यार्थी आदर्श विजय कोल्हे याची अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यासाठी निवड झाली आहे. यापूर्वी तालुका, जिल्हा व विभाग स्तरावरती कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावरील विज्ञान वक्तृत्व स्पर्धेत त्याने नंबर मिळवला आहे. विज्ञान शिक्षिका एम पी नाईकनवरे यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, जॉईन्ट सेक्रेटरी अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, अध्यक्ष डी. एम. मोहिते, अध्यक्ष प्रफुल्ल ओमन, मुख्याध्यापिका ए. पी. जोगदंड, सरपंच पुतळाताई गरड व ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन केले.



### वळसंगच्या श्री चन्नय्या स्वामी मठात गुरुवारी धार्मिक कार्यक्रम

**वळसंग, दि. १० सप्टेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री चन्नय्या स्वामी मठात श्रावणमासनिमित्त महिनाभर सुरु असलेल्या कार्यक्रमाची गुरुवारी १२ सप्टेंबर रोजी सांगता होणार आहे. पहाटे ५ वाजल्यापासून श्री चन्नय्या स्वामी यांच्या मूर्ती लघुरुद्राभिषेक, नगारी व शंखनाद, स्वामींचे नामस्मरण, आरती, सांब सदा शिव, सांब सदा शिव या भजनावर पारंपारिक नृत्य सादर केले जाणार आहे. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या ७ लाख निधीतून वॉल कंपाऊंडचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या मठाची खीर व कर्णीकाई खारा (ईडलिंबू चटणी) प्रसाद प्रसिद्ध आहे. भक्तांकडून महाप्रसादाचे वाटप होणार असल्याचे अध्यक्ष मल्लिनाथ बाबानगरे यांनी सांगितले. विधिवत पूजा पुजारी नागय्या स्वामी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी उपाध्यक्ष अनिल शहापुरे, सचिव चंद्रशेखर केशट्टी, श्रीशैल भैरामडगी, बसवराज किणगी, शिवानंद घोडके, शिवबसप्पा कलशेट्टी, सोमशेखर केशट्टी उपस्थित होते.

### चोपडी ग्रामस्थांच्या तक्रारीची सांगोल्याचे आ. शहाजीबापू पाटील यांनी घेतली दखल

**सांगोला, दि. १० सप्टेंबर-**



चोपडी ग्रामस्थांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेत आ. शहाजीबापू पाटील यांनी तोडगा काढला. यामुळे समाधान व्यक्त करण्यात येत आहे. आ. शहाजीबापू पाटील हे चोपडी येथे एका कार्यक्रमासाठी गेले असता ग्रामस्थांनी त्यांच्याकडे तक्रारी मांडल्या. त्यामध्ये नाझरे येथे पोलीस औटपोस्ट असून याठिकाणी पोलीस अधिकारी व कर्मचारी केव्हातरी उपस्थित असतात. या पोलीस औटपोस्ट कार्यक्षेत्रात परिसरातील दहा ते बारा गावचा समावेश आहे. या भागात सध्या हवेत उडणारे ड्रोन व चोरट्यांचा धुमाकूळ सुरू असून या ठिकाणच्या पोलिस अधिकारी,कर्मचाऱ्याकडून याबाबत कोणतीही दखल घेतली जात नाही अशा तक्रारी या भागातील नागरिकांनी आ. शहाजीबापू पाटील यांच्याकडे केल्या. या तक्रारीची दखल घेऊन आ. शहाजीबापू पाटील यांनी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांना नाझरा येथे पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांना उपस्थित राहण्याच्या सूचना कराव्यात व जनतेला दिलासा द्यावा अशा प्रकारच्या सूचना दिल्या.

# शासनाच्या मदतीवर डबल डल्ला

**महसूल विभागाचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर, पैसे परत करण्याचे तहसीलदारांनी शेतकऱ्यांना काढले पत्र**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १० सप्टेंबर-**

माढा तालुक्यात महसूल विभागाचा अंधाधुंद कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून सन २०२२ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे तलाठी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मर्जीतील शेतकऱ्यांचे डबल पंचनामे करून नुकसान दाखवले आणि शासनाच्या मदतीवर डबल डल्ला मारला. यात शासनाच्या लाखो रुपयांची फसवणूक झाली आहे. ही बाब उघड झाल्याने डबल नुकसान भरपाई आलेल्या शेतकऱ्यांनी पैसे परत भरावेत, असे पत्र माढ्याच्या तहसीलदारांनी काढले आहे.

माढा तालुक्यात सन २०२२ मध्ये अतिवृष्टी झाल्याने शेती पिकाचे खूप नुकसान झाले होते. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी म्हणून शासनाने तात्काळ निर्णय दिला होता. त्या निर्णयाच्या आधारे महसूल विभागाचे तलाठी व कर्मचाऱ्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे काटेकोरपणे पंचनामे करून एक प्रकारे कडक व शिस्तप्रिय कर्मचारी असल्याचे भासवून झालेल्या नुकसानीपेक्षा कमी नुकसान दाखवून शेतकऱ्यांवर एक प्रकारे अन्याय केला होता. परंतु नंतर याच शिस्तप्रिय, कडक तलाठी व महसुलच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या मर्जीतील शेतकऱ्यांना डबल नुकसान भरपाई मिळवून देतो म्हणून मोठ्या प्रमाणात आर्थिक तोडी करून शेतकऱ्यांच्या पिकांचे दुसऱ्यांदा पंचनामे केल्याने काही मर्जीतील शेतकऱ्यांच्या खात्यावर लाखो रुपयांचे दुसऱ्यांदा अनुदान जमा झाले होते. या दुसऱ्यांदा जमा झालेल्या अनुदानातील विशिष्ट रक्कम महसूल कर्मचाऱ्यांनी घेतली असल्याचे शेतकरी बोलू लागले आहेत. अशाप्रकारे लाखो रुपयाची शासनाची फसवणूक त्यांच्याच कर्मचाऱ्यांनी केल्याचे उघड झाले आहे.

> **दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार का?**
>
> ज्या शेतकऱ्यांच्या नावावर डबल नुकसान भरपाई जमा झाली आहे असे शेतकरी जादा आलेली रक्कम परत भरतील, न भरणाऱ्यांच्या उताऱ्यावर बोजा चडवण्यात येतील. परंतु जाणून-बुजून चुकीचे पंचनामे करून शासनाचे लाखो रुपयाची रक्कम दिशाभूल करून शेतकऱ्यांच्या नावावर पाठवून मोठ्या प्रमाणात आर्थिक तोडी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार का? की वरिष्ठ अधिकारी अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणार याची उत्सुकता जनतेला लागून राहिली आहे.



ज्या महसूल कर्मचाऱ्यांवर नुकसान भरपाई झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करण्याचे जबाबदारी दिली त्याच कर्मचाऱ्यांनी शासनाची मोठी फसवणूक करून आपल्या मर्जीतील शेतकऱ्यांना वाढीव लाखो रुपयाची नुकसान भरपाई मिळवून दिली व त्या बदल्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक थोडी केल्याचे शेतकऱ्यातून बोलले जात आहे. म्हणजे कुंपणानेच शेत खाल्ले म्हणण्याची वेळ आली आहे. पण चोरी करणारा कितीही हुशार असला तरी एक ना एक दिवस सापडतोच याप्रमाणे सन २०२२ मधील नुकसान भरपाईचे जिल्हाधिकारी कार्यालयात ऑडिट चालू असताना एकाच शेतकऱ्यांच्या खात्यावर डबल नुकसान भरपाई गेली आहे, असे माढा तालुक्यातील अनेक शेतकरी दिसून आल्याने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांनी तात्काळ तहसीलदार यांना डबल गेलेल्या अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांकडून वसूल करावी असे पत्रक काढले. या पत्राच्या आधारे तहसीलदारांनी डबल नुकसान भरपाई गेलेल्या शेतकऱ्यांना पत्र काढून डबल आलेली रक्कम तात्काळ परत भरावी, अन्यथा आपल्या सातबारा उताऱ्यावर भोजा चडवण्यात येईल असे पत्र काढल्याने एकच खळबळ उडाली आहे.

# धनगर आरक्षणाचा मुख्य अडसर शरद पवारच

**माऊली हळणवर : उपोषणाचा दुसरा दिवस; सरकारकडून अद्याप दखल नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १० सप्टेंबर-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत दिलेले एसटी आरक्षण धनगर समाजाला गेल्या ७० वर्षांपासून मिळेल नाही. त्यासाठी धनगर समाजातील अनेक नेतृत्वांनी आरक्षणाची चळवळ तेवत ठेवली. रस्त्यावरील आंदोलनाबरोबर न्यायालयीन लढाईसुद्धा सुरू आहे. अनेकवेळा अनेक आंदोलन झाली. अनेक मोर्चे झाले. परंतु प्रस्थापित व्यवस्थेने आपले वाडे उद्ध्वस्त होतील म्हणून जाणीवपूर्वक समाजाला झुलवत ठेवले. या प्रस्थापितांमध्ये शरद पवार यांचा पहिला नंबर असून तेच आडफाटा घालत आहेत, असा आरोप उपोषणकर्ते माऊली हळणवर यांनी केला.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अमंलबजावणीसाठी पंढरपूर येथील टिळक स्मारक येथे दीपक बोऱ्हाडे, माऊली हळणवर, गणेश केसकर, योगेश धरमे, विजय तमनर आणि यशवंत गायके अशा सहा जणांनी आमरण उपोषण सुरु केले असून याचा दुसरा दिवस आहे. सरकारकडून अद्याप कोणतीही दखल घेतली नाही. जिल्हाधिकारी, तहसीलदार किंवा अन्य यंत्रणेतील कोणीही अधिकारी आंदोलनाकडे फिरकला नसल्याने समाज आक्रमक झाल्याचे दिसून आले. आदोलनांचे राज्य समन्वयक ॲड. विजय गोफणे म्हणाले की, विधानसभेला पश्चिम महाराष्ट्रासह महाराष्ट्रात ८० मतदारसंघात धनगर समाजाचे निर्णायक प्राबल्य असताना लोकसंख्येप्रमाणे लोकप्रतिनिधी मिळाले नाहीत.




> बुधवारी दुपारी ३ वाजता राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे संयोजक व भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय संयोजक वामन मेश्राम हे उपोषणकर्त्यांची विचारपूस करण्यासाठी व आदिवासी धनगर आरक्षण अंमलबजावणी आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी येत आहेत. समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.
>
> **- पांडुरंग मेरगळ, राज्य समन्वयक**

धनगरांना एसटी आरक्षण मिळालं तर पहिल्यांदा बारामती, माळशिरस, सांगोला, माण, खटाव, पंढरपूर, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, मोहोळ याप्रमाणे राज्यातील अनेक मतदारसंघातून पवार-पाटलांची सत्ता जाईल. आमदारकी जाईल या हेतूने शरद पवारांनी ही खेळी खेळली होती. त्यामुळे धनगर समाजाचे वाटोळं झालं. तसेच बारामती येथे झालेल्या आंदोलनात तात्कालिक विरोधी पक्ष नेते व सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिखित शब्द देऊनसुद्धा शब्द पाळला नाही. देवेंद्र फडणवीस हे सुद्धा गेल्या दहा वर्षांपासून धनगर समाजाला वंचित ठेवण्यामागे तेवढेच जबाबदार आहेत.

**पंढरपुरात डेंग्यू, चिकन गुनियासदृश्य आजारांचे दीडशेहून अधिक रुग्ण**

पंढरपूर शहर व तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणावर डेंग्यू आणि चिकन गुनियासदृश्य साथ सुरू आहे. सुमारे १५० हून अधिक रुग्णांवर शासकीय व विविध खासगी रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत असे असताना आंदोलन स्थळी नगरपालिका प्रशासनाने काळजी घेणे गरजेचे असताना स्टेजच्या खाली दोन दिवसांपासून पाणी साठलेले असून यामध्ये मोठ्या प्रमाणात डास आहेत. डास होऊ नये यासाठी तिथे स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. परंतु नगरपालिका याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते.डास निर्मूलनासाठी उपाययोजना न केल्यास उपोषणकर्त्यांना डेंग्यूसारखा आजार होऊ शकतो. त्यामुळे जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

# प्रस्थापित नेतृत्त्वाकडून स्व:ताचाच विकास

**ॲड. मीनलताई साठे : श्रीपूर येथील जनसंवाद यात्रेत लगावला टोला**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १० सप्टेंबर-**



३० वर्षांपासून तालुक्याचे प्रस्थास्थित नेतृत्त्वाचे अपयश असून त्यांनी तालुक्याच्या विकासापेक्षा स्वतःच्याच विकासाला प्राधान्य दिले, असा उपरोधिक टोला माढ्याच्या नगराध्यक्षा ॲड. मीनलताई साठे यांनी लगावला.

श्रीपूर (ता. माळशिरस) येथे जनसंवाद यात्रेप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी माढ्याच्या उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, नगसेविका रेश्माताई सुधीर लंकेश्वर, निर्मला थोरात, श्रीपूरच्या जया आठवले, अरुण कदम, विकास साठे, नितीन साठे, समाधान लटके उपस्थित होते. रथासह ॲड. साठे यांचे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आले. मिलिंद कुलकर्णी यांनी श्रीपूरमध्ये गेल्या कित्येक वर्षापासून एसटी स्टँड नसल्याने प्रवाशांची विशेषतः महिलांची गैरसोय होत आहे. महाळुंग गटातील १४ गावेही विकासापासून वंचित असल्याचे सांगितले. यावर मीनलताई साठे यांनी प्रस्थापित नेतृत्व या १४ नव्हे तर पूर्ण तालुक्यात कोठेच मुलभूत सुविधाही पुरवू शकले नाहीत, असे सांगितले.

> **विकासासाठी कटिबद्ध**
>
> भविष्यात माढा मतदारसंघात विकासकामे करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. खरे तर निवडणूक प्रचारावेळीच उमेदवार आपल्याकडे येतो. परंतु मी त्या आधी मतदारांच्या अडीअडचणी जाणून घेत आहे. यातून मतदारांशी संवाद होऊन अडीअडचणी समजू शकतात. येणाऱ्या विधानसभेसाठी माझी उमेदवारी असणार आहे. मी आपणास खात्रीने सांगते की आपल्या मनात असणारा विकास करण्यास मी कटिबद्ध आहे, असे ॲड. साठे यांनी सांगितले. याप्रसंगी उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

# आ. समाधान आवताडेंनी केली सलगरकरांच्या पाण्याची व्यवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१० सप्टेंबर-**

ऐन पावसाळ्यात महिनाभरापासून गावात पिण्यासाठी पाणी विकत घ्यावे लागत आहे. सार्वजनिक पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून याला जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी अशी मागणी सलगर बुद्रुक येथील महिलांनी आ. आवताडे यांच्याकडे केली होती. त्यानंतर त्यांनी अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावून पाणी उपलब्ध करुन दिले.

आ. आवताडे यांनी भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा विभाग व ग्रामविकास अधिकाऱ्यांना नागरिकांसमोर उभे केले आणि झाडाझडती घेतली. दोन दिवसात गावात पाणी नाही आल्यास होणाऱ्या कारवाईस आपण स्वतः जबाबदार असणार आहात असे आक्रमकरित्या अधिकाऱ्यांना सांगितल्यावर दुसऱ्याच दिवशी गावात भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा विभागाकडून सार्वजनिक नळाला पाणी सोडण्यात आले.

> कंट्रोल पॅनलचा एबी स्विच खराब झाल्यामुळे पाणीपुरवठा बंद होता. त्यासाठी ४० हजार रुपये खर्च होता. शिवाय माझी नियुक्ती आठ दिवसांच्या अगोदरच या भागात झाली आहे. तरीही आमदारांच्या आदेशानंतर रात्रभर काम करून लगेचच १२ तासांच्या आतच ग्रामस्थांना पाण्याची व्यवस्था केली आहे. इथून पुढे अखंडित पाणीपुरवठा सुरू राहिल. ग्रामपंचायतीने पाणीपट्टी भरून सहकार्य करावे.
>
> **- प्रसाद काटकर,**
> उपविभागीय अधिकारी,
> ग्रामीण पाणीपुरवठा,
> मंगळवेढा विभाग

# पैलवानांना स्वामींच्या प्रसादरुपी किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० सप्टेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब कुस्तीगिरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत न्यासाकडून सप्टेंबर महिन्यातील ६६ कीटचे वाटप मंगळवारी करण्यात आले.

तालुक्यातील जे पैलवान कुस्ती सरावासाठी कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर या ठिकाणी आहेत, अशा कुस्तीगिरांसाठी न्यासाकडून गेल्या मकर संक्रांतीच्या दिवशी हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. प्रारंभी ५० जणांना कीट देण्यात आले होते. गेली ३७ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे कार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या कार्यास झळाळी प्राप्त झाली आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने याचा समावेश आहे. तालुक्यातील ८८ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै. मौला शेख बादोला, पै. महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, सौरभ मोरे, अभियंता अमित थोरात, निखिल पाटील, बाळासाहेब पोळ, गोटू माने, प्रवीण घाटगे, बालाजी कटारे, संजय गोंडाळ, एस. के. स्वामी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



> **दरमहा राबविला जातो उपक्रम**
>
> 'प्रसादरुपी खुराक मानांकन चाचणी कुस्ती स्पर्धा-२०२४' चे फतेसिंह क्रिडांगण, इनडोअर स्टेडियम येथे थाटात शुभारंभ करण्यात आला होता. ही तालुक्यात प्रथमच मॅटवरील कुस्ती स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेतील विजेते वजनी गटातील तीन असे प्रथम, द्वितीय व तृतीय मानांकित ६६ पैलवानांसह दरमहा कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसादरुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी लाभापासून अद्याप वंचित


**पिलीव परिसरातील प्रकार; शासन, प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० सप्टेंबर-**

सर्वसामान्य, गोरगरीब महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण ही महत्त्वकांक्षी योजना आहे. या योजनेद्वारे महिलांना प्रत्येक महिन्याला प्रत्येकी दीड हजार रुपयांचा लाभ होणार आहे. महिलेने सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन तो फॉर्म महाई-सेवा केंद्रात ऑनलाईन भरुनही मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींना अद्याप लाभ मिळाला नाही.

लाडक्या बहिणींनी भरलेला फॉर्म अंगणवाडी सेविकांना द्यायचा अशी याची प्रक्रिया आहे. अनेक महिलांनी जुलै, ऑगस्ट महिन्यात फॉर्म भरून सर्व प्रक्रिया रितसर केली आहे. यामध्ये फॉर्म भरताना महिलेला ॲप्लिकेशन इज सक्सेसफुली सबमिटेड असा मेसेज आला. नंतर काही दिवसानंतर सदरच्या महिलेला युवर ॲप्लिकेशन इज ॲप्रोव्हल असाही मेसेज आला. यामध्ये शासनाने सुरुवातीला सदरच्या लाभार्थी महिलेने जर सदरचा फॉर्म जुलैऐवजी ऑगष्ट महिन्यात जरी भरला तरीही त्या महिलेला दोन महिन्यांचे तीन हजार रुपये खात्यावर जमा केले जाणार असे शासनाने जाहीर केले. मात्र अनेक महिलांना सर्व प्रक्रिया पूर्ण करुनही मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अद्यापही खात्यावर पैसेच जमा झाले नाहीत. यामध्ये अनेक महिला या बँक ऑफ इंडियामध्ये ई-केवायसी नसणे, आधार लिंक नसणे या प्रक्रियेत अडकल्या आहेत. यामुळे अनेक महिलांचे पैसे अद्यापही जमा झालेच नाहीत. ज्या महिलांनी पोस्ट कार्यालयात खाते उघडले आहेत, त्या सर्व महिलांच्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत. या योजनेंतर्गत फॉर्म भरण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत होती. सदरची मुदत पुन्हा वाढविण्यात आली असून यामध्ये झालेल्या गैरप्रकारामुळे शासनाने महाई-सेवा केंद्रात फॉर्म भरणे बंद केले आहे. आता फक्त अंगणवाडी सेविकाकडेच या योजनेचे फॉर्म भरणे सुरू आहे. शासनाने फॉर्म भरूनही वंचित महिलांसाठी प्रत्येक गावात याबाबत अधिकारीस्तरावरच याचा निपटारा करण्यासाठी कार्यक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करावी. जेणेकरून पात्र सर्व महिलांना याचा लाभ मिळेल. सध्याच्या महायुतीच्या सरकारचे भवितव्य या योजनेवरच अवलंबून आहे. कारण या योजनेचाच या महायुती सरकारला सत्तेपर्यंत नेण्याचा ही योजना एक राजमार्ग आहे. यामुळे प्रत्येक महिलेला याचा लाभ मिळणे आवश्यक आहे. जेणेकरून सत्ताधारी महायुती सरकार पुन्हा सत्तेत येऊ शकते. या योजनेमुळे महाराष्ट्रातील महिला सध्या खूष आहेत. याचा चांगला लाभ सत्ताधारी महायुतीला होऊ शकतो.





> माता-भगिनींना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महायुती सरकारने सुरु केली. फॉर्म भरलेल्या सगळ्यांनाच पैसे मिळणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी तसा आदेशही दिला आहे. तांत्रिक अडचणीमुळे लाभ थांबला असेल. याबाबत मी स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री अजितदादा पवार, आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याशी बोलणार आहे. कोणीही गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करु नये.
>
> **-मुबिना मुलाणी,**
> जिल्हा प्रमुख, महिला आघाडी, शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट

## शिवगणेश मंदिर शिखराचे काम पूर्णत्वाकडे

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता.द.सोलापूर) येथील श्री शिवगणेश मंदिर शिखराचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. दगडामध्ये मंदिराचे काम रेखीव केले असून गाभाऱ्यातील काम हेमाडपंती पध्दतीने करण्यात आले आहे.



श्री गणेश, भगवान शंकर, माता पार्वती यांच्या मूर्ती एकाच शिळेत करण्यात येणार आहे. मंदिराचे बांधकाम काशीपीठाचे जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजीं,व माजी खासदार ष.ब्र. डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी,अफझलपूर मठाचे ष.ब्र.मरुळ राजेंद्र शिवाचार्य, मैंदर्गी मठाचे ष.ब्र.नीलकंठ शिवाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली व आशीर्वादाने होत आहे. श्री शिव गणेश मंदिराचे शिखर दाक्षिणात्य पध्दतीने होत आहे. श्रीराम लिंगेश्वर शिक्षण संकुल क्षेत्रातील श्री महालक्ष्मीनगर हे या परिसरातील एक धार्मिक, आध्यात्मिक व शैक्षणिक दृष्टीने महत्वाचे केंद्र म्हणून विकसित करण्याची योजना असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले.

# भावी शिक्षकांसाठी खुशखबर !
# २ वर्षानंतर होणार शिक्षक पात्रता परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

राज्यातील पहिली ते आठवीच्या वर्गांना शिक्षक होण्यासाठी अनिवार्य असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) राज्य परीक्षा परिषदेतर्फे १० नोव्हेंबर रोजी घेतली जाणार आहे.

राज्यातील पहिली ते आठवीच्या वर्गांना शिक्षक होण्यासाठी अनिवार्य असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) राज्य परीक्षा परिषदेतर्फे १० नोव्हेंबर रोजी घेतली जाणार आहे. त्यासाठी ९ ते ३० सप्टेंबर या कालावधीत अर्ज भरता येणार आहे. राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजय राठोड यांनी या बाबतची माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. राज्यातील पहिली ते आठवीच्या सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनांच्या अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण सेवक, शिक्षक या पदांसाठी उमेदवार टीईटी उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. राज्यात पवित्र संकेतस्थळाद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पहिल्या टप्प्याची भरती अंतिम टप्प्यात आहे, तर दुसऱ्या टप्प्यात काही हजार पदे भरली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे टीईटी कधी होणार याकडे उमेदवारांचे लक्ष लागले होते. परीक्षा परिषदेने जाहीर



केलेल्या वेळापत्रकानुसार, १० नोव्हेंबर रोजी टीईटी होणार आहे. २८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या कालावधीत प्रवेशपत्राची मुद्रित प्रत काढून घेता येणार आहे. १० नोव्हेंबर रोजी परीक्षेतील पेपर १ सकाळी साडेदहा ते एक या वेळेत, तर दुपारी दोन ते साडेचार या वेळेत पेपर २ होणार आहे. परीक्षेचे अर्ज केवळ ऑनलाइन भरणे आवश्यकल आहे. अर्ज भरणे, शुल्क या बाबतची माहिती परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेला तात्पुरता प्रवेश देऊन निकाल घोषित केला जाईल. परीक्षेच्या निकालानंतर शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रांची पडताळणी प्रमाणपत्र वितरणावेळी करण्यात येईल. प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी कागदपत्रे अपूर्ण असल्यास किंवा उमेदवार प्रमाणपत्रे सादर करू न शकल्यास परीक्षेची उमेदवारी रद्द करण्यात येईल. ऑनलाइन अर्जातील माहिती आणि मूळ कागदपत्रांत तफावत आढळल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

> राज्यात अनेक वर्षापासून डी.एड.बी.एड.करून लाखो तरुण बेरोजगार आहेत. शिक्षक भरती प्रक्रिया सुद्धा वेळेनुसार नियमित होत नसल्यामुळे बेरोजगार प्रमाण जास्त आहे. डी.एड.साठी टिईटी आवश्यकता असल्यामुळे परीक्षासाठी वाट पाहत होते. परंतू परीक्षा पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी शासन प्रयत्न करावे. निकाल सुद्धा लवकर लावून पुढील शिक्षक भरती साठी लाखो विद्यार्थांना संधी उपलब्ध करून देण्यात यावी. वर्षातून दोनदा परीक्षा घेऊन भावी गुरुजीना रोजगारांची संधी उपलब्ध करून देण्यात यावी.
>
> **- प्रशांत शिरगुर,**
> **राज्य उपाध्यक्ष, (स्पर्धा परीक्षा तथा डी.एड.बी.एड. संघटना)**


## बावनकुळेंच्या मुलाचे नाव एफआयआरमध्ये का नाही? : राऊत

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० सप्टेंबर-**

नागपूरच्या सीताबर्डी परिसरात रविवारी मध्यरात्री झालेल्या भरधाव ऑडी कारच्या अपघातावरुन राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. ऑडी कारने दोन कार आणि एका बाईकला उडवलं. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर गदारोळ झाला आणि पोलिसांनी या प्रकरणी अर्जुन हावरे चालक आणि त्याच्या शेजारी बसलेल्या रोहित चिंतमवार यांच्याविरोधात रॅश ड्रायव्हिंगच्या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र गाडीचे मालक व दुर्घटनेच्या गाडीत असलेल्या भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे चिरंजीव संकेत बावनकुळे यांच्या विरोध मात्र गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. त्यांच्या नावाचा समावेश एफआयआर मध्ये उल्लेख का केला नाही?, असा सवाल ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी केला आहे पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, बावनकुळेंचा मुलगा असो किंवा इतर कोणत्याही नेत्याचा मुलगा असो, या राज्यामध्ये दोन कायदे आहेत का? महाराष्ट्रात हिट अँड रनची प्रकरणे एवढी वाढली आहेत की मोठ्या बापाची पोरे मद्यपान करुन रस्त्यावर कोणालाही चिरडतात, उडवतात, जखमी करतात. मोठ्या बापाच्या पोरांची नावही एफआयआरमध्ये नसतात. फडणवीस गृहमंत्री आहेत आणि राज्यात एकच कायदा आहे तर त्यांनी सांगितले पाहिजे की नागपूरमध्ये 'हिट अँड रन' जे प्रकरण घडले त्यामधील कार कोणाची आहे? गाडी कोण चालवत होतं? चालकाची आदलाबदली का केली? हे सर्व रेकॉर्डवर आहे. आरटीओ अधिकाऱ्याने नंबरप्लेट का बदलली? अशी विचारणा करुन ते म्हणाले की,' बावनकुळेंचा त्यांच्या कुटुंबाचा या अपघाताशी काही संबंध नाही तर ही चोरी कशासाठी? ही चोरी केली कारण जो शहजादा गाडी चालवत होता तो नशेत धुंद होता. त्याला वाचवण्यात आले आहे. हे सारं प्रकरण समोर आल्यानंतर कायदा सुव्यवस्था किती उद्धवस्त झाली आहे हे दिसतं. फडणवीस ज्या शहरातून येतात त्या शहराची अवस्था बघा. इतर कोणत्या पक्षातील नेत्याचा हा मुलगा असता तर आतापर्यंत फडणवीसांची फौज आमच्यावर किती हल्ले केले असते. मात्र आज तुमच्या प्रदेशाध्यक्षांचा मुलगा आहे. नशेत धुंद होता, असं रेकॉर्डवर आहे. तो गाडी चालवत होता. दोघे मृत्यूशी झुंज देत असताना एफआयआरमध्ये नावही नाही.गाडी बावनकुळेंच्या मुलाची आहे. तो गाडी चलवत होता. सर्व पुरावे नष्ट केलं. असं करत असाल तर कायद्याचं नाव घेऊन विरोधकांना त्रास देण्याचा तुम्हाला अधिकार आहे का? नाहीये. फडणवीस तुम्ही त्या पदावर बसण्यास लायक नाहीत. निष्पक्ष चौकशी हे काय करणार? जोपर्यंत फडणवीस या पदावर आहेत तोपर्यंत कोणत्याही प्रकरणाची निष्पक्ष तपासणी होणार नाही. जोपर्यंत रश्मी शुक्ला डीजी आहेत तो निष्पक्ष तपासणी होणार नाही.

**फडणवीस लायक नाहीत**

विषय चंद्रशेखर बावनकुळेंचा नाही. हा विषय या राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा कचरा झाल्याचा आहे. मोदी कायदा सगळ्यांसाठी सारखा असे म्हणत समान नागरी कायदा असे म्हणतात ना? गाडी कोण चालवत होतं? अपघात झाल्यावर ड्रायव्हरला बसवले आणि त्याचं नाव घेतलं. हा या राज्यातला कायदा आहे? मी सर्वांशी समान न्यायाने वागेन म्हणून आपण संविधानाची शपथ घेतली आहे. असेही त्यांनी सांगितले.



# जिल्ह्यात 'स्वच्छता ही सेवा' अभियान राबविणार : सीईओ जंगम

### १४ सप्टेंबरपासून अभियानास सुरूवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. २ ऑक्टोबर २०२४ हा दिवस स्वच्छ भारत दिवस (SBD) म्हणून साजरा केला जाणार आहे. त्या निमित्ताने स्वच्छता ही सेवा (SHS) २०२४ मोहीम दि. १७ सप्टेंबर ते दि. १ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली आहे.

या वर्षीच्या स्वच्छता हि सेवा २०२४साठी 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' ही थीम निश्चित केली आहे. त्या अनुषंगाने 'स्वच्छता ही सेवा पंधरवडा' कालावधीमध्ये विविध उपक्रम राबविण्याबाबत राज्य शासन व केंद्र शासनाच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे अध्यक्षतेखाली समिती असून विविध उपक्रम जिल्ह्यात राबविणेत येत आहेत. त्यानुसार जिल्हयात विविध दैनंदिन उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

१७ सप्टेंबर २०२४ रोजी स्वच्छता हि सेवा अभियाना शुभारंभ गाव, तालुका व जिल्हास्तरावर मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. सफाई मित्र सुरक्षा शिबीर या उपक्रमाद्वारे सफाई मित्रासाठी एक खिडकी योजनेद्वारे सर्व योजनांच्या अनुषंगाने पात्र लाभार्थ्यांकारिता मोहीम राबविण्यात येणार आहे.



१९ सप्टेंबर रोजी एक दिवस श्रमदानासाठी, हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्हयातील सार्वजनिक ठिकाण,कार्यालय,संस्थात्मक इमारती,व्यावसायिक व बाजारपेठे,सार्वजनिक वाहतुक केंद्रे, प्रमुख रस्ते व महामार्ग, पर्यटन स्थळ, रेल्वे



स्थानके, धार्मिक, अध्यात्मिक स्थळे, प्राणी संग्रहालय, राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये, ऐतिहासिक वास्तू, वारसा स्थळे, नदी किनारे, घाट, नाले या ठिकाणांची साफसफाई ग्रामस्थ, एनएसएस व एनसीसी, विविध मंडळे, सामाजिक संस्था व विद्यार्थी याचे मार्फत करण्यात येणार आहे. गावातील खाऊ गल्ली किंवा बाझार पटांगणामध्ये स्वच्छतेच्या अनुषंगाने मोहीम राबविणे स्वयंस्फुर्तीने लोकसहभागाच्या माध्यमातून शास्त्रयुक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे. जिल्ह्याच्या संस्कृतीनुसार संस्कृतिक कार्यक्रमात पथनाट्ये व कलापथक यांची स्वच्छतेच्या अनुषंगाने जनजागृती कार्यक्रम आयोजित करणेत येणार आहे. कार्यक्रमाकरिता गर्दीच्या ठिकाणांची निवड करण्यात येणार आहे. प्लास्टिक जनजागृतीसाठी एकल प्लास्टिक न वापरणे बाबत जनजागृती करण्यात येणार आहे. सर्व कुटुंबांना गृहभेटीद्वारे जनजागृती करून एक झाड आईच्या नावे उपक्रम राबविण्यात येणार आहे. तसेच तालुकास्तरावर खासदार व आमदार स्थानिक लोकप्रतिनिधी सर्व विभागाचे शासनाचे अधिकारी कर्मचारी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या उपस्थिती स्वच्छता ज्योत, स्वच्छता दौड,स्वच्छता सायकल स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत.

गावामध्ये टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणेबाबत स्पर्धा घेण्यात येणार आहेत.गावातील सार्वजनिक शौचालयाची साफसफाई व दुरुस्ती करण्यात येणार आहे. तसेच या दिवशी स्वच्छ भारत दिवस म्हनुन साजरा करणेत येणार आहे.


> **गणेशोत्सव मंडळांचा सहभाग घेणार**
>
> या कालावधीमध्ये दैनंदिन उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करून व्यापक प्रमाणात प्रचार व प्रसिद्धी करण्यात यावी गाव स्तरावर गणेश उत्सव मंडळे महाविद्यालय शाळा एनएसएस विद्यार्थी एनसीसीचे विद्यार्थी सामाजिक संस्था महिला बचत गट शासकीय नियम शासकीय कार्यालय यांचा सहभाग घेऊन दैनंदिन उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी.
>
> **- अमोल जाधव, प्रकल्प संचालक जिल्हा परिषद**

## २५ लाखांची लाच घेणाऱ्या न्यायालयातील दुभाषकाला अटक; मुंबई एसीबीची कारवाई

**मुंबई, दि .१० सप्टेंबर:**

दाव्याचा निकाल बाजूने लावण्यासाठी हॉटेल व्यावसायिकाकडे २५ लाख रुपयांची लाच घेणाऱ्या लघुवाद न्यायालयातील अनुवादक दुभाषिक विशाल चंद्रकांत सावंत (वय ४३) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सोमवारी अटक केली. या कारवाईमुळे न्यायालयीन वर्तुळात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे न्यायालयात होत असलेल्या भ्रष्टाचाऱ्याचे भांडाफोड होण्याची शक्यता आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्याने त्यासाठी जाधवकडे कसून चौकशी करावी ,अशी मागणी सर्वसामान्य नागरिकातून होत आहे. याबाबत एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदारांच्या हॉटेलच्या मालकी हक्काबाबत धोबी तलाव येथील लघुवाद न्यायालयात दावा दाखल आहे. या दाव्याचा निकाल अंतिम टप्प्यात प्रलंबित आहे. या दाव्याचा निकाल बाजूने लावून देतो असे सांगून दुभाषक विशाल सावंतने तक्रारदाराकडे २५ लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदारांनी याप्रकरणी एसीबीकडे तक्रार केली. त्याची पडताळणी करून २५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार एसीबीने तात्काळ सापळा रचून २५ लाख लाचेची रक्कम स्वीकारताना सावंतला पकडण्यात आले. याप्रकरणी त्यांच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी एसीबी अधिक तपास करीत आहे.





## विधानसभेसाठी वृत्तांकन, मतदार कोल संशोधनाचे डिजिटल मिडिया संघटनेचे विशेष नियोजन : माने

**सातारा, दि. १० सप्टेंबर-**

विधानसभा निवडणूक वृत्तांकन आणि मतदार कौल विश्लेषण-संशोधनासाठी विधानसभा मतदारसंघवार नियोजन संघटना करीत असल्याचे डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी सांगितले. ते आज साताऱ्यात आले होते. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली. राजा माने यांचे स्वागत व सत्कार संघटनेचे सातारा जिल्हाध्यक्ष गणेश बोतालजी यांनी केले. यावेळी लोकमत सातारा आवृत्तीचे युनिट हेड संतोष बोगशेट्टी, विश्वजीत गुजर,माजी प्राचार्य पांडुरंग सातपुते, संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य संजय कदम, जिल्हा उपाध्यक्ष धनंजय पानसांडे, जिल्हा खजिनदार संदीप माने, जिल्हा कार्यकारिणी सदस्य संतोष शिराळे, लिंगराज साखरे व सूर्यप्रताप कांबळे यांची उपस्थिती होती.

# मंत्री संजय राठोड यांच्याकडून नवी मुंबईतील ५०० कोटींचा भूखंड हडप : विजय वडेट्टीवार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.१० सप्टेंबर**

महायुतीच्या मंत्र्यांनी सरकारी तिजोरीतील पैसे फस्त केले आहेत. त्यामुळे आता भूखंडावर ताव मारा आणि तृप्त व्हा अशी नवी योजनाच या सरकारने लाडक्या मंत्र्यांसाठी आणली आहे. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी. गोर बंजारा समाजासाठी नवी मुंबईतील बेलापूर येथे दीड एकर भूखंडचा पाचशे कोटींचा भूखंड स्वत:च्या खासगी ट्रस्टच्या माध्यमातून हडप केला आहे. तसेच सध्या मंत्रीमंडळात असणाऱ्या बिल्डर मंत्र्यांनी देखील सातशे कोटींचा भूखंड जैन इंटरनॅशनल आर्गनायझेशनच्या नावाखाली हडप केला आहे. कुलाबा महसूल विभागातील हा मोक्याचा भूखंड खाणारा बिल्डरमंत्री सरकारचा लाडका आहे. कागद पत्रांची हेराफेरी करून भूखंड खाण्याचा उद्योग या हेराफेरी सरकारने सुरू केला असल्याचा हल्लाबोल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज केला.

त्याचबरोबर नागपूर येथील हिट अँड रन प्रकरणी भाजप प्रदेशाध्यक्षांच्या लाडक्या मुलावर कारवाई करण्याची मागणी त्यांनी प्रचितगड या शासकीय निवासस्थानी पत्रकार



परिषदेत केली.

वडेट्टीवार म्हणाले की, मंत्री राठोड यांना भूखंड देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी अधिकार कक्षेच्या बाहेर जावून मदत केली आहे. राठोड यांच्या खासगी सचिवांच्या पत्रावर कारवाई करून हा भूखंड दिला आहे. कोणतीही कायदेशीर प्रक्रीया न राबविता बेकायदेशीर पत्रावर निर्णय घेऊन हा भूखंड दिला आहे. गोर बंजार समाजाची यामध्ये फसवणूक झाली आहे. भ्रष्टाचार उघडकीस आल्यावर मंत्री राठोड भूखंड परत करण्याची भाषा बोलत आहेत. परंतु आता वेळ निघून गेली आहे. त्यांचा इरादा समाजाच्या लक्षात आला आहे. राठोड यांनी २ हजार कोटी बजेट असताना ८ हजार कोटींची टेंडर काढली आहेत.

ते म्हणाले की, सरकारमधील बिल्डरमंत्र्याने कहर केला असून जैन इंटरनॅशनल आर्गनायझेशन या खासगी शिक्षण संस्थेच्या नावाखाली ७०० कोटींचा कुलाबा महसूल विभागातील भूखंड हडप केला आहे. याची सगळी प्रक्रीया पूर्ण झाली आहे. परंतु हा भ्रष्टाचार उघडकीस येईल या भीतीमुळे अजून शासन निर्णय निर्गमित केला नाही. सरकारने अशी चलाखी जरी केली असली तरी हे प्रकरण उजेडात आले आहे.

नागपूर येथील हिट अँन्ड रन प्रकरणाची सरकारने चौकशी करून भाजपच्या प्रदेशाध्यक्षांच्या लाडक्या मुलावर कारवाई करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. पुण्यातील पोर्शे कार प्रकरणात अजित पवार गटाच्या नेत्याने आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न केला. वरळी येथील अशाच प्रकरणात शिंदे गटाच्या नेत्याने आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न केला. आता तर भाजपच्या प्रदेशाध्यक्षांच्या मुलाला वाचविण्याचा प्रयत्न सुरू आहे. पोलीस आरोपींना पाठिशी घालत आहेत. नंबर प्लेट काढून, सीसीटीव्ही नष्ट करून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

# अखेर बेळगाव मार्गे धावणार वंदे भारत

**तभा वृत्तसेवा,**
**बेळगाव, दि. १० सप्टेंबर-**

गेल्या अनेक महिन्यांपासून बेळगावकरांच्या प्रतीक्षेत असलेली वंदे भारत रेल्वे लवकरच बेळगाव मार्गे धावणार आहे. पुणे-हुबळी मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्यासाठी रेल्वेने सुरू प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे बेळगावच्या नागरिकांना आता वंदे भारतने जलदगतीने पुण्याला पोहोचता येणार आहे.



पुणे- बेंगळुरू रेल्वे मार्गावरील विद्युतकरणाची चाचणी यशस्वीरित्या घेण्यात आली आहे.मिरज ते कुडची या शेवटच्या टप्प्यातील विद्युतीकरण झाल्याने पुणे-बेंगलोर मार्गावरील विद्युतीकरण काम पूर्ण झाले आहे. तसेच बेळगाव-बेंगलोर मार्गावर वंदे भारतची चाचणी यापूर्वी घेण्यात आली आहे. परंतु वेळेचे अडसर असल्याने हा प्रस्ताव बारगषला होता. यानंतर भारतीय रेल्वेने बेळगाव पुणे मार्गावर वंदे भारत सुरू करण्याबाबत सहमती दर्शवली होती.

मागील महिनाभरापासून वंदे भारत एक्सप्रेस साठी सर्व रेल्वे स्थानकात आवश्यक बदल केले जात आहेत. हुबळी हून सकाळी पाच वाजता निघणारी वंदे भारत बेळगावला सात वाजता पोहोचेल. त्यानंतर बेळगावहून पुढे मिरज, सांगली, सातारा मार्गे दुपारी दीड वाजता ही गाडी पुण्याला पोहोचेल. त्याचप्रमाणे पुण्याहून दुपारी दोन वाजून पंधरा मिनिटांनी हुबळीकडे निघणारी गाडी बेळगावला रात्री आठ वाजून चाळीस मिनिटांनी पोहोचेल.

## आत्महत्या प्रतिबंधक धोरण प्रभावी असावे

**नवी दिल्ली, १० सप्टेंबर**

आत्महत्या रोखण्याच्या उद्देशाने संकटात सापडलेल्या लोकांसाठी क्लिनिकल सेवा महत्त्वाच्या आहेत, परंतु या उद्देशासाठी राष्ट्रीय धोरणांमध्ये सामाजिक समस्यांचा समावेश नाही. त्यामुळे लोकांना टोकाचे पाऊल उचलण्यापासून उपाय देखील असले पाहिजेत, असे मत 'द लॅन्सेट पब्लिक हेल्थ' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या सहा शोधनिबंधांच्या नवीन मालिकेच्या लेखकांनी व्यक्त केले आहे.

लेखकांच्या आंतरराष्ट्रीय पॅनलने आत्महत्येची धारणा बदलण्याचे आवाहन केले आहे. आत्महत्या केवळ गरिबी, घरगुती हिंसाचार, व्यसनाधीनता यामुळेच होत नसल्याचे मत मांडले आहे.

हे विशेषतः भारतासाठी प्रासंगिक आहे, ज्याने नोव्हेंबर २०२२ मध्ये राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधक रणनीती जारी केली. २०३० पर्यंत देशातील आत्महत्यांमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या १० टक्क्यांनी कमी करणे हा या धोरणाचा उद्देश आहे. आत्महत्येसाठी प्रभावी पाळत ठेवणे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मानसिक आरोग्य-संबंधित अभ्यासक्रम समाविष्ट करणे ही त्याची उद्दिष्टे आहेत. जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त प्रकाशित झालेल्या अहवालात लेखकांनी आत्महत्या रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्याच्या सहा पैलूंचा उल्लेख केला आहे.

# राम मंदिरामुळे मिळणार ४०० कोटींचा जीएसटी

### ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांची माहिती

**इंदूर, १० सप्टेंबर**

अयोध्येत सध्या सुरू असलेल्या राम मंदिराच्या बांधकामामुळे केंद्र सरकारला वस्तू आणि सेवा कर अर्थात् जीएसटीच्या स्वरूपात सुमारे ४०० कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होईल, अशी माहिती श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी दिली.

हा केवळ एक अंदाज आहे. राम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरच जीएसटी संकलनाचा खरा आकडा समजू शकणार आहे, असे राय यांनी मध्यप्रदेशच्या इंदूर येथे आयोजित एका कार्यक्रमात सांगितले.

सध्या माझा अंदाज असा आहे की, राम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर केंद्र सरकारच्या तिजोरीत किमान ४०० कोटी




रुपयांचा महसूल जमा होईल. येथील संकुलाच्या सुमारे ७० एकर जागेवर १८ मंदिरांचे बांधकाम सुरू आहे. यात महर्षि वाल्मीकि, शबरी आणि तुलसीदास यांच्या मंदिरांचा समावेश आहे. आम्ही जीएसटीच्या स्वरूपात संपूर्ण कर सरकारला देणार आहोत. करातील एक रुपयाही कपात करणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. सर्वांच्या सहकार्याने राम मंदिराचे बांधकाम सुरू आहे आणि दोन लाख भाविक आले तरीही कुणालाही समस्या होणार नाही, अशी व्यवस्था केली जात आहे, असे चंपत राय यांनी सांगितले.

## अग्रलेख...

# नेमेचि येते रोगराई...

नेमेचि येतो पावसाळा आणि नेमेचि येते रोगराई, असे आपल्या देशाचे झालेले आहे. पूर, अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान, भूस्खलन यांच्या बरोबरीने आजारांचा प्रसार हाही आता चिंतेचा विषय बनत चाललेला आहे. नागपूर आणि महाराष्ट्रात चिकनगुनिया आणि डेंग्यूचा व्यापक प्रादुर्भाव चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. हजारो लोकांच्या जीवनमानावर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे. एकट्या नागपूर शहरात २० हजारांहून अधिक रुग्ण आहेत. शारीरिक, आर्थिक त्रासात तर ढकललेच, शिवाय वरकरणी काहीही कारण नसताना आपण नीट चालू शकत नाही, ही भावना त्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी घातक ठरते आहे. चिकनगुनिया आणि डेंग्यू हे दोन्ही विषाणूजन्य संसर्गातून होणारे आजार आहेत, जे प्रामुख्याने एडिस इजिप्ती या प्रजातीतील डासांच्या माध्यमातून पसरतात. वैद्यकशास्त्राच्या भाषेत ते काही जीवघेणे आजार नाहीत. पण त्रासदायक, नुकसानदायक जरूर आहेत. एडिस ही प्रजाती उष्णकटिबंधीय आणि उपोष्णकटिबंधीय हवामानात वाढते. हे दोन्ही वेगवेगळे आजार असले तरी संक्रमण आणि लक्षणांच्या बाबतीत त्यांच्यात अनेक साधर्म्ये आढळतात. चिकनगुनिया हा आजार चिकनगुनिया विषाणूमुळे (CHIKV) होतो. त्या आजारात खूप ताप, तीव्र सांधेदुखी, डोकेदुखी, स्नायू दुखणे आणि शरीरावर पुरळ येणे अशी गंभीर लक्षणे दिसतात. यामुळे सांधेदुखीच्या दीर्घकालीन समस्या उद्‌भवू शकतात आणि परिणामी रुग्ण अनेक महिने किंवा वर्षांसाठी दुर्बल होऊ शकतात. त्यांना चालणे, कामावर जाणे, बसणे कठिण होऊ शकते. दुसरीकडे, डेंग्यू हा आजार डेंग्यू विषाणूमुळे (DENV) होतो आणि ताप, तीव्र डोकेदुखी, डोळ्यांच्या मागच्या भागात वेदना, सांधे आणि स्नायू दुखणे आणि त्वचेवर पुरळ उठणे अशी लक्षणे दिसतात. हा आजार बळावला तर डेंग्यू हेमोरेजिक ताप (DHF) किंवा डेंग्यू शॉक सिंड्रोममध्ये (DSS) त्याची परिणती होऊ शकते.

नागपूर, विदर्भ आणि महाराष्ट्रात चिकनगुनिया आणि डेंग्यूचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत. आपल्या बहुतांश भागात मान्सूनमध्ये देखील उष्ण आणि दमट वातावरण असते. असे वातावरण डासांच्या प्रजननासाठी उत्तम असते. पावसाळ्यात डबके साचणे आणि मोकळ्या जागेत साचलेल्या पाण्यामुळे या रोगांचा प्रसार वाढतो. याशिवाय, पाऊस पडल्यानंतर, खड्डे, बादल्या, उघडे नाले, फुलांच्या कुंड्या आणि इतर कंटेनर्समध्ये पाणी साचते. त्यामुळे डासांची पैदास वाढते. झपाट्याने होत असलेल्या शहरीकरणामुळे झोपडपट्ट्यांमध्ये वाढ झाली आहे. बहुतांशी शहरांमध्ये, गावांमध्ये कचरा व्यवस्थापन प्रणालींचा अभाव आहे. असल्यास ती पुरेशी सक्षम नाही. त्यामुळे डासांसाठी अतिरिक्त प्रजनन स्थळे निर्माण होऊन अशा आजारांच्या समस्या वाढतात.

नागपूरसारख्या शहरांमध्ये वाढत असलेली लोकसंख्येची घनता हे एरवी चर्चेत न येणारे एक कारण. दाट लोकवस्ती असलेल्या शहरी भागांत एकाला चावा घेतलेला डास दुसऱ्या व्यक्तीला चावण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते. शहरी झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छ पाणी आणि योग्य ड्रेनेज सिस्टिम यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असतो. बाजारपेठा आणि गर्दीच्या भागांत कचरा व्यवस्थापनातील गोंधळ आणि अपुऱ्या ड्रेनेज सिस्टिम हे चित्र आता सरावाचे झालेले आहे. त्यामुळे ठिकठिकाणी पाणी साचते आणि ते रोगराईचे जन्मस्थळ ठरत असते. स्थलांतरित मजूरवर्ग शहरांमध्ये स्वच्छतेच्या अपुऱ्या सोयी असलेल्या तात्पुरत्या घरांमध्ये राहतो. त्यामुळे संक्रमण चक्राला गती मिळते. सार्वजनिक आरोग्य सेवा सुधारण्याचे प्रयत्न करूनही, महाराष्ट्राच्या आरोग्यसेवा सुविधांमध्ये लक्षणीय उणिवा आहेत. डॉक्टर्सचा अभाव, औषधांचा अभाव, वैद्यकीय उपकरणांचा अभाव, सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अभाव अशा उणिवा प्रगत महाराष्ट्राला अद्याप दूर करता आलेल्या नाहीत. निदान लवकर झाले तर हे आजार नियंत्रणात येतातही. पण, त्यासाठी सरकारी दवाखान्यांमध्ये पुरेशी व्यवस्था हवी. ती नसणे ही फार मोठी समस्या आहे. गरिबांना खाजगी डॉक्टर किंवा रुग्णालयांमध्ये जाणे परवडत नाही. ते सरकारी इस्पितळांत जातात. पण, तेथे रुग्णांच्या रांगेसोबत अभावांची देखील रांगच असते. त्यामुळे निदान व उपचाराला वेळ लागतो आणि स्वाभाविकच रोगाचा प्रसार वाढत राहतो.

चिकनगुनिया आणि डेंग्यूचा प्रसार होण्यास कारणीभूत ठरणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे डास नियंत्रण आणि वैयक्तिक संरक्षणाबाबत जनजागृतीचा अभाव. अनेक रहिवाशांना डास चावण्यापासून बचाव कसा करावा किंवा प्रजनन स्थळे कशी संपवावी, याबद्दल माहिती नसते. मच्छरदाणी, रिपेलेंट्स वापरणे आणि लांब बाह्याचे कपडे घालणे यासारखे साधे प्रतिबंधात्मक उपाय मोठ्या प्रमाणावर वापरले जायला हवेत. घरे आणि कामाच्या ठिकाणांभोवती साचलेले पाणी काढून टाकले गेले पाहिजे. तेथे फवारणी केली गेली पाहिजे. बरेच लोक या आजारांना सामान्य विषाणूजन्य तापाची लक्षणे समजून वैद्यकीय उपचार घेण्यास उशीर करतात. त्यामुळे हे आजार गंभीर रुप धारण करतात आणि प्रसार सुलभ होत असतो. चिकनगुनियाबाबतीत सांधेदुखी आणि ताप यासारखी लक्षणे आठवडे किंवा महिनाभर टिकतात. चिकनगुनियाने ग्रस्त असलेल्या रुग्णांना वारंवार सांधेदुखीचा त्रास होतो. त्यामुळे दैनंदिन कामे करणे कठीण होते. या उद्रेकामुळे विशेषत: गरिबीत जगणाऱ्यांवर प्रचंड आर्थिक ताण पडला आहे. अनेक लोक आजारात काम करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे उत्पन्न बंद होते. त्याच वेळी डॉक्टरकडे जाणे, औषधे आणि निदान चाचण्यांसह आरोग्यावरील खर्चाचा भारही वाढतो. सध्याच्या उद्रेकाचे परिणाम नियंत्रित करण्यासाठी आणि भविष्यात होणारे परिणाम रोखण्यासाठी, बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. रोगाचा प्रसार नियंत्रित करण्यासाठी तात्काळ उपाययोजना, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा आणि दीर्घकालीन प्रतिबंधात्मक धोरणांचा विचार आता तरी प्राधान्याने व्हायला हवा. जास्त जोखीम असलेल्या भागात नियमित फॉगिंग केल्याने प्रौढ डासांची संख्या कमी होण्यास मदत होते. जनजागृती मोहिमा सुरू केल्या पाहिजेत. हे सारे करतानाच प्रादुर्भाव अधिक चांगल्या प्रकारे हाताळण्यासाठी आरोग्य व्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. यामध्ये इस्पितळांच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे, डॉक्टर्स आणि निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे, निदान साधने आणि उपचारांची उपलब्धता सुनिश्चित करणे यावर सरकारने लक्ष दिले पाहिजे. वेळेवर निदान आणि उपचार सुनिश्चित करण्यासाठी डेंग्यू आणि चिकनगुनियासाठी जलद निदान किट्सचे वितरण केले पाहिजे. तातडीची वैद्यकीय सेवा देण्यासाठी आणि शहरातील रुग्णालयांवरील भार कमी करण्यासाठी दुर्गम भागांत आणि झोपडपट्ट्यांमध्ये फिरते दवाखाने सुरू केले जाऊ शकतात.

चिकनगुनिया किंवा डेंग्यूसाठी कोणतेही विशिष्ट अँटीव्हायरल उपचार नाहीत. लस आणि अँटीव्हायरल औषधांवर संशोधन चालू आहे. सरकार आणि आरोग्य सेवा संस्थांनी लस विकसित करण्यासाठी आणि उपचार व्यवस्था सुधारण्यासाठी या रोगांवरील संशोधनासाठी निधी देण्यास प्राधान्य दिले पाहिजे. जागतिक आरोग्य संघटनेने डेंग्यू लसीची शिफारस केली आहे. डेंगव्हॅक्सिया या नावाच्या लसीचा वापर आपल्याकडे होतो, असे ऐकिवात आले नाही. पण, इतरत्र तिचा फायदा होत असल्यास भारतातही वापर व्हायला हरकत नाही. उच्च प्रसारण दर असलेली क्षेत्रे, उच्च जोखीम असलेल्या भागात लक्ष्यित लसीकरण मोहिमेचा फायदा महाराष्ट्राला होऊ शकतो. संशोधक चिकनगुनिया लसीवरही संशोधन करीत आहेत. तिचा विकास आणि वितरण जलदगतीने करण्यासाठी क्लिनिकल चाचण्या आणि संशोधनासाठी पाठबळ दिले पाहिजे. या संकटाचा सामना करण्यासाठी सरकार आणि स्थानिक समुदायांचा सहभाग आवश्यक आहे. सार्वजनिक शिक्षण, आरोग्यसेवा पायाभूत सुविधा आणि नियंत्रणात्मक उपायांची सांगड घालून या आजारांचा प्रसार रोखला जाऊ शकतो. पण, त्यासाठी समज हवी आणि इच्छाशक्तीही हवी.

## चिंतन

# सायबर फसवणुकीचे कारण - लोभ

गुरुदत्त दिनकर वाकदेकर

आज इंटरनेट हा सर्वसामान्यांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे, या तंत्रज्ञानावरील वाढत्या अवलंबित्वामुळे त्याच्याशी संबंधित समस्याही समोर येऊ लागल्या आहेत. सायबर फसवणुकीशी संबंधित बातम्या मिळत नाहीत, असा एकही दिवस जात नाही. या फसवणुकीपासून सामान्य जनतेचे रक्षण करण्यासाठी बँका, पोलिसांसह सर्व यंत्रणांद्वारे सातत्याने आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी बँक खाते क्रमांक, पिन, पासवर्ड, ओटीपी इत्यादी कोणत्याही व्यक्तीला सांगू नयेत, कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये. व्हिडीओ कॉलमुळे लोक या टोळीच्या तावडीत अडकत आहेत आणि आयुष्यभर कष्टाने कमावलेले पैसे गमावत आहेत. एक निवृत्त अधिकारी सायबर गुंडांच्या जाळ्यात अडकून एक कोटींहून अधिक रुपये गमावल्याची घटना नुकतीच समोर आली आहे. या प्रकरणात, फसवणूक करणाऱ्या टोळीच्या सदस्याने बँकेतील घोटाळ्याचा हवाला देत व्हॉट्सॲप कॉलद्वारे वापरकर्त्याच्या खात्याची संपूर्ण माहिती मिळवली आणि त्याच्या खात्यामधून एक कोटीहून अधिक रुपये ट्रान्सफर केले. दुसरी घटना राजधानीमधील आहे, जिथे फसवणूक करणाऱ्यांनी एका इंस्टाग्राम वापरकर्त्या डॉक्टरला गेमिंग कंपनीत पैसे गुंतवून ४० टक्के नफा देण्याचे आश्वासन देऊन ९० लाख रुपयांची फसवणूक केली. शेअर बाजारात पैसे दुप्पट करून, घरी बसून लाखोंची कमाई आणि मोठमोठी बक्षिसे मिळवण्याची स्वप्ने सर्वसामान्यांना दाखवून सायबर घोटाळेबाज लाखो-करोडो रुपयांची फसवणूक करत आहेत, हे विशेष. आजकाल चोरी, दरोडा, फसवणूक आणि महामार्गावरील दरोड्याच्या घटनांमध्ये घट झाली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, उलट फसवणूक करणाऱ्यांनी लूटमारीचा, डिजिटल फसवणुकीचा नवा मार्ग शोधला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे केवळ अशिक्षित किंवा कमी शिकलेले लोकच सायबर फसवणुकीचे बळी ठरत नाहीत तर डॉक्टर, सॉफ्टवेअर इंजिनीअर, उच्चशिक्षित प्राध्यापक, लष्करी आणि उच्च प्रशासकीय अधिकारीही बळी पडत आहेत.

सायबर गुन्ह्यांचे संशोधन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय अहवालानुसार सायबर गुन्ह्यांमध्ये भारत दहाव्या क्रमांकावर आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मते २०२३-२४ मध्ये कार्ड आणि इंटरनेट फसवणुकीची एकूण २९०८२ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. इंडियन सायबर क्राईम कोऑर्डिनेशन सेंटरच्या म्हणण्यानुसार, या वर्षी जानेवारी ते मे दरम्यान १२०३ कोटी रुपयांच्या डिजिटल फसवणुकीची ४५९९ प्रकरणे नोंदवण्यात आली. एका अंदाजानुसार, गेल्या चार महिन्यांत सुमारे ४०० कोटी रुपयांची डिजिटल फसवणूक झाली आहे. या प्रकारच्या फसवणुकीच्या प्रकरणांवर नजर टाकली तर, लोभ, भीती, व्यक्तीचे अज्ञान ही कारणे त्याला प्रामुख्याने कारणीभूत आहेत. संसदेत सादर केलेल्या अहवालानुसार, देशातील पाच राज्ये उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि हरियाणा ज्यामध्ये उत्तर प्रदेश यात आघाडीवर आहे. सायबर गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मते, दक्षिण पूर्व आशियातील प्रमुख शहरांसह देशातील विविध राज्यांमधून सायबर फसवणुकीत एक टोळी कार्यरत आहे. भारतात झारखंडचे जामतारा शहर या फसवणुकीसाठी सर्वाधिक कुप्रसिद्ध होते, परंतु आता देवधर, दिल्ली, उत्तर प्रदेशचे आझमगढ, मथुरा, बिहारचे गोपालगंज, हरियाणाचे मेवात, भिवानी आणि नूह, गुजरातचे अहमदाबाद आणि सुरत, राजस्थानचे भरतपूर, पश्चिम बंगालचे दुर्गापूर आणि आसनसोल आणि आंध्र प्रदेशचे चित्तूर फसवणुकीसाठी कुप्रसिद्ध झाले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे या आंतरराज्य टोळीचे दुबई, चीन, श्रीलंका, नेपाळ, कंबोडिया, म्यानमार आणि लाओससारख्या देशांशी संबंध जोडलेले आहेत.

तथापि, भारतातील मुख्यत: सामान्य लोक हॅकिंग, खंडणी, बनावट समाजमाध्यमाची खाती आणि बनावट व्हॉट्सॲप कॉल, बनावट ट्रेडिंग ॲप्स, कर्ज, गेमिंग, मनी लाँड्रिंग, डेटिंग आणि मॅट्रिमोनियल ॲप्स, क्रिप्टो, पेटीएम आणि यूपीए पासवर्ड किंवा पिन यामुळे चिंतेत आहेत. मिळालेल्या ओटीपीद्वारे ते सायबर फसवणुकीचे बळी ठरत आहेत. सेक्स्टोर्शन हे खरे तर 'सेक्स' आणि 'एक्सटॉर्शन' या दोन शब्दांचे मिश्रण आहे, हे एक प्रकारचे ब्लॅकमेलिंग आहे. यामध्ये सायबर गुन्हेगार महिला किंवा मुलीच्या नावाने सोशल मीडियावर मैत्रीचे मेसेज पाठवतात, ते स्वीकारल्यानंतर ही टोळी लोकांशी अश्लील बोलू लागते आणि चॅटिंग करून, त्यांना व्हिडीओ कॉलसाठी प्रवृत्त करतात. या सापळ्यात अडकल्यानंतर, जेव्हा वापरकर्ते व्हिडीओ कॉल करतात तेव्हा गुन्हेगार त्याचा एक नग्न व्हिडीओ बनवतो. यानंतर टोळीचे सदस्य पोलिस अधिकारी म्हणून वापरकर्त्याला धमकावत अनेकवेळा हा अश्लील व्हिडिओ यूट्यूबवर अपलोड करण्याची धमकी देतात. बदनामी होण्याच्या भीतीने सहसा पीडित पक्ष हे प्रकरण पोलिसांकडे नेण्यास टाळाटाळ करतात आणि फसवणूक करणाऱ्या टोळीच्या तावडीत अडकून लाखोंचा ऐवज गमावतात. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक प्रभावशाली अधिकारी, व्यापारी, राजकारणी, सेवाभावी लोक आणि तरुण वर्ग सायबर चोरीच्या चक्रव्यूहात अडकत असून, त्यांची प्रतिष्ठा धुळीस मिळण्याच्या भीतीने त्यांना आपल्या भांडवलासह आपला जीव गमवावा लागत आहे. तथापि, सावधगिरी आणि संयमाने सेक्सटोर्शनसारखी फसवणूक टाळता येऊ शकते. कोणत्याही महिलेची किंवा मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारण्यापूर्वी वापरकर्त्यांनी योग्यरीत्या पडताळणी करावी. समाजमाध्यमांवर कोणत्याही वापरकर्त्याने तुम्हाला अश्लील मेसेज किंवा व्हिडीओ पाठवल्यास त्याची तक्रार तात्काळ सायबर सेलकडे करावी जेणेकरून गुन्हेगारांवर अंकुश ठेवता येईल.

भारतात सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या संदर्भात, हे लक्षात घेण्यासारखे आहे की, देशातील मोठी लोकसंख्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या बाबतीत जवळजवळ निरक्षर आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय' आता अशा घटनांमध्ये आणखी वाढ करत आहे. सायबर फसवणुकीची वाढती प्रकरणे सरकार आणि समाजासाठी सतत आव्हान बनत आहेत, यात शंका नाही, परंतु लोभ, भीती आणि अज्ञान यांसारख्या वृत्ती त्याला प्रामुख्याने जबाबदार आहेत. केवळ आत्मनियंत्रण, चारित्र्य शुद्धता, डिजिटल जागरूकता आणि याद्वारे फसवणुकीचे प्रकार थांबवता येतात. दक्षता या प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी, फसवणूक झाल्याचा संशय असलेल्या अज्ञात क्रमांकांवरून येणारे व्हिडिओ कॉल त्वरित ब्लॉक केले जावेत. याशिवाय तुम्ही तुमचा एटीएम कार्ड पिन, मोबाईल फोनचे पासवर्ड आणि इतर डिजिटल गॅजेट्स कधीही कोणाशीही शेअर करू नका. तुम्ही फसवणुकीला बळी पडल्यास, संबंधित बँक आणि सायबर क्राईमशी त्वरित संपर्क साधा. दुसरीकडे, माहिती तंत्रज्ञान कायदा २००० आणि दुरुस्ती २००८ व्यतिरिक्त, देशातील सायबर गुन्ह्यांबाबत तक्रारी नोंदवण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक आणि वेबसाईटसह भारतीय दंड संहिता १८६० च्या विविध कलमांतर्गत कारवाईची तरतूद आहे, परंतु इंटरनेटमुळे निर्माण होणारे धोके अमर्यादित आहेत, त्यामुळे भारत सरकारने असा कडक कायदा बनवला पाहिजे की ज्यामुळे लोकांची सुरक्षा आणि आर्थिक सुविधा तसेच सायबर गुन्हेगारांवर त्वरित कारवाई होईल.

९९८७७४६७७६


## वेध

गिरीश शेरेकर

# धरणांची चिंता मिटली, पिकांची मात्र कायम

जून महिन्यात पावसाने अपेक्षेनुरूप हजेरी न लावल्याने सर्वांचीच चिंता वाढली होती. जूनच्या शेवट व जुलैच्या सुरुवातीला पाऊस आला. पण, अपेक्षित सरासरी इतकी त्याची नोंद झाली नसली तरी पिकांची स्थिती चांगली होती. हवामान विभागाने अंदाज वर्तवून जुलैच्या शेवटी व ऑगस्ट महिन्यात पाऊस तुट भरून काढेल, असा अंदाज वर्तविला. त्यानुसार पावसाने तुट भरून काढली असून राज्यात आतापर्यंत सरासरी ९० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. पावसाळ्याचे आणखी २० दिवस शिल्लक आहेत आणि वातावरण ढगाळ आहे. या दिवसात पावसाची टक्केवारी शंभरपार होण्याची शक्यता आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाल्याने ८.५ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. अन्य काही ठिकाणी अतिपावसाने पिके थोडी खराब झाली आहे. हे एक संकट वगळता आतापर्यंतचा पाऊस सगळीकडे समाधानकारक झाला आहे. बहुतांश भागात पिकांची स्थिती चांगली आहे. धरणे भरली असून पिण्याच्या पाण्याची, सिंचनाची आणि उद्योगांना लागणाऱ्या पाण्याची चिंता मिटली आहे. चांगल्या पावसाचा रब्बी हंगामाला फायदा होतो.

चांगल्या पावसामुळे राज्यातील १३८ मोठ्या धरणांतील सरासरी पाणीसाठा ९२ टक्क्यांपेक्षा जास्त झाला आहे. २६० मध्यम प्रकल्प ७१ टक्के भरले असून २,५९९ लघु प्रकल्पांत ५० टक्के साठा झाला आहे. विद्यमान स्थितीत सर्व प्रकल्प मिळून ४१७१२.९७ दशलक्ष घनमीटर इतका पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. १३८ मोठ्या धरणांपैकी ४० धरणे शंभर टक्के भरली आहेत. तर ४५ धरणांमध्ये ९० टक्क्यांच्या वर पाणी आहे. ३५ धरणे ७० टक्क्यांच्या वर भरली आहेत. ९० टक्क्यांच्या वर भरलेल्या धरणातून नियमानुसार विसर्ग सुरू आहे. राज्यातल्या मोठ्या प्रकल्पांची साठवण क्षमता ३५५४३.२९ द.ल.घ.मी असून सध्या ३३५८६.०१ द.ल.घ.मी. इतका साठा आहे. त्याची टक्केवारी ९२.८९ आहे. राज्यातल्या २६० मध्यम प्रकल्पांची साठवण क्षमता ६१८२.४४ दलघमी आहे. सध्या या प्रकल्पांमध्ये ४५९३.२७ दलघमी म्हणजे ७१.३५ टक्के साठा आहे. राज्यातील २,५९९ लघु प्रकल्पांची साठवण क्षमता ६५२९.११ दलघमी असून या प्रकल्पात सध्या ३५३३.४५ दलघमी साठा आहे. टक्केवारीत तो ४९.४१ टक्के आहे. एकत्र सर्व प्रकल्पांची उपयुक्त पाणीसाठ्याची टक्केवारी ८३.६० आहे. गतवर्षी ती याचवेळी फक्त ६६.३ टक्के होती. जवळपास २० टक्के वाढ झाली आहे.



मोठी व मध्यम धरणे पूर्ण क्षमतेने भरली की दोन वर्षांची चिंता मिटते, असे म्हटले जाते. यंदाच्या पावसामुळे खरोखरच ती मिटली आहे. कारण, याच प्रकल्पांवर पाणी पुरवठा योजना व सिंचनाला पाणी देण्याची व्यवस्था केलेली असते. उद्योगांना पाणी देणे शक्य होणार आहे. चांगल्या पावसाने पुढचा धोका संपुष्टात आला आहे. धरणांमध्ये उपयुक्त पाणी नसले की पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. राज्याने अनेकवेळा दुष्काळाची स्थिती अनुभवली आहे. मराठवाडा व विदर्भाला त्याच्या झळा तीव्रतेने बसतात. यंदा हा धोका खूप कमी झाला आहे. पावसाळ्यात धरणे भरली नाही तर त्यात अन्य ठिकाणांवरून पाणी आता येत नाही. पावसाच्या पाण्याशिवाय त्याला पर्याय नसतो. एकवेळ जास्त पावसामुळे खरिपातील पीक उत्पादनात तूट आली तर रब्बी हंगामात ती भरून काढता येते. अनेकदा असे झाले आहे. यंदा सप्टेंबरच्या सुरुवातीला काही ठिकाणी झालेली अतिवृष्टी वगळता राज्यात पिकांची स्थिती चांगली आहे. आता चिंता आहे ती परतीच्या पावसाची! हा पाऊस हातातोंडाशी आलेला घास हिसकावून घेतो, हा पुर्वानुभव आहे. त्यानुसार त्याने यंदा धुमाकूळ घालू नये, अशी माफक अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. यावेळी तो शांतपणे निघून गेला तर शेतकऱ्यांसाठी तो मोठा दिलासा असेल. स्थिती लक्षात घेता त्याची तीव्रता कमी राहण्याची शक्यता आहे. तसे झाले तर खरिपातील उत्पादन चांगले होईल. रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांमध्ये उत्साह संचारेल. पाऊस व्यवस्थित झाल्याने रब्बीतले उत्पादन वाढू शकते. दोन्ही हंगामाचे उत्पादन समाधानकारकपणे शेतकऱ्यांच्या पदरात पडले तर, तो त्यांच्यासाठी सुवर्णकाळ ठरेल. हा काळ शेतकऱ्यांना अनुभवायला मिळेल, अशी प्रार्थना आपण वरुणराजाकडे करूया.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# ज्ञानेश्वर माउलींनी चितारलेला वाङ्मय गणेश!

प्रा. दिलीप जोशी

भगवान गणेशांना हिंदू संस्कृतीत अग्रपूजेचा मान आहे. गणपती बाप्पा म्हटलं की, त्यांचे रूप आणि स्वरूप डोळ्यांसमोर येते ते गजमुख, लंबोदर, शूर्पकर्ण, चतुर्भुज, पाशांकुश इत्यादी. हेच स्वरूप माउलींनाही अपेक्षित आहे, पण माउली म्हणजे महावैष्णव आहेत. त्यामुळे त्यांनी श्रीगणेशाचे अरूपाचे वाङ्मय रूप ज्ञानेश्वरीत गोड शब्दात मांडले आहे. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातच-

*देवा तुची गणेशु । सकलार्थ मती प्रकाशू ।*
*म्हणे हा निवृत्तीदासू । अवधारिजोजी ॥२॥*

भगवान गणपतीला 'मती प्रकाशू' म्हटले आहे. सकलांना सकल मती देणारे, ज्ञानाचा प्रकाश देणारे बुद्धिदाता गणेश आहेत. भगवान गणेशाचे मूर्तिमंत वाङ्मय स्वरूप उपजतांच ज्ञानी असल्यामुळे केवळ ज्ञानेश्वर माउलीच रेखाटू शकतात. माउलींनी पहिल्याच अध्यायात केलेले गणेश वर्णन म्हणजे 'शब्द जैसे कल्लोळ अमृताचे' असेच आहे. पुढील दिव्य वर्णनावरून आपल्याला ते सहज लक्षात येईल.

*हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष । तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवित असे ॥३॥*

भगवान गणेश 'शब्दब्रह्म' म्हणजे वेद स्वरूप आहेत. आता या पलीकडे काहीच शिल्लक नाही. त्यात वर्णमालेतील सर्व निरातिशय निर्दोष असे वर्ण हेच त्यांचे उपांग, असे त्यांचे स्वरूप.

*स्मृति तेचि अवयव । देखा आंगिक भाव ।*
*तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥४॥*

आपल्या सनातन संस्कृतीत निरनिराळ्या स्मृती सांगितल्या आहेत. अशा याज्ञवल्क्यादी स्मृती म्हणजे भगवान श्रीगणेशाची अवयवे आहेत. या स्मृतीतील गर्भितार्थ सौंदर्य म्हणजे गणेशाचे लावण्य लक्षण होय.

*अष्टादश पुराणें । तिची मणिभूषणें । पदपद्धति खेवणें । प्रमेयरत्नांचीं ॥५॥*

अठरा पुराणे म्हणजे भगवान गणेशाचे रत्नजडीत अलंकार होत. बरं! हे अलंकार साधेसुधे नसून या पुराणरूपी अलंकारात सिद्धांत आणि दृष्टांतरूपी हिरेमोती रत्ने आणि तीही काव्यशास्त्र-विनोदाच्या पद्यकोंदणात म्हणजे काव्यकोंदणात नेमकी जडणघडण केलेली आहेत.

*पदबंध नागर । तेंचि रंगाथिले अंबर ।*
*जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें ॥६॥*

भगवान गणेशाचे वर्णन करताना माउलींनी गोड शब्द वापरला 'पदबंध नागर.' इथे पदबंध म्हणजे शब्दसौंदर्य, शब्दबद्धता आणि नागर म्हणजे नागरी अर्थात आपली वाटणारी, सहज उमगणारी अशी सुंदर मातृभाषा होय. अशा सहज संक्रमित होणाऱ्या शब्दांचे विविधरंगी वस्त्र आणि तेही साहित्य धाग्यांनी विणलेले आणि शब्दरचनेत अनुप्रासादी वाङ्मयीन अलंकार वापरले जातात; तो या वस्त्राचा पोत आहे. असे वस्त्र श्रीगणेशांनी परिधान केलेले आहे.

*देखा काव्य नाटका । जे निर्धारितां सकौतुका ।*
*त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ॥७॥*

काव्य नाटकरूपी घुंगुरतोडे त्यांच्या पायात ज्यांच्यातून येणारा गोड ध्वनी रुणझुणतो.

*नाना प्रमेयांचि परी । निपुणपणें पाहतां कुसरी ।*
*दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ॥८॥*

भगवान गणेशाने जी रत्ने परिधान केली ती प्रमेयरूपी आहेत.

*तेथ व्यासादिकांच्या मतीं । तेचि मेखळा मिरवती ।*
*चोखाळपणें झळकती । पल्लवसडका ॥९॥*

भगवान गणेशाच्या कमरेला बांधलेला शेला हा व्यासांसारखे अनेक जे कविगण आहेत, त्यांच्या बुद्धिमतीचा आहे.

*देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेची भुजांची आकृति ।*
*म्हणवोनी विसंवादे धरिती । आयुधें हातीं ॥१०॥*

आपल्या संस्कृतीतील षड्दर्शने म्हणजे गणेशाची आयुधे. एरवी श्रीगणेश चतुर्हस्तम् आहेत, पण माउलींचा गणेश सहा हातांचा आहे.

*तरी तर्कु तोचि फरशु । नीतिभेदु अंकुशु ।*
*वेदांतु तो महारसु । मोदकु मिरवे ॥११॥*

त्यातील तर्कशास्त्र म्हणजे श्रींच्या हातातील परशू, न्यायशास्त्र जणू अंकुश तर हातातील मोदक म्हणजे वेदांत महारस होय.

*एके हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु ।*
*तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकांचा ॥१२॥*

एका हातातील खंडित दंत म्हणजे भगवान बुद्धांचा अज्ञेय शून्यवाद होय.

*मग सहजें सत्कारवादु । तो पद्मकरु वरदु ।*
*धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभयहस्तु ॥१३॥*

सांख्यशास्त्र, धर्मसूत्रे म्हणजे अभयकर अर्थात वरदहस्त होय.

*देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु ।*
*जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा ॥१४॥*

निरक्षिर विवेकाची महासुख देणारी सरळ सोंड ज्यांची आहे ते गणेश.

*तरी संवादु तोचि दशनु । जो समता शुभ्रवर्णु ।*
*देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु ॥१५॥*

आपले तत्त्वज्ञान संवादावर आधारित आहे. भगवान गणेशाचा शुभ्र दात म्हणजे विधायक संवाद आहे.

*मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ।*
*बोधमदामृत मुनी । अली सेविती ॥१६॥*

पूर्वमीमांसा आणि उत्तरमीमांसा हे श्रीगणेशाचे कान असून त्यांच्या गंडस्थळातून पाझरणारे ज्ञानामृत मुनीरुपात असणारे भुंगे ग्रहण करीत आहेत.

*प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ ।*
*सरिसेपणें एकवटत इभ । मस्तकावरी ॥१७॥*

जिथे द्वैत आणि अद्वैत एकवटतात असे श्रीगणेशाचे शरीर ज्यावर श्रुतिस्मृतीतील तत्त्वज्ञान पोवळ्यांच्या रूपाने आहे.

*उपरि दशोपनिषदें । जियें उदारें ज्ञानमकरंदे ।*
*तियें कुसुमें मुगुटीं सुगंधें । शोभती भलीं ॥१८॥*

श्रीगणेशाच्या अंगावरील सुगंधित फुले म्हणजे दशोपनिषद आहेत.

*अकार चरणयुगल । उकार उदर विशाल ।*
*मकार महामंडल । मस्तकाकारें ॥१९॥*

भगवान गणेशाचे नितांतसुंदर असे ओंकार स्वरूप माउलींनी शब्दात चितारले आहे. ॐकारातील अकार हे चरणयुगुल आहे, उकार गणेशाचे विशाल उदर तर मकार हे मस्तक आहे.

*हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ।*
*तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥*

हे अकार, उकार आणि मकार एकवटून शब्दब्रह्म तयार झाले. तेच आदिबीज म्हणजे ॐ कार गणेश होय. माउलींनी चितारलेले हे वाङ्मय गणेश माउलींच्या उपजत प्रतिभेचे दर्शन होय. चार वेद, सहा शास्त्र, विविध उपनिषद, अलंकार, प्रमेय या सर्व साहित्य कृती आणि साहित्य भागांच्या वापरातून निर्माण केलेले भगवान गणेशस्वरूप अनन्यसाधारण आहे. हाच तर ब्रह्मरस गणेश आहे.

९८२२२६२७३५

## समाज दखल घेतो...

रविवार ८ सप्टेंबरच्या तरुण भारतात 'श्रीमद्‌भागवत श्रवण- दिव्य अनुभूती' हे ज्येष्ठ माजी संपादक व समीक्षक ल. त्र्यं. जोशी यांचे पत्र वाचण्यात आले. त्यांनी त्यांच्या आठवणी, अनुभव कथन करताना भागवत कथाकार ह. भ. प. अभिजीत श्रीराम जोशी यांची वैशिष्ट्येदेखील नमूद केली आहेत.

अभिजीत हे सुप्रसिद्ध भागवत कथाकार श्रीरामपंत जोशी यांचे चिरंजीव असून त्यांचा सशक्त वारसा पुढे नेत आहेत. प्रताप नगरमधील श्री दुर्गा मंदिर देवस्थानमध्ये श्रीरामजी यांनी तब्बल १६ वर्षे भागवत कथा सेवा दिली आहे. सध्या त्यांच्या वार्धक्यामुळे अभिजीत यांनी ही उणीव भरून काढली, ही देवस्थान व सर्व श्रोत्यांसाठी आनंदाची बाब आहे. लक्ष्मणरावांनी या आयोजन निमित्ताने देवस्थान व्यवस्थापनाबद्दल जे कौतुकास्पद लिहिले आहे, त्याकरिता विश्वस्त मंडळ त्यांचे आभारी आहे. देवस्थानने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे कसे सकारात्मक पडसाद उमटतात, हे या सूचक समीक्षेतून कळते आणि कौतुकाची थाप पाठीवर पडली की विश्वस्त मंडळींना देखील हुरूप येतो. समाजातील भाविकांच्या सात्त्विक आनंदासाठी विश्वस्त मंडळी सतत कार्यरत राहतील, अशी एक विश्वस्त म्हणून ग्वाही देतो.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

## वाचक पत्रे

### कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' जेव्हा आपलाच सगासोयरा, नात्यातला, गोतातला आपल्या जिवावर उठतो तेव्हा ही म्हण वापरली जाते. कुऱ्हाडीचा दांडा लाकडाचाच असतो व तो उचलूनच झाड म्हणजे त्या लाकडाचेच गणगोत, भाऊबंद तोडले जातात. एक प्रकारे लाकडी दांडाच आपल्याच गणगोताचा काळ ठरतो. आजच्या शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या पक्षाबाबत ही उक्ती तंतोतंत लागू पडते. पक्षाचे नेते, प्रवक्ते खासदार संजय राऊत सातत्याने आपल्या विधानाने पक्षाचे म्हणजे उद्धव ठाकरे तसेच स्वत:चे हसू तर करून घेतात पण त्यापेक्षा पक्षाचे नुकसान जास्त करतात. आज शिवसेना उद्धव ठाकरेंची जी अवस्था आहे तिला पक्षातील नेते मंडळीच कारणीभूत आहेत. भाजपा आणि शिवसेना यांच्यात मुख्यमंत्री पदावरून गेल्या विधानसभा निकालानंतर जे राजकारण झाले त्यावेळी स्वत: उद्धव ठाकरे यांनी राजकीय सामंजस्य दाखविणे आवश्यक होते. काही मार्ग निघतो का, हे पाहणे गरजेचे होते. पण आपल्या पक्षाचे सर्व अधिकार संजय राऊत यांच्यासारख्यांना त्यांनी दिले असल्याने त्यांनी आपल्या कुवतीप्रमाणे शरद पवार यांच्याशी युतीसंबंधी बोलणे सुरू ठेवले. शरद पवारांनी आपल्या राजकीय अनुभवाचा फायदा घेत मुख्यमंत्रिपद उद्धव ठाकरे शिवसेनेला देऊन एका फटक्यात शिवसेनेचे हिंदुत्वाचे राजकारण पूर्णतः संपविले. पण त्यापेक्षा एकसंघ शिवसेना त्यांनी संपवली. आज शिवसेना पक्षात फुट पडून अडीच तीन वर्षे पार पडली आहेत. यानंतर देशाच्या लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या त्या निकालात दोन शिवसेना गटांपैकी कोणत्या गटाला राज्यातील जनतेचा पाठिंबा आहे, हे दिसून आले आहे. या निकालाचे खरे तर उद्धव ठाकरे यांनी विश्लेषण करावयास पाहिजे होते पण आज ही तीच जपमाळ ते ओढताना दिसतात. आज त्यांनी राजकीय परिपक्तता दाखवत आपला कोण हितचिंतक आणि कोण हितशत्रू ओळखले पाहिजे. कारण, येणारी विधानसभा निवडणूक उद्धव ठाकरेंना तसेच त्यांच्या पक्षाला राज्यात पुढे भवितव्य आहे की नाही, हे ठरविणार आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### ढोल-ताशे, डीजे आणि लेझर

यंदाच्या गणेशोत्सवात गणेश चतुर्थीच्या दिवशी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांत बाप्पांचे अगदी थाटात आणि उत्साहात आगमन झाले. यावेळी ढोल-ताशा पथकांचा वापर अनेक मंडळांनी बाप्पाच्या आगमनप्रसंगी केला. त्याच्या प्रचंड आवाजाचा विचार मंडळांनी का केला नाही? लहान बालके आणि वृद्धांना त्याचा किती त्रास होतो, याबाबत बाप्पाच्या भक्तांनी विचार करणे आवश्यक आहे. त्यांच्यात श्रवणदोष निर्माण होऊ शकतो. डीजेवर अप्रासंगिक गाणी अतिशय मोठ्या आवाजात वाजवून त्यावर ओंगळ नृत्य करणे अशोभनीय आहे. आजकाल अतिशय प्रखर लेझर किरणांचा वापर बाप्पाच्या मिरवणुकीत करण्यात येतो. त्याच्या दुष्परिणामाचा विचार कोण करणार? मिरवणुकीत सहभागी झालेल्या अनेकांचे डोळे इजा झाल्याने लाल झाल्याचे आढळले आहे. काही व्यक्तींना नेत्ररोग तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागलेला आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे आजकालचे स्वरूप योग्य आहे का? बाप्पांच्या मिरवणुकीमुळे नागरिकांना मनस्ताप आणि आरोग्यावर घातक परिणाम होणे गणेशोत्सव मंडळांना आवडेल का? अनंत चतुर्दशीला बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीत ढोल-ताशे आणि डीजे यांच्या आवाजावर नियंत्रण असावे. लेझर आणि बीम लाईटचा वापर अजिबात करू नये, ही आग्रही सूचना आणि कळकळीची विनंती!

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७


वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# २९ वर्षे बाप्पाची आराधना करणारा 'अवलिया'

भारत देशातच नव्हे तर संपूर्ण जगात गणपती बाप्पाचे भक्त लाखोंनी आहेत. श्री गणेशोत्सव महोत्सवात तर बाप्पाची मनोभावे सेवा करणारे करोडो भक्त आहेत. परंतु असेही काही भक्त आहेत की जे नित्यनियमाने श्री गणेशाची भक्तीभावाने सेवा करतात. सोलापुरातही असा एक अवलिया गणेश भक्त आहे की, जो गेल्या सलग २९ वर्षांपासून तुळजापूर रोडवरील तळे हिप्परगा येथील श्री मश्रूम गणपतीच्या दर्शनाला नित्यनियमाने जातो आहे. या अवलिया गणेश भक्ताचे नाव आहे अविनाश उर्फ बाळासाहेब ठेंगील होय. बाळासाहेब हे लहानपणापासूनच गणपती बाप्पाचे भक्त आहेत.




शालेय जीवनातच सन १९७३ मध्ये त्यांनी बाल मित्रांसमवेत रेल्वे लाईन्स येथे श्री गणेश तरूण मंडळाची स्थापना केली. जुळे सोलापुरात वास्तव्यास असलेले अविनाश ठेंगील हे गेली २९ वर्षे सलग नित्यनियमाने न चुकता तळे हिप्परगा येथील श्री मश्रूम गणपतीच्या दर्शनाला जातात. जेंव्हा कधी ते सोलापुरात नसतात तेंव्हाच फक्त ते जावू शकत नाहीत जिथे असतात तेथूनच ते मनोभावे प्रार्थना करतात. अन्यथा ऊन, वादळ, वारा, पाऊस काहीही असो ते मश्रूम गणपतीच्या दर्शनाला जाणे चुकतव नाहीत. विशेष म्हणजे मागे एकदा त्यांच्या चारचाकी वाहनाचा अपघात झाला होता. तेंव्हा देखील त्यांनी प्रथमोपचार घेवून थेट हिप्परगा येथील मश्रूम गणपती बाप्पाच्या पायावर माथा टेकवला आणि श्रींच्या चरणी सुरु असलेली आपली नित्य दर्शनाची प्रथा मोडू दिली नाही. अशी अतूट गणेशभक्ती असलेल्या या अवलिया गणेश भक्ताची आठवण श्री गणेशोत्सवात झाल्याशिवाय रहात नाही. आई-वडिलांसह श्रध्दास्थान असलेले डॉ. डी. ई. मिस्त्री यांच्या स्मृतीप्रित्यर्थ अविनाश यांनी तळे-हिप्परगा येथील श्री मश्रूम गणपती मंदिरातील नूतनीकरणासाठी यथायोग्य योगदान देखील दिलेले आहे. अविनाश ठेंगील यांची श्री गणेश सेवा अशीच अविरत सुरु राहो आणि त्यांच्या हातून सत्कर्म घडत राहो, हिची बाप्पा चरणी प्रार्थना. गणपती बाप्पा मोरया...



# लाडक्या भावांना मिळाली संधी !

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत महापालिकेत १५६ शिकाऊ प्रशिक्षणार्थ्यांना दिले रुजू होण्याचे आदेश

**सोलापूर, दि. ९ सप्टेंबर-**

लाडकी बहीण योजनेनंतर लाडक्या भावांना देखील मदतीसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत संधी दिली आहे. या अंतर्गत सोलापूर महापालिकेत १५६ शिकाऊ प्रशिक्षणार्थींना रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी हे आदेश काढले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली जात आहे. या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जाणार आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्ष या वयोगटातील असले पाहिजे.विविध क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे (इंटर्नशिप) उमेदवारांना रोजगारक्षम करून उद्योगाकरिता कुशल मनुष्यबळ तयार करण्यात येणार आहे.

भविष्यातील रोजगाराची आव्हाने लक्षात घेता आतापासूनच कार्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून युवकांना रोजगारक्षम बनवण्याचा या योजनेचा उद्देश आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, या योजनेतून सरकारी तसेच खाजगी आस्थापनांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. या योजनेसाठी युवकांनी प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे.

दरम्यान, या योजनेअंतर्गत सोलापूर महापालिकेतील विविध विभागात १५६ प्रशिक्षणार्थींना रुजू होण्याच्या आदेश दिले आहेत. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी याबाबतचे आदेश काढले आहेत. सोलापूर महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागामध्ये हे रुजू आदेश घेण्यासाठी शिकाऊ प्रशिक्षणार्थींची गर्दी झाली होती.

यामध्ये १२ वी उत्तीर्ण शिकाऊ प्रशिक्षणार्थी - ६०, आय.टी.आय व पदविका उत्तीर्ण- १७, पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण - ७९ प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश आहे. महापालिकेतील विविध विभागांमध्ये कनिष्ठ अभियंता, सहाय्यक संगणक चालक ,वायरमन, वेल्डर , वाहनचालक, ड्रेसर, संगणक चालक, डेटा ऑपरेटर, क्लर्क, सहाय्यक शिक्षक, फिल्ड वर्कर, मिडवाइफ, शारीरिक शिक्षक, शिपाई आदी पदांचे प्रशिक्षण घेणार आहेत.




### असे मिळणार दरमहा विद्यावेतन

उमेदवारांना सहा महिन्याच्या प्रशिक्षण कालावधीत १२ वी उत्तीर्ण- ६ हजार रुपये, आय.टी.आय व पदविका उत्तीर्ण- ८ हजार रुपये, पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण - १० हजार रुपये दरमहा विद्यावेतन मिळणार आहे. कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) कालावधी सहा महिने रहाणार आहे. प्रशिक्षणाअंती प्रशिक्षित प्रशिक्षणार्थीस कायम नोकरीचा हक्क राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.



# तीन आदर्श शिक्षक पुरस्काराने प्राचार्य डॉ.हारून रशीद बागवान सन्मानित

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सचे प्राचार्य डॉ. हारून रशीद अहमद साहब बागबान यांना इंटरनॅशनल स्टीम अँड रोबोटिक्स चॅम्पियनशिप, जनक्रांती पत्रकार संघ व बद्रोजमा सामाजिक संस्था व सोलापूर शहर बागबान जमियत सिटी ट्रस्ट या तीन संस्थांच्या वतीने डॉ. बागबान यांना त्यांच्या शिक्षण आणि प्रशासन क्षेत्रातील बहुमोल सेवेची दखल घेऊन त्यांना ''राज्यस्तर आदर्श प्राचार्य पुरस्कार, आदर्श मुख्याध्यापक व आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. डॉ. बागबान यांचे राजा बागबान, साहिर नदाफ, अल्ताफ सिद्दीकी, मुझम्मील शेख, वसीम नल्लामंदू, जाकीर शाहपुरे, मुहम्मद अली शेख, इसहाक बाटघर, मोहसीन माशाल, महमूद खतीब, अब्दुल रशीद शेख, वसीम शेख, डॉ.शफी चौबदार, डॉ. सुरय्या परवीन जहागीरदार, निकहत नल्लामंदू , रियाज सय्यद, इश्तियाक तारानाईक, इद्रिस पेरमपल्ली, फौजिया शेख, हाजरा माशालवाले, फरजाना नदाफ, अब्दुल रऊफ पटेल , इलियास सौदागर, मुहम्मद सादिक बागबान, जुल्कीफल बागबान, जरीर मुहम्मद, सुमामा मुहम्मद, तसेच ''पानगल हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज'', बेगम कमरून्नीसा हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, ''इकरा अकादमी आणि ''इकरा अंजुमन'' या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# बार्शीत ग्रोमॅक्स तुळजाभवानी ट्रॅक्टरच्या नवीन शोरुमचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० सप्टेंबर-**

येथील लातूर रोड ग्रोमॅक्स कंपनीच्या तुळजाभवानी ट्रॅक्टर या नवीन ट्रॅक्टर शोरुमचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात मंगळवारी सकाळी पार पडला.

ग्रोमॅक्स कंपनीचे नॅशनल सेल्स हेड गौरव मागो व आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र स्टेट हेड कैलास तासकर, सर्व्हिस इंजिनियर हेड अशोक इंगळे आदींसह राऊत परिवारातील सदस्य व मान्यवर उपस्थित होते. आ. राजेंद्र राऊत म्हणाले की, राऊत परिवार पूर्वीपासूनच शेती व जोडधंदा या व्यवसायात जोडला गेलेला आहे. अनेक वर्षांपासून शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी स्वतःचा ट्रॅक्टर शोरुमचा व्यवसाय करण्याचा आपला मानस होता. आज खऱ्या अर्थाने तो पूर्णत्वास आला आहे. शेतकरी बांधवांना माफक दरात ट्रॅक्टर मिळण्यासाठी सहकार्य केले जाणार आहे. तसेच या ट्रॅक्टर शोरुममुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांना चांगल्या क्वालिटीचा ट्रॅक्टर उपलब्ध होणार आहे. ग्रोमॅक्स कंपनीचे गौरव मागो म्हणाले की, ग्रोमास कंपनी ही अनेक वर्षापासून गुजरातमध्ये कार्यरत असून या कंपनीचे तीन जिल्ह्याचे अधिकृत वितरक म्हणून राऊत बंधूंच्या तुळजाभवानी ट्रॅक्टरची नियुक्ती करण्यात आली आहे. या शोरुममधून अनेक शेतकऱ्यांना त्यांचा स्वतःचा ट्रॅक्टर घेण्याचे स्वप्न पूर्णत्वास येणार आहे. ग्रोमॅक्स कंपनीचे ट्रॅक्टर हे इतर कंपनीच्या ट्रॅक्टरपेक्षा पॉवरमध्ये सरस असून शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर घेण्यासाठी या कंपनीची निवड करावी. कंपनीमार्फत ट्रॅक्टरला पाच वर्षाची पूर्ण सर्व्हिस गॅरंटी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष ॲड. असिफभाई तांबोळी, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, कुबोटा ट्रॅक्टरचे संतोष ठोंबरे, मधुबन ट्रॅक्टरचे प्रवीण कसपटे, होंडाचे कादे आदींसह संजय राऊत, माजी नगरसेवक विजयनाना राऊत, अभिजीत राऊत, बाजार समितीचे माजी सभापती रणवीर राऊत, रणजीत राऊत आदींसह भाजप पदाधिकारी, नगरसेवक व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावीर हायस्कूलमध्ये अग्निशमन दलाची प्रात्यक्षिके

**सोलापूर, दि. ९ सप्टेंबर-**

विकास नगर परिसरातील महावीर हायस्कूलमध्ये अग्निशमन दलाने प्रात्यक्षिकेसह अग्निशमन दलाचे कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

संरक्षण क्षेत्रातील भूजल, वायुदल, जलदला बरोबर चौथा जल म्हणजे अग्निशमन दल होय. अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी राकेश साळुंके यांनी आग लागू नये म्हणून काय काळजी घ्यावी, आग लागल्यानंतर कशा पद्धतीने आग विझवण्यासाठी प्रयत्न करावे आणि अग्निशमन गाडी केव्हा आणि कसे फोन करून बोलवावे याविषयी सविस्तर माहिती दिली.

तसेच यावेळी फायरमन नेताजी दराडे यांनी आगीचे प्रकार, आग लागण्यासाठी उपयुक्त घटक, भाग विझवण्यासाठी काय करावे याविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली.

यानंतर प्रशालेच्या मैदानात आग लावून ते आग लहान स्वरूपात असेल तर ते आपल्याकडे उपलब्ध असलेल्या अग्निशमन बम्ब द्वारे कशा पद्धतीने आग विजवावे हे प्रात्यक्षिके द्वारे दाखविले तसेच आग मोठ्या स्वरूपामध्ये जर असेल तर अग्निशमन गाडी आल्यानंतर पाण्याचे विविध प्रकारचे फवारे मारून मोठी आग कशा पद्धतीने भिजविले जाते हे सुद्धा प्रात्यक्षिके द्वारे विद्यार्थ्यांना दाखविले.

या कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना माहिती आणि प्रात्यक्षिकेद्वारे समजावून सांगितल्याबद्दल अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी राकेश साळुंके, सहाय्यक अधीक्षक अच्युत दुधाळ, फायरमन नेताजी दराडे, गौतम आव्हाड, करण रजपूत, योगेश ठोंबरे, महेश गेंड, कल्याणी धप्पा धुळे, मंगेश खंदारे आणि पौर्णिमा रोकडे यांचा सत्कार मुख्याध्यापिका उज्वला पाटील आणि चतुरबाई श्राविका विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रूपाली चेंडके यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक मनोजकुमार गायकवाड यांनी केले.



# प्रत्येकाशी चांगले बोला : प्रा. गणेश शिंदे



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० सप्टेंबर-**

प्रत्येकाशी गोड, चांगले , सुखकारक बोला. यामुळे जीवनातील कटू प्रसंग टाळून जीवन सुसह्य बनवता येते. सुख अंतिम नातं आहे तरच जीवन सुखमय होईल, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. गणेश शिंदे यांनी केले.

स्वामी विविकानंद प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या वतीने गणेशोत्सव काळात गेली १२ वर्षांपासून समाज प्रबोधन व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. मंगळवारी दुसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. याप्रसंगी आ. सचिन कल्याणशेट्टी, ॲड. हर्डीकर, गोकुळ शुगर्सचे चेअरमन दत्ता शिंदे, कार्तिक पाटील, धनंजय गाढवे, राजू थंब, अशोक येणगुरे, चंद्रकांत दसले, डॉ. त्रिगुळे, बाळासाहेब एकबोटे, विलास कोरे, महेश कापसे, सायबण्णा जाधव, निंगुताई हिंडोळे, उज्वलाताई सरदेशमुख, अप्पू रोडगे, मल्लिकार्जुन आळगी, रमेश वाले, बाळा शिंदे, राजकुमार झिंगाडे, अमोल कोकाटे, गणेश सुरवसे, दत्ता कटारे, शिवलिंग स्वामी, उपाध्यक्ष बसवराज माशाळे, दत्तकुमार साखरे, महेश हिंडोळे, प्रशांत लोकापुरे, शिवकुमार कापसे, राजशेखर हिप्परगी, ओंकारेश्वर उटगे, प्रा. आडवीतोटे, राजू नागुरे, स्वामीनाथ गुरव, विद्याधर गुरव, दिनेश पटेल यांच्यासह मोठ्या प्रमाणात महिला-पुरुष श्रोते उपस्थित होते.

## निधन वृत्त

### माजी पोलीस उपायुक्त प्रकाश भोसले

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**



विजापूर रोड इंदिरानगर येथे रहिवासी माजी पोलीस उपआयुक्त प्रकाश अनंतराव भोसले (वय ७६) यांचे अल्प आजाराने निधन झाले. ज्येष्ठ स्वतंत्र सेनानी अनंतराव भोसले यांचे चिरंजीव व अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य निशा भोसले यांचे ते पती होत. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा सून नाथ नातवंडे मुली जावई असा परिवार आहे.

### सुमन हिंगे

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**



सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सुमन प्रभाकर हिंगे ( वय ८२, रा. भूम, हल्ली मुक्काम सोलापूर ) यांचे दि ८ सप्टेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर येथील स्मशानभुमित सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्च्यात दोन मुले, सुना, तीन मुली, जावाई ,नातवंडे असा परिवार आहे. नेहरु युवा केंद्राचे माजी राज्य संचालक प्रमोद हिंगे व पत्रकार प्रविण हिंगे यांच्यास त्या आई होत.

### शिवाजी ठोंबरे

**अणदूर, दि. १० सप्टेंबर-**बारूळचे ज्येष्ठ नागरिक व माजी सैनिक शिवाजी कोंडाप्पा ठोंबरे (वय ७९) यांचे पुणे येथील मिलिटरी हॉस्पिटलमध्ये दीर्घ आजाराने निधन झाले. माजी सरपंच व विद्यमान सोसायटी चेअरमन बाबुराव ठोंबरे व उत्तरेश्वर ठोंबरे यांचे ते ज्येष्ठ बंधू होते. त्यांच्यावर बुधवार सकाळी ९ वाजता बारुळ येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.



### प्रयागबाई कदम

**सोलापूर, दि. ९ सप्टेंबर -**

महानगरपालिकेचे माजी परिवहन सदस्य संतोष कदम यांच्या मातोश्री स्वातंत्र्यसैनिक प्रयागबाई दिगंबर कदम (वय ९२) यांचे ७ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्याच्या पश्चात दोन मुले, ३ मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे.



### कस्तुरबाई कल्याणशेट्टी

**सोलापूर, दि. ९ सप्टेंबर -**

कस्तुरबाई रेवणसिध्दप्पा कल्याणशेट्टी (वय ९१) यांचे वृद्धापकाळाने ८ सप्टेंबरला निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे व मुली, जावई असा परिवार आहे. सोलापूर शिवशिंपी समाजाचे माजी संचालक कै. रेवणसिध्दप्पा यांच्या पत्नी होत.




## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

SHRI MAHAVIR URBAN CO-OP BANK LTD. SOLAPUR — ॥ धनवृद्धि समृद्धि ॥

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

### जाहिर प्रसिध्दीकरण

नमुना झेड (नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)

**स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर C/O श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्याअर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजी. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली वा पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण्याऱ्याने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारा नुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को. ऑप बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अं. क्र. | वसुली दाखला व दिनांक | थकबाकी कर्जदाराचे/ जामीनदाराचे नाव | दिनांक अखेर व रक्कम व त्यावरील व्याज + मुद्दल + दंड व्याज + कोर्ट खर्च + इतर खर्च | गावाचे नाव | सि.स.नं./ गट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महावीर बँक / कलम १०१/ ७७८/२०२२-२३ दि. ०३/०३/२०२३ | **कर्जदार** केदार महादेव हदरे : प्रो. पा : केदार महादेव हदरे **जामीनदार** १. श्रीशैल शरणाप्पा माळी २. विजय दौलप्पा बिराजदार | रु. २५,१३,९२८/- (अधिक दि. ०१/०८/२०२२ पासून पुढील व्याज, दंड व्याज व इतर खर्च) | डि व सब डि सोलापूर पैकी ता. दक्षिण सोलापूर हद्दीतील सोलापूर हद्दीतील ग्राम पंचायत यापैकी पूर्व-पश्चिम मध्य भागातील मौजे बोरामणी येथील | गट नं. ४४२ | ०० हेक्टर ७९ आर याचे आकार रु. २.९८ पैसे + पो.ख. ०० हे. ०१ आर आकार रु. ०.६७ असे एकूण ०० हे. ८० आर. |

वरील सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबापत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहिर प्रसिध्दीकरण दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा अन्यथा, तसे न केल्यास मुदतीनंतर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पाडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल, तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ०६/०८/२०२४**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर



## TENDER NOTICE

A) **Supply, Installation, Commissioning & Testing of Seed Cleaning & Grading Unit (2 TPH) ( Semi Automatic)**
B) **Supply, Installation, Commissioning of Weight Bridge (50 MT)**
C) **Supply, Installation, Commissioning of Diesel Generator (100KVA)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. Naitik **Agro Producer Company Ltd.Tq. Washi, Dist. Dharashiv** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org**, in the tender and procurement section. The last date for submission of Offline bids is **24/09/2024 up to 14.00 PM**. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Naitik Agro Producer Company Ltd.Tq. Washi, Dist. Dharashiv**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

मुख्य वैद्यकीय अधीक्षक, विभागीय रेल्वे रुग्णालय, सोलापूर यांनी निविदा मागवली. साठी आणि भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने पासून खाली नमूद केलेल्या कामाची अंमलबजावणी अनुभवी कंत्राटदार. **कामाचे नाव:** विभागीय रेल्वेसाठी तागाचे कपडे धुणे हॉस्पिटल, सोलापूर. निविदा सूचना क्रमांक: U/MD/34/वॉशिंग लिनेन/२०२४- 27/IREPS/TN दिनांक 09.09.2024. **कामाची अंदाजे किंमत:** रु. 4,35,986.30 (रु. चार लाख पस्तीस हजार नऊशे शाऐंशी आणि तीस पैसे) जीएसटी आणि सर्व ३ वर्षांसाठी कर. बयाणा पैसा ठेव: रु ८८००/- (रु. आठ हजार आठशे फक्त) (परतावायोग्य) साठी बयाणा पैसे जमा केले जाऊ शकतात च्या माध्यमातून ई-पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाइन वेबसाइट www. ireps.gov.in. टेंडर कागदपत्र उपलब्ध: निविदा दस्तऐवज वेबसाइटद्वारे सूचित केले जाईल www.ireps.gov.in. टेंडरिंग एजन्सी द्वारे मंजूर केलेले डिजिटल टोकन असणे आवश्यक आहे IREPS. सबमिशनची अंतिम तारीख आणि वेळ निविदा आणि निविदा वेळेत उघडणे आणि तारीख: 04.10.2024 (10.00 तासांपर्यंत) वेब पोर्टलद्वारे ऑनलाइन फक्त www.ireps.gov.in. च्या ऑफरची वैधता निविदा: तारखेपासून 60 दिवस निविदा सादर करणे. ची निर्धारित तारीख कामाची सुरुवात: 15 दिवसांच्या आत चे पत्र जारी केल्याच्या तारखेपासून स्वीकृती किंवा च्या सूचनांनुसार सीएमएस सोलापूर. साठी प्राधिकरण आणि जागा निविदा खर्च आणि ईएमडी सादर करणे, आवश्यक कागदपत्रे (असल्यास) आणि निविदेबाबत खुलासा मागत आहे कागदपत्रे: ई-पेमेंटद्वारे ऑनलाइन www.ireps.gov.in या वेब पोर्टलचे गेटवे फक्त
ANJ-21
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### चिराग सेन पराभूत, त्रिशा-गायत्री उपउपांत्यपूर्व फेरीत



**हाँगकाँग :** भारताच्या चिराग सेन आणि मानव चौधरी यांना मंगळवारी हाँगकाँग बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या पात्रतेच्या उपांत्यपूर्व फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले, तर त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीचा उपउपांत्यपूर्व फेरीत पराभव झाला. त्रिशा आणि गायत्री या जोडीने बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन वर्ल्ड टूर सुपर ५०० स्तरीय स्पर्धेत युक्रेनच्या पोलिना बुग्रोवा आणि इव्हगेनिया कांतेमिर यांच्याविरुद्ध विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. भारतीय जोडीने हा शेवटचा-३२ सामना २१-१४, २१-१३ असा जिंकला. ऋतुपर्णा पांडा आणि श्वेतपर्णा पांडा यांना मात्र महिला दुहेरीच्या शेवटच्या सामन्यात चायनीज तैपेईच्या हसिह पेई शान आणि हंग एन-त्झू यांच्याकडून ११-२१, ८-२१ असा पराभव पत्करावा लागला. चिराग सेनने पात्रता फेरीच्या शेवटच्या १६ सामन्यात कॅनडाच्या लाइ यिन चुंगचा २१-१२, २१-१० असा पराभव केला परंतु त्याच देशाच्या शेंग झियाओडोंग या दुसऱ्या खेळाडूविरुद्ध पुढील अडथळा पार करण्यात तो अपयशी ठरला. झिओडोंगकडून १२-२१, २१-१३, १४-२१ असा पराभव पत्करून तो स्पर्धेतून बाहेर पडला. मानव चौधरीने पात्रता फेरीच्या शेवटच्या १६ मध्ये युक्रेनच्या ओलेक्सी टिटोव्हचा २१-१४, २१-१९ असा पराभव केला पण पुढच्या फेरीत हाँगकाँगच्या चॅन यिन चक विरुद्ध एकतर्फी झालेल्या लढतीत त्याला ६-२१, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला.

### ज्युनियर हॉकीमध्ये मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश विजयी

**जालंधर :** मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, मणिपूर, मिझोराम आणि पंजाब यांनी चमकदार कामगिरी करत मंगळवारी येथे १४ व्या पुरुष राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सामने जिंकले. पहिल्या सामन्यात मध्य प्रदेशने छत्तीसगडचा ६-० असा तर उत्तर प्रदेशने चंदीगडचा ८-० असा पराभव केला. हिमाचल प्रदेशने अन्य एकतर्फी लढतीत गोव्याचा ११-१ असा पराभव केला तर मणिपूरने महाराष्ट्राविरुद्ध ७-० असा विजय मिळविला.

# भारतीय खेळाडूंचे जंगी स्वागत

### पॅरालिम्पिकपटूंनी पटकावले सप्त सुवर्ण

### ९ रौप्य, १३ कांस्य पदकांवरही भारतीय मुद्रा



पॅरिस पॅरालिम्पिकमधून मायदेशी परतल्यानंतर विमानतळावर अभिमानाने पदके दाखवताना भारतीय खेळाडू

**♦ नवी दिल्ली, १० सप्टेंबर**

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये इतिहास घडवल्यानंतर भारतीय तुकडी मंगळवारी नवी दिल्लीत परतली. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. भारतीय संघाने पॅरालिम्पिकमध्ये ७ सुवर्ण, ९ रौप्य आणि १३ कांस्यांसह २९ पदके जिंकली.

ऐतिहासिक मोहिमेच्या समाप्तीनंतर, भारताने टोकियो २०२० पॅरालिम्पिकमध्ये मिळविलेल्या १९ पदकांच्या मागील विक्रमी पदकतालिकेला मागे टाकले.

पॅरा-शूटर अवनी लेखरा ही दोन पॅरालिम्पिक सुवर्णपदके जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली. तिने तिच्या महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टॅण्डिंग एसएच १ नेमबाजीत २४९.७ गुणांच्या जागतिक विक्रमासह विजेतेपद कायम ठेवले.

भारताने प्रथमच पॅरा-ॲथ्लेटिक्स स्पर्धेत एक महत्त्वपूर्ण नोंद केली. धरमबीर आणि पर्णव सुरमा यांनी पुरुषांच्या क्लब थ्रो एफ ५१ स्पर्धेत अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्यपदक जिंकले. या खेळातील भारताचे हे पहिले पदक होते. धरमबीरने ३४.९२ मीटरचा आशियाई विक्रमही केला. टी ६४ उंच उडी स्पर्धेत, प्रवीण कुमारने आशियाई विक्रमी २.०८ मीटर उडीसह पोडियमच्या शीर्षस्थानी राहून भारताला सहावे सुवर्णपदक मिळवून दिले. भारताने ही स्पर्धा सात सुवर्णपदकांसह पूर्ण केली.

हरविंदर सिंगने पोलंडच्या लुकाझ सिझेक विरुद्ध वैयक्तिक रिकर्व पॅरा-तिरंदाजीत सुवर्णपदक जिंकून भारताला ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिकमध्ये पहिला तिरंदाजी चॅम्पियन देखील मिळाला.

भारतीय भालाफेकपटू सुमित अंतिल हा पॅरालिम्पिक विजेतेपद कायम राखणारा पहिला भारतीय पुरुष ठरला, त्याने एफ ६४ स्पर्धेत ७०.५९ मीटरच्या आश्चर्यकारक पॅरालिम्पिक विक्रमी थ्रोसह सलग सुवर्णपदके जिंकली. त्याने टोकियो २०२० मध्ये स्वतःचा आधीचा विक्रम एकदा नव्हे तर तीनदा मोडला. (वृत्तसंस्था)

# भारताची विजयी घोडदौड कायम

### उपांत्य फेरीचा मार्ग मोकळा करणार

### आज मलेशियासोबत झुंज

**♦ हुलुनबुईर, १० सप्टेंबर**

चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारतीय संघाची आतापर्यंतची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे. भारताने पहिले दोन सामने जिंकले असून आता ११ सप्टेंबरला मलेशियाशी सामना करायचा आहे. विजयाची घोडदौड कायम राखून स्पर्धेत पुढे जाण्याच्या इराद्याने भारतीय संघ या स्पर्धेत उतरणार आहे.

भारतीय संघाने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय संघाने कांस्यपदक जिंकले होते, पण मैदानी गोल करू न शकणे ही त्यांच्यासाठी चिंतेची बाब होती. भारताने ऑलिम्पिकमध्ये १५ गोल केले, परंतु यामध्ये केवळ तीन मैदानी गोल समाविष्ट आहेत. मात्र, सध्याच्या स्पर्धेत त्याच्या युवा आक्रमकांनी ही चिंता काही प्रमाणात कमी केली आहे.

ऑलिम्पिकनंतर निवृत्त झालेला गोलरक्षक पीआर श्रीजेश यानेही या क्षेत्रात सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली होती. तो म्हणाला होता, जर आपल्याला भारतीय हॉकी संघाला पुढील स्तरावर घेऊन जायचे असेल आणि ऑलिम्पिकमध्ये सातत्याने पदके मिळवायची असतील, तर आपल्याला अधिक मैदानी गोल करावे लागतील कारण आपल्या संरक्षणालाही मर्यादा आहेत.



ऑलिम्पिकमध्ये सलग दुसरे कांस्यपदक जिंकण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली असून आशियाई चॅम्पियन्स चषकामध्येही त्याने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे.

भारताने पहिल्या सामन्यात यजमान चीनचा ३-० असा पराभव करून आपल्या विजेतेपदाच्या बचाव मोहिमेची शानदार सुरुवात केली होती. त्याने पुढच्या सामन्यात जपानचा ५-१ असा पराभव केला. भारताने आतापर्यंत केलेल्या आठ गोलांपैकी सात गोलचा समावेश आहे, तर युवा ड्रॅग-फ्लिकर संजयने जपानविरुद्ध पेनल्टी कॉर्नरचे रूपांतर केले.

सध्याची कामगिरी पाहता भारतीय संघ ही स्पर्धा जिंकण्याचा प्रबळ दावेदार आहे. दुसरीकडे, मलेशियाची कामगिरी आतापर्यंत चांगली झालेली नाही. एका सामन्यात त्याला पराभवाला सामोरे जावे लागले तर दुसऱ्या सामन्यात त्यांनी सामना बरोबरीत राखला.

सहा संघांच्या राऊंड रॉबिन सामन्यानंतर, अव्वल चार संघ १६ सप्टेंबर रोजी खेळल्या जाणाऱ्या उपांत्य फेरीत प्रवेश करतील. अंतिम सामना १७ सप्टेंबरला होणार आहे. (वृत्तसंस्था)

# निलंबनाविरोधात बजरंगची दिल्ली हायकोर्टात धाव

**♦ नवी दिल्ली, १० सप्टेंबर**

अल्बानियामध्ये ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या वरिष्ठ जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेपूर्वी कुस्तीपटू बजरंग पुनियाने नॅशनल अँटी डोपिंग एजन्सीच्या (नाडा) निर्णयाला आव्हान दिले आहे. निलंबनाला स्थगिती देण्यासाठी त्याने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

२१ जून रोजी नाडाने पुनियाला दुसऱ्यांदा निलंबित केले. नाडाने त्याच्यावर आरोपाची औपचारिक नोटीस जारी केली होती, ज्यामुळे त्याला प्रशिक्षण आणि स्पर्धांमध्ये भाग घेण्यास अपात्र ठरवण्यात आले होते.



आता बजरंगने असा दावा केला आहे की, नाडाचे हे वर्तन त्याच्या कोणत्याही व्यवसायात राहण्याच्या आणि उपजीविका मिळविण्याच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करत आहे. मनमानी पद्धतीने केलेले निलंबन मागे न घेतल्यास त्याला सक्तीने सेवानिवृत्ती घेण्यास बाध्य केले जाईल, असेही तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# पॅरालिम्पिकमध्ये पदकप्राप्त खेळाडू मालामाल

### सुवर्णसाठी ७५ लाख, रौप्यसाठी ५० अन् कांस्य पदकासाठी ३० लाख

### क्रीडा मंत्री मांडविया यांची घोषणा

**♦ नवी दिल्ली, १० सप्टेंबर**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेमध्ये पदक जिंकणाऱ्या भारतीय खेळाडूंसाठी क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी मंगळवारी रोख पारितोषिकांची घोषणा केली. यात सुवर्णपदक विजेत्याला ७५ लाख रुपये, रौप्य पदक विजेत्याला ५० लाख रुपये आणि कांस्यपदक विजेत्याला ३० लाख रुपये देण्यात येणार आहे.



तिरंदाज शीतल देवीसारख्या मिश्र सांघिक स्पर्धेत पदक जिंकणाऱ्या खेळाडूंना २२.५ लाख रुपये मिळतील. पदक विजेत्यांना सन्मानित करण्यासाठी येथे आयोजित एका भव्य कार्यक्रमात क्रीडामंत्र्यांनी ही घोषणा केली. २०२८ लॉस एंजेलिस पॅरालिम्पिकमध्ये अधिक पदके जिंकण्यासाठी पॅरा ॲथ्लिट्सना पूर्ण पाठिंबा आणि सुविधा देण्याचे आश्वासनही मांडविया यांनी दिले. ते म्हणाले, देश पॅरालिम्पिक आणि पॅरा स्पोर्ट्समध्ये पुढे जात आहे. २०१६ मधील ४ पदकांमधून, भारताने टोकियोमध्ये १९ पदके, पॅरिसमध्ये २९ पदके जिंकली आणि १८ व्या स्थानावर राहिले. आम्ही आमच्या सर्व पॅरा ॲथ्लिट्सना सर्व सुविधा देऊ जेणेकरून २०२८ लॉस एंजेलिस पॅरालिम्पिकमध्ये आम्ही अधिक पदके आणि सुवर्णपदके जिंकू शकू, असा विश्वास मांडविया यांनी व्यक्त केला. आपल्या चमकदार कामगिरीने भारताने पॅरालिम्पिक खेळांच्या इतिहासात ५० पदकांचा टप्पाही पार केला. (वृत्तसंस्था)

# अन्वरवर चार महिन्यांची बंदी, एआयएफएफ पीएससीचा निर्णय

**♦ कोलकाता, १० सप्टेंबर**

अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) मंगळवारी भारताचा आंतरराष्ट्रीय खेळाडू अन्वर अलीला चार महिन्यांसाठी क्लब फुटबॉलमधून निलंबित केले. या प्रकरणात मोहन बागान १२.९० कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईसाठी पात्र असल्याचे महासंघाने म्हटले आहे. एआयएफएफच्या खेळाडू स्थिती समितीने (पीएससी) अन्वरच्या पालक क्लब दिल्ली एफसी आणि ईस्ट बंगालला २०२४-२५ हिवाळी आणि २०२५-२६ उन्हाळ्याच्या दोन स्पर्धांसाठी खेळाडूंची नोंदणी करण्यास बंदी घातली आहे. (वृत्तसंस्था)

# पाटील, कुटे, शेटे, जगदाळे, जाधव या खेळाडूंची विजयी सलामी

### ● शालेय जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद व सोलापूर जिल्हा बुद्धिबळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या जिल्हा शालेय बुद्धिबळ स्पर्धेत सेंट जोसेफ हायस्कूल बार्शीचा आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त ध्रुव पाटील, एपीएस पिंपळनेरचा सोहम कुटे, सुलाखे हायस्कूल बार्शीचा सोहम शेटे, महाराष्ट्र विद्यालयाचा प्रसन्न जगदाळे, अनगर येथील कै. शंकरराव बाजीराव पाटील विद्यालयाचा शुभम जाधव यांनी सुरेख खेळ करत विजयी सलामी देत आकर्षक विजय मिळविले.

जिल्हा क्रीडा संकुल येथे झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार व क्रीडा मार्गदर्शक सत्येन जाधव यांनी बुद्धिबळ पटावरील सोंगटी खेळून करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर क्रीडाधिकारी नदीम शेख, आंतरराष्ट्रीय पंच व संघटनेचे सचिव सुमुख गायकवाड, वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, युवराज पोगुल, रोहिणी तूम्मा, जयश्री कोंडा, विजय पंगुडवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक गोकुळ यादव यांनी केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी बुद्धिबळ खेळाचे महत्व विशद करत खेळाच्या विकासासाठी खेळाडूंना व संघटनेस सर्वतोपरी मदत करणार असल्याचे सांगितले. या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षाखालील गटात विविध तालुक्यातील १६५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. स्पर्धेतील प्रथम आलेल्या पाच खेळाडूंची निवड पुणे विभागीय स्पर्धेसाठी होणार आहे.

# जीवनज्योत प्रशाला व इंडियन पब्लिक स्कूलच्या खेळाडूंचे वर्चस्व

### ● दक्षिण सोलापूर तालुका बुद्धिबळ स्पर्धा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुका बुद्धिबळ स्पर्धेत कंदलगावच्या जीवन ज्योत प्रशाला व इंडियन पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी वर्चस्व प्राप्त केले.

**अंतिम निकाल (प्रथम पाच) : १४ वर्षे मुले :** पृथ्वीराज मुकाने (इंडियन पब्लिक स्कूल), अजित उडानशिव, प्रसाद घाटानूरे (दोघे जीवन ज्योत प्रशाला), नागेश राजमाने(इंडियन पब्लिक स्कूल), प्रज्वल बिराजदार (श्री संगमेश्वर प्रशाला). **मुली :** विद्यालक्ष्मी म्हेत्रे (लोकसेवा विद्यामंदिर), संजीवनी चव्हाण (इंडियन पब्लिक स्कूल), प्रीती बंडगर (जीवन ज्योत प्रशाला), निकोले शिंदे (केएलइ स्कूल), सुकन्या बिराजदार (श्री सिद्धाराम म्हेत्रे प्रशाला). **१७ वर्षे मुले :** यश व्हनमाने(जीवन ज्योत प्रशाला), आदित्य रेवतगाव (लोकसेवा हायस्कूल), सरताज नदाफ (श्री संगमेश्वर प्रशाला), किरणकुमार डोळे (श्री बसवेश्वर विद्यालय), अभिषेक कोरे (जीवन ज्योत प्रशाला). **मुली :** साक्षी राऊतराव (इंडियन पब्लिक स्कूल), सना शेख (जीवन ज्योत प्रशाला), प्रांजली राठोड, विजयालक्ष्मी म्हेत्रे, सायली पवार (दोघी लोकसेवा विद्यामंदिर). **१९ वर्षे मुले :** सुदर्शन गायकवाड (जीवन ज्योत प्रशाला), सतीश जोडमोडे (श्री बसवेश्वर विद्यालय), सिद्धनाथ माने (जीवन ज्योत प्रशाला), संकेत टाकळी (श्री संगमेश्वर प्रशाला), प्रशांत राऊतराव (जीवन ज्योत प्रशाला). **मुली :** आरोही पाटील (ग्लोबल विलेज स्कूल), तंजिला शेतसंदी (संगमेश्वर प्रशाला), ज्योती जोडमोट (श्री बसवेश्वर विद्यालय), मंदाकिनी गाडेकर (जीवन ज्योत प्रशाला), यशोदा चोरमुले (अक्षर ज्युनियर कॉलेज).

# सहस्त्रार्जुन प्रशालेने पटकावला दुहेरी मुकुट

### ● शालेय शहर नेहरू हॉकी स्पर्धेत सलग १६व्या वर्षी कामगिरी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

क्रीडा युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व सोलापूर महानगरपालिका क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शहर नेहरू हॉकी स्पर्धेत सहस्त्रार्जन प्रशालेच्या मुले व मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले. त्यांचे हे सलग १६वे विजेतेपद आहे.

संघास क्रीडाशिक्षक डॉ. उज्वल मलजी व सहाय्यक राहुल पवार यांचे मार्गदर्शन लाभले. संघास संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री, शालेय समितीचे अध्यक्ष राजुसा भुमकर, शैक्षणिक समितीचे सचिव गजाननसा गोयल, आमदार विजयकुमार देशमुख यांनी अभिनंदन करून पुढील विभागीय सामन्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे सदस्य श्रीरामसा पवार, भरतकुमार शालगर, मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, मंजुषा माने व डॉ. विष्णू रंगरेज आदी उपस्थित होते.

**विजयी संघ : मुलेः** कृष्णा अलकुंट (संघनायक), अमन सय्यद (गोलकीपर), संकल्प स्वामी, कुमार चौगुले, समर्थ इरकल, कोरे श्रेयश, संदीप कोळी, अभिनव अलुरे, स्वप्निल बोरुडे, ज्योतिबा गाडेकर, साई सरवदे, आसिफ तांबोळी, भोसले रविराज, सनद अलकुंटे, पटणे गौरव, कोळी महांतेश.


**मुली :** प्रतीक्षा चव्हाण (संघनायक), संचिता माळगे, श्वेता भिंगोळी, चैत्राली गोपारकर, प्रगती भोसले, धनश्री काळे, प्रणिती पुप्पल, शिवांजली होदडे ,रूपा सुतार, तेजस्वी घुगे,सायली जाधव, पायल दासरी, सृष्टी सुरवसे, तपस्या झिपरे, सुकन्या माने, कल्याणी नागणसुरे.

# राज स्कूलच्या केशव परदेशीची विभागीय योगासन स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**



क्रीडा व युवक सेवा संचालनाय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व सोलापूर महानगरपालिका सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व सोलापूर जिल्हा योग परिषद यांच्या मार्फत राजीव गांधी इनडोअर स्टेडियम येथे झालेल्या १४ वर्षाखालील जिल्हा आंतरशालेय मुलांच्या योगासन स्पर्धेत केशवसिंग अतुलसिंग परदेशी (इयत्ता सातवी) याने चतुर्थ क्रमांक मिळवला. या कामगिरीवर त्याची पुणे विभागीय योगासन स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. त्यास मुख्य प्रशिक्षक रोहन घाडगे, क्रीडाशिक्षक अतुल सोनके, राज दसाडे आशुतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.



यशस्वी खेळाडूचे संस्था महेश कोठे, डॉ. राधिकाताई चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्रा. विलास बेत, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांनी अभिनंदन केले.

# चेतक स्केटिंग क्लबचे माने, सोलंकर स्केटिंग स्पर्धेत अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**



शालेय स्केटिंग स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात येथील चेतक स्केटिंग क्लबच्या स्पर्धेत महाश्री माने हिने व मयूर सोलंकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

याच गटात पोर्णिमा पुजारी हिने द्वितीय तर मयुरी पुजारी हिने तृतीय स्थान मिळविले. त्यांचे चेतक स्केटिंग क्लबचे अध्यक्ष व मार्गदर्शक दिव्यकांत गांधी यांचे मार्गदर्शन लाभले.

# बार्शी तालुका क्रिकेट स्पर्धेत सुलाखे हायस्कूलला विजेतेपद

### ● विश्वजीत दोघे उत्कृष्ट फलंदाज, आदित्य सुतार उत्कृष्ट गोलंदाज, हर्षराज देशमुखे उत्कृष्ट क्षेत्ररक्षक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि १० सप्टेंबर-**

बार्शी तालुका क्रिकेट स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटात सुलाखे हायस्कूलने सेंट जोसेफ स्कूलचा ८ गडी राखून पराभव करीत विजेतेपद पटकाविले. शिवशक्ती मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून सेंट जोसेफ स्कूलने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला व निर्धारित आठ षटकांत ७ बाद ६३ धावा केल्या. हे आव्हान सुलाखे हायस्कूलने ५.२ षटकात दोन गड्यांच्या मोबदल्यात पार केले. गोलंदाजीमध्ये सुलाखे हायस्कूलच्या आदित्य सुतार ३ बळी, विश्वजीत तोगे, सुमित घळके, अथर्व चिंतामणी, हर्षराज देशमुखे यांनी प्रत्येकी १ बळी घेत सेंट जोसेफ स्कूलला जखडून ठेवले. ६३ धावांचे आव्हान घेऊन उतरलेल्या संघाने दोन गड्यांच्या मोबदल्यात सामना जिंकला. फलंदाजीत विश्वजीत दोघे यांनी तडाखेबाज ३८ धावांची खेळी केली. संघास सुहास देशमुख, प्रमोद माळी, समीर वायकुळे, सुहास शिंदे, संतोष पवार यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धा संयोजक प्रा डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के, प्रा. रुपाली शिंदे तसेच पंच अक्षय लष्कर, अमर शेंडगे, समर्थ गव्हाणे तर गुणलेखन करणारे यज्ञेश झाल्टे, दानिश मुल्ला, जीशान मुल्ला, यश खोगरे, प्रथमेश डोईफोडे, कृष्णा देशमुख, विनायक मांगडे यांनी परिश्रम घेतले. विजयी संघांचे बार्शी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आनंद सुलाखे, सचिव अनंत कवठाळे, प्रशालेचे मुख्याध्यापक स्वामीराव हिरोळीकर, उपमुख्याध्यापक इंगळे आदींनी अभिनंदन केले. स्पर्धा यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल बीपी कॉमर्स कॉलेज बार्शीचे प्राचार्य डॉ. एस. बी. कारंडे यांनी संयोजकाचे अभिनंदन केले.



**विजयी संघातील खेळाडू :**

विश्वजीत तोगे, संदेश गाडे, प्रतीक काळे, प्रथमेश डोईफोडे, हर्षराज देशमुखे, सुमित घळके,अथर्व चिंतामणी, बाळासाहेब पोकळे, आदित्य सुतार, वेदांत वायकुळे, ईशान देशपांडे, आयुष बुद्रुक, सराज नांदेडकर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### शुभम पवार दोन जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी तडीपार

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

शहरातील सराईत गुन्हेगार शुभम पवार यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार विजापूर नाका पोलिसांनी तडीपारीच्या आदेशानंतर पुणे येथे सोडले आहे.शुभम दत्तात्रय पवार (वय २१, रा. जुनी लक्ष्मी चाळ, डोणगाव रोड, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे. शुभम पवार याच्याविरुध्द आपल्या साथीदारांसह घातक शस्त्रं बाळगून नागरीकांना मारहाण करून दुखापत करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्यास त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी विजापूर नाका पोलिसांकडून पवार यास तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता.त्यास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत शुभम पवार यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पवार यास पोलिस पथकाने पकडून पुणे येथे सोडले आहे.



### शिवाजीनगर येथील गॅरेजमधून ट्रॅक्टरची चोरी

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

पुणे महामार्गावरील बाळे परिसरातील शिवाजी नगर येथील गॅरेजसमोरून चोरट्याने ३ लाख ३० हजार रुपये किंमतीचा ट्रॅक्टर चोरून नेला.याबाबत निखिल अशोक कांबळे (वय ३१, रा. सिध्दार्थ नगर, मोहोळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कांबळे यांनी त्यांचा एमएच १३ डीएम १६६५ क्रमांकाचा ट्रॅक्टर हा शिवाजी नगर येथील वरदविनायक गॅरेज येथे पार्क करून ठेवला होता. ४ सप्टेंबरच्या पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने तो ट्रॅक्टर चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार पाडवी पुढील तपास करीत आहेत.

### सिव्हिल हॉस्पिटलमधून दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

शहरातील सिव्हिल हॉस्पिटलमधून चोरट्याने २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.याबाबत नागेश रामचंद्र मिठ्ठा (वय ४१, रा. युनिक टाऊन, जुना विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ ऑगस्ट रोजी मिठ्ठा यांनी त्यांची (क्र. एम. एच. १३/ बी. एच. १९०१) क्रमांकाची दुचाकी ही सिव्हील हॉस्पीटल येथे पार्क करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

### एनटीपीसीमध्ये नोकरी लावतो म्हणून ३२ लाखांना फसविणाऱ्यास पोलीस कोठडी

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

एनटीपीसी येथे मोठ्या पदावर नोकरी लावतो असे अमिष दाखवून सात तरुणांकडून ३२ लाख ४८ हजार ८३० रुपयांची फसवणूक करणाऱ्या सुरज रमेश चव्हाण (वय - ३५, रा. कित्तूर चन्नम्मा नगर, सोलापूर) यास सोलापूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी १२ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. एनटीपीसीमध्ये मोठ्या पदावर नोकरी लावतो म्हणून सूरज चव्हाण याने सन २०२० ते २०२१ या कालावधीमध्ये फिर्यादी अल्तमश सिराज अहमद हिरापुरे याचेकडून रक्कम रुपये ६ लाख ५ हजार, तसेच अजहर मोहमदआजम शहापुरे याच्याकडून ६ लाख दहा हजार रुपये, इम्रान दाऊद पिरजादे याचेकडून ६ लाख ५५ हजार रुपये, शेख मकबूल दुधनशहा याच्याकडून ५ लाख ९० हजार रुपये, राहुल उत्तम पाटील याचेकडून १ लाख सत्तार हजार रुपये, किशोर मुरलीधर लामतुरे याचेकडून ३ लाख १० हजार रुपये, सुरज लक्ष्मण शिवशरण याचेकडून ५ लाख ७३ हजार रुपये अशी एकूण ३२ लाख ४८ हजार ८३० रुपये इतकी मोठी रक्कमेची फसवणुक केली म्हणून एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे चव्हाण याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्या पोलिसांनी १० सप्टेंबर २०२४ रोजी आरोपी चव्हाण यास अटक करुन पोलीसांनी सोलापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एम. पी. मढेकर यांचेसमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीस १२ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. याप्रकरणात सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश इंगळे हे तपास करीत असून यात सरकारतर्फे ॲड. वैशाली बनसोडे, तर आरोपींतर्फे ॲड. अभिषेक गुंड, ॲड. एम. के. राठोड, ॲड. मनोहर गोविंदे यांनी काम पाहिले.

# शहरातील सर्व दुकाने रात्री साडेदहानंतर बंद

**● रात्री उशिरा रस्त्यांवर फिरणाऱ्यांवर होणार कारवाई**
**● पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शहरातील सर्व प्रकारची सर्व दुकाने ही रात्री साडेदहानंतर बंद करण्याचा निर्णय पोलिस विभागाने घेतला असून त्यानंतर उघड्या असणाऱ्या दुकानांवर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच रात्री उशिरापर्यंत रस्त्यांवर तसेच गल्लीबोळांमधून विनाकारण फिरणाऱ्या-थांबणाऱ्या तरूणांवर कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिला आहे.

शहरातील अनेक बाजारपेठांमधील काही दुकाने ही रात्री उशिरापर्यंत सुरु असून त्याठिकाणी हुल्लडबाज तरूणांची मोठी गर्दी होत असल्याच्या तक्रारी तसेच रात्री उशिरापर्यंत विनाकारण फिरणाऱ्यांची संख्यादेखील खूप मोठ्या प्रमाणात वाढल्याच्या तक्रारी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे आलेल्या होत्या. याबाबत सामान्य नागरीकांकडून पोलिस विभागाकडे तक्रारीदेखील करण्यात आलेल्या आहेत. रात्री अपरात्री फिरणाऱ्यांमुळे गेल्या काही दिवसांमध्ये शहरात हाणामारीच्या घटनादेखील घडून असून त्यामुळे सण-उत्सवाच्या कालावधीत शहरातील कायदा व सुव्यवस्था, शांततेस बाधा निर्माण होण्याचीदेखील शक्यता वर्तविण्यात येत होती.



या तक्रारींची दखल घेत पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलिस अधिकारी, सर्व पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी यांची बैठक घेऊन रात्री साडेदहानंतर दुकाने सुरु न ठेवण्याबाबतच्या सूचना दुकानदारांना देण्याचे आदेश दिले. तसेच रात्री शहरातील काही रस्त्यांवर तसेच गल्लीबोळांमधून विनाकारण फिरणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार सोमवारपासून शहरातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील अनेक परिसरातील दुकाने रात्री दहानंतर बंद करून घेण्यासाठी पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी हे स्वतः फिरत असून विनाकारण रात्री फिरणाऱ्यांना लाठीचा प्रसाददेखील देत आहेत. बुधवारपासून ही मोहिम आणखी तीव्र करण्यात येणार असून आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह पोलिस ठाण्यांमधील अधिकारीदेखील हे रस्त्यावर उतरून रात्री दुकाने बंद करून घेऊन विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई करणार आहेत, असेही आयुक्त एम राजकुमार यांनी सांगितले.

### भू-माफियांविरोधात आयुक्तालयात पथक...

गेल्या काही महिन्यांमध्ये सोलापूर शहरात भू माफियांनी धुमाकूळ घातला असून बळजबरीने जागा खाली करणे, रात्री अचानकपणे जागेवर कब्जा करणे, जागेत अतिक्रमण करून कब्जा करणे असे प्रकार घडलेले पहावयास मिळत आहेत. याबाबत पोलिस प्रशासनाकडे अनेक तक्रारी आलेल्या आहेत. त्यामुळे या भू माफियांविरोधात पोलिस आयुक्तालयामध्ये पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक तयार करण्यात आलेले आहे. या पथकाकडून आलेल्या तक्रारींची योग्य दखल घेऊन कागदपत्रांची तपासणी करून भू माफियांविरोधात कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे ज्यांच्या कुणाच्या जागा भू माफियांनी बळकाविलेल्या आहेत अगर ज्यांच्या जागेमध्ये बळजबरीने अतिक्रमण करण्यात आलेले आहे, अशांनी पोलिस आयुक्तालयात तक्रारी कराव्यात असे आवाहन पोलिसांच्यावतीने करण्यात आले आहे.



## दारूचे ५७, जुगाराचे २७ गुन्हे; तबब्ल १० लाखांचा मुद्देमाल जप्त

**● गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

जिल्हयातील २५ पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेकडून अवैध दारू व जुगारवर केसेस करण्यात आले. त्यामध्ये दारूबंदी कायद्यान्वये ५७ केसेस करून ८ लाख ५६ हजार १९५ रूपयांची देशी-विदेशी दारू, गुळमिश्रीत रसायन जप्त करण्यात आले.

तसेच जुगाराचे २२ गुन्हे ४५ आरोपीवर दाखल करण्यात आले असून त्यामध्ये १ लाख १९ हजार ५९० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यामध्ये स्थानिक गुन्हे शाखेकडून देखील मुळेगाव तांडा येथील अवैध हातभट्टी दारूच्या भट्यांवर छापा टाकून २ गुन्हे दाखल करण्यात येवून १ लाख २३ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जिल्ह्यात २८८३ मंडळांनी गणेश मुर्तीची प्राणप्रतिष्ठा कली असून त्यातील २६५ गावामध्ये '' एक गाव एक गणपती '' साजरा करत आहेत. गणेशोत्सव शांततेत पार पडण्यासाठी सोलापूर ग्रामीण पोलीसांनी बंदोबस्त नेमला असून सदर उत्सव कालावधीत कोणताही घटनेवरून कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही यासाठी पोलीस दक्षता घेत आहेत. या कारवाईत पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर व जिल्ह्यातील २५ पोलीस ठाणेच्या प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी, अंमलदार यांनी भाग घेतला होता.

## लायन्स गुणवंत शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल व एस एस कलशेट्टी प्रतिष्ठान संयुक्त विद्यमाने सुमंगलाय लायन्स गुणवंत शिक्षकरत्न पुरस्कार वितरण सोहळा शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत लायन्स क्लब अध्यक्ष चक्रधर अन्नलदास यांच्या अध्यक्षतेखाली माजी गव्हर्नर अरविंद कोणशिरसगी, झोन प्रमुख विठ्ठल सारंगी, प्रा स्वामीनाथ कलशेट्टी, ॲड. श्रीनिवास कटकुर, केदार स्वन्ने, चंद्रकांत यादव, धुळम, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन अप्रतिम पूजनाने करण्यात आले. ॲड. श्रीनिवास कटकुर यांच्या प्रस्तावनेनंतर लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल एस एस कल शेट्टी प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने सन २०२४ मध्ये शिक्षण क्षेत्रात नवोपक्रमशील, भरीव कार्य करणाऱ्या आदर्श गुणवंत शिक्षकांचा पुर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथे गुणवंत शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान करून शिक्षकांचा गौरव करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांमध्ये एस के म्हमाणे, राम ढाले, सत्यवान बनसोडे, प्रा श्रीधर सगेल, प्रा संजय जाधव, रूपाली खराडे, संतोषी रेळेकर,लक्ष्मी कनकी व संजीवनी सादुल आदींचा सन्मान यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, बुके, व साने गुरुजी पुस्तक देऊन शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना सचिन जगताप यांनी लायन्स क्लब व कलशेट्टी परिवाराकडून करण्यात आलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव केला. यावेळी अरविंद कोणशिरसगी यांनी लायन्स क्लब राबवित असलेले विविध उपक्रमाची माहिती दिली. या कार्यक्रमाचे आभार चंद्रकांत यादव यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा स्वामीनाथ कलशेट्टी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लायन्स क्लबचे सर्व पदाधिकारी सदस्य व सुनीता कलशेट्टी, ऐश्वर्या कलशेट्टी, प्रा.बिराजदार दत्तात्रय, सुनील अतनुरे व काशिनाथ कोळी आदींनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे जिल्हा शिक्षकरत्न, जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण

**● पांडुरंग काळे, प्रभाकर बटगेरी व उषा स्वामी यांना जीवनगौरव पुरस्कार**

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर दि १० सप्टेंबर-**

राष्ट्रीय गुरव समाज महासंघ जिल्हा सोलापूरतर्फे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील आदर्शवंत व गुणवंत शिक्षकांचा शिक्षकरत्न म्हणून तर समाजासाठी बहुमोल योगदान दिलेल्या सेवानिवृत्त जेष्ठ व्यक्तींचा जीवनगौरव पुरस्कार सोहळा द्वारकाधीश मंदिर जुळे सोलापूर येथे संपन्न झाला.



सोलापूरचे अधिष्ठाता वसंत कोरे व पत्रकार विजय साळवे यांच्या हस्ते याचे वितरण झाले. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव हे होते. यावेळी महासंघाचे उपाध्यक्ष शशिकांत जिड्डीमनी, सदस्य चंद्रकांत गुरव व काशिनाथ मेलगिरी हे होते. महासंघ जिल्हा सोलापूरचे अध्यक्ष निंगराज विंचुरे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचे परिचय संगीता स्वामी यांनी तर सत्कार गौरव समितीचे अध्यक्ष राजकुमार पुजारी व उपाध्यक्ष राजाराम चिंचोळकर यांच्या हस्ते करण्यात आले. सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार पांडुरंग काळे, प्रभाकर बटगेरी व उषा स्वामी यांना मानपत्र, ट्रॉफी, शाल व बुके देऊन सन्मानित करण्यात आले. १५ शिक्षकांचा शिक्षक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. परिचय व मानपत्राचे वाचन सुभाष नागरसे, सुरेश पाटील व शंकर पाटील यांनी केले. माध्यमिक विभागाचे यादी वाचन मनीषा गुरव तर प्राथमिक विभागाचे यादी वाचन राजश्री पुजारी यांनी केले. जीवन गौरव व शिक्षकरत्न पुरस्काराचे पुरस्कर्ते मल्लिकार्जुन पुजारी उपाध्यक्ष शशिकांत जिड्डीमनी यांचा सत्कार करण्यात आला. महिला जिल्हा उपाध्यक्षा श्रेया पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर आभार नवनाथ गुरव यांनी मानले.



## श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळेत शिक्षक दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर दि १० सप्टेंबर-**

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून पालक आणि शिक्षक यांच्यामध्ये समन्वय साधून योग्य तो सुसंवाद विद्यार्थ्यांशी साधला तर निश्चितच सुजाण नागरिक घडण्यास व सुसंस्कृत समाज निर्माण होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन नु.म.वि. शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका रोहिणी चौधरी यांनी केले.

पालक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित शिक्षक सत्कार समारंभप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी शिक्षकांशी व पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या वाचन लेखनासाठी तसेच अध्ययन अध्यापन प्रक्रिया परिणामकारक व प्रभावी होण्यासाठी मनोरंजक खेळ याबाबतची सविस्तर माहिती तसेच पालकांनाही आपल्या मुलांना शिस्त, वाचनाची सवय लावण्यासाठी छोटे छोटे उपक्रम सांगितले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका शिल्पा वाले होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पालक सदस्य अश्विनी वलेकर यांनी केले. सोनाली चव्हाण यांनी आभार मानले.

## सामाजिक कार्यकर्त्या विद्या माने यांच्यातर्फे गरजूंना वह्या वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०९ सप्टेंबर**

सोलापूर येथील सामाजिक कार्यकर्त्या विद्या माने यांच्याकडून गरजू शालेय विद्यार्थ्यांना, पाल्यांना शालेय वह्यांचे वाटप करण्यात आले. विद्या माने म्हणाल्या, शालेय आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याकामी सरव प्रकारचे सहकार्य आणि प्रोस्ताहन विविध योजनेतून करण्याचे निश्चित केले.

पालक आणि विद्यार्थ्यांकडून या उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी सोमनाथ बडदाळे, कन्याकुमारी बडदाळे, धनराज चंदनशिवे, देवा सोनवणे यांनी सहभाग नोंदविला.




## साई-समर्थ संस्थेत कौशल्य प्रशिक्षकांचा सत्कार

**सोलापूर दि १० सप्टेंबर-**

साई समर्थ विद्या विकास संस्थामार्फत शिक्षक दिनानिमित्त संस्थेच्या शासनमान्य कौशल्य प्रशिक्षण केंद्रातील अन्नपूर्णा पदामुखे, श्रद्धा परांडकर, सोनाली कुंभार, गुलनाझ निगेबान या आदर्श प्रशिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

मागील ७ ते ८ हजार बेरोजगार युवक व युवतींना शासनाच्या विविध कौशल्य प्रशिक्षण योजनेमार्फत मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार पूरक बनवण्याचे कार्य संस्थेने केले आहे. याच अनुषंगाने कौशल्य प्रशिक्षण संस्थेतील या वर्षी यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केल्या प्रशिक्षणार्थींना महाराष्ट्र शासनामार्फत प्रमाणपत्र प्रदान सोहळा अहिल्याबाई स्किल ट्रेनिग सेंटर कुमठा नाका येथे झाला. या कार्यक्रमात १५० प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे हणमंत नलावडे होते. यावेळी अहिल्याबाई ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य इस्माईल शेख, कौशल्य विभाग व आयोजक मिलिंद आहेर, केंद्रप्रमुख उन्मेष कमलापुरे आदी उपस्थित होते.



## यमाईदेवी आश्रमशाळेत ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथील यमाईदेवी प्राथमिक आश्रशाळा या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा लांबतुरे व आई प्रतिष्ठान सोलापूरचे संस्थापक मोहन डांगरे यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी संस्थापक अशोक लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, संचालक शंकर जाधव, विलास इरकशेट्टी, मुख्याध्यापिका रुक्मिणी गवळी, भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते शिवाजी सोनार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक नामदेव गवळी, संजय खरटमल, बाणेगावचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबुराव ढोणे उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून मार्डी, बाणेगाव, भोगाव, सोलापूर आदी ठिकाणच्या ५० ते ५५ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षिका विद्या हराळे-लांबतुरे यांना फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा व जिल्हा सामाजिक कार्य समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच महादेव करे यांना गुरुविद्या प्रतिष्ठान सोलापूर यांच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार, मॉडर्न हायस्कूलच्या शिक्षिका डॉ. शिवकन्या कोंजारी-कदरेकर यांना लोकमंगल शिक्षकरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक मुख्याध्यापिका रुक्मिणी गवळी यांनी केले. सूत्रसंचालन विनोद कोळेकर यांनी केले. तानाजी तानगावडे यांनी आभार मानले.

**संत सेवालाल निधी बँक अपहारप्रकरण**

# मंद्रुप पोलिसांकडील गुन्हा शहर आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करावा

**● फिर्यादी योगेश पवारचा जिल्हा न्यायालयात अर्ज**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

योगेश पवार यांचे फिर्यादीवरून शिवाजी जाधव, सुनीता जाधव, सचिन जाधव, पुजा जाधव, सुजाता चव्हाण, सीमा शहा, मधुबेन पटेल व अर्चना देशपांडे यांचेविरुध्द सोलापूर शहरातील सदर बझार पोलीस स्टेशन येथे ३० जुलै २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सोलापूर शहर आर्थिक गुन्हे शाखेकडून चालू आहे. असे असतांनाही सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील मंद्रूप पोलीस स्टेशन येथे शिलवंत राऊतराव यांचे फिर्यादीवरुन संत सेवालाल निधी बँक व गणेश फायनान्सचे शिवाजी जाधव, सुनीता जाधव, सचिन जाधव, पुजा जाधव, सचिन चव्हाण, सुजाता चव्हाण यांचेविरुध्द दुसरा गुन्हा २८ ऑगस्ट २०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. मंद्रूप ग्रामीण पोलिसांनी दाखल केलेला गुन्हा हा सोलापूर शहरातील गुन्ह्यात वर्ग करावा म्हणून मुळ फिर्यादी योगेश पवार यांनी जिल्हा व सत्र न्यायाधीश राणे यांचे न्यायालयात अर्ज दाखल केला. त्यावर न्यायालयाने सरकारी वकिलांना म्हणणे सादर करण्याचा आदेश केला आहे.

मंद्रूप पोलिस स्टेशनच्या गुन्ह्यातील फिर्यादी शिलवंत राऊतराव हा सदर बझार पोलीस स्टेशनकडील गुन्ह्यात साक्षीदार आहे. सदर बझार पोलीस स्टेशन व मंद्रूप ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये दाखल दोन्ही फिर्यादीतील गुन्ह्याचे स्वरूप, आरोपी व गुन्ह्यातील तथ्ये ही समान आहेत. समान तथ्यांवरील व त्याच आरोपीविरुध्द केलेली दुसरी तक्रार किंवा फिर्याद, सुप्रीम कोर्टातील बहुतांश जजमेंट व निर्देशानुसार नाही. तसेच गुन्ह्यातील मुख्य आरोपी शिवाजी जाधव हे जिल्हा परिषद शिक्षक असल्याने व ते शहरातील सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग येथेच बहुतांश ठेवी स्वीकारत होते. त्यामुळे सदरच्या गुन्ह्याचे मुख्य उगम स्थान व कार्यक्षेत्र हे सोलापूर शहर हद्दीत आहे. संत सेवालाल निधी लिमिटेड यांचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय हे सोलापूर शहरातील विजापूर रोडवरील सैफूल येथे असून संत सेवालाल निधी बँक व गणेश फायनान्सचे सर्व व्यवहार हे येथूनच झाले आहेत. त्यामुळे मंद्रूप ग्रामीण पोलीस स्टेशनकडील गुन्ह्यातील स्थळसीमा व निधी बँकेचे कार्यक्षेत्र हे दोन्ही सोलापूर शहर हद्दीत आहे. त्यामुळे मंद्रूप ग्रामीण पोलीसांकडील गुन्हा सोलापूर शहर आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी योगेश पवार यांनी न्यायालयात केली आहे. तसेच संत सेवालाल निधी बँकेविरुध्द मंद्रूप ग्रामीण पोलिसांकडे जवळपास ३०-४० ठेवीदारांनी सहा-सात महिन्यापूर्वी तक्रारी अर्ज केले होते. परंतु, त्यावेळी मंद्रूप ग्रामीण पोलीस स्टेशन व ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयातील वरिष्ठ पोलिसांनी त्या तक्रारीवर कोणतीही ठोस कारवाई केली नाही किंवा फिर्याद दाखल करून घेवून गुन्हा ही रजिस्टर करून घेतला नाही. आरोपींना बेकायदेशीरपणे वेळ देवून संधी दिली. योगेश पवार यांनी सदर बझार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केल्यावर जवळपास एका महिन्यानंतर मंद्रूप ग्रामीण पोलिसांनी आरोपींना तांत्रिक दृष्ट्या फायद्या व्हावा व आरोपींच्या स्थावर व जंगम मालमत्तेवर बोजा नोंदविण्याचा प्रस्ताव देताना कायदेशीर अडचण निर्माण करण्याच्या हेतूने व आरोपींना फायदा करण्यासाठी जाणीवपूर्वक आरोपींच्या प्रभावाखाली दूसरा गुन्हा दाखल केला. सर्व आरोपी हे मंद्रूप भागातील असून त्यांचा मंद्रूप परिसर व ग्रामीण भागात प्रभाव आहे. त्यामुळे मंद्रूप ग्रामीण पोलिसांकडील गुन्ह्याच्या तपासात आरोपींच्या प्रभावाखालील डमी लोक साक्षीदार व पंच होण्याची दाट शक्यता आहे. व त्याचा तांत्रिकदृष्ट्या फायदा आरोपींना होवू शकतो. त्यामुळे मंद्रूप ग्रामीण पोलिसांकडील गुन्हा व त्याचा तपास सोलापूर शहर आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी न्यायालयाकडे केल्याचे पवार यांचे वकिल ॲड. डी. एन. भडंगे यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर नगर १मधील श्रींची पूजा सहाय्यक पोलिस आयुक्त राजन माने यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी मंडळाच्या महिला अध्यक्षा जान्हवी माखिजा आणि महिला सदस्य.



## प्रथम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे बिग्सीकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आहे. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते या कार्यक्रमात येणारे सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना संस्थेचे अध्यक्ष रवींद्र डी.गायकवाड, सचिवा अनामिका गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

# ३१ विद्यार्थ्यांना ३७ लाखांचे सानुग्रह अनुदान कधी मिळणार?

### ● निधी तातडीने मंजूर होण्याची अपेक्षा; लाभार्थ्यांचे प्रस्ताव रखडले

**तभा वृत्तसेवा, अॅड.विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

**राजीव गांधी विद्यार्थी अपघात विमा योजनेत निधीअभावी सोलापूर जिल्ह्यातील ३१ विद्यार्थ्यांच्या पालकांचे अथवा लाभार्थ्यांचे प्रस्ताव वर्षभरापासून रखडले आहेत. यामध्ये १३ मयत तर १८ अपघात असून या ३१ विद्यार्थ्यांच्या पालकांना व लाभार्थ्यांना ३७ लाख ३,७६८ हजारांचे सानुग्रह अनुदान मिळू शकलेले नाही.**





या दिरंगाईमुळे अपघातग्रस्त किंवा अपघातात जीव गमावलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना व लाभार्थ्यांना दिलासा मिळू शकला नाही. त्यामुळे योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची भावना लाभार्थ्यांच्या कुटुंबीयांची आहे. त्यामुळे या योजनेतील लाभार्थ्यांना तातडीने निधी मंजूर होऊन दिलासा मिळावा, अशी मागणी अपघातग्रस्त विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांनी केली आहे.

राज्यातील पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी राजीव गांधी विद्यार्थी अपघात विमा योजना २००३ पासून राबविली जात आहे. योजनेत सानुग्रह अनुदान शासनामार्फत दिले जाते. यात वेळोवेळी सुधारणा करून अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. त्यात सध्या विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास एक लाख ५० हजार, अपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यास अपंगत्व प्रकारानुसार एक लाख व ७५ हजार रुपये, शस्त्रक्रिया करण्यासाठी हॉस्पिटलचा खर्च अथवा जास्तीत जास्त एक लाख रुपये, विद्यार्थी आजारी पडून अथवा सर्पदंशाने किंवा पोहताना मृत्यू झाल्यास एक लाख ५० हजार रुपये, विद्यार्थी कोणत्याही कारणाने जखमी झाल्यास प्रत्यक्ष हॉस्पिटलचा खर्च जास्तीत जास्त एक लाख रुपये अशा रीतीने शासनाकडून अनुदान दिले जाते. सोलापूर जिल्ह्यात २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत १४ विद्यार्थ्यांचे अपघात झाले होते. त्यात १८ लाख ४५ हजार ३१ रुपये एवढे अनुदान मिळायला हवे आहे. तसेच २०२४ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत १७ विद्यार्थ्यांचे अपघात झाले होते. त्यात १८ लाख ५८ हजार ६३ रुपये एवढे अनुदान मिळायला हवे आहे. असे ३१ विद्यार्थ्यांचे एकूण ३७ लाख ३ हजार ७६८ रुपये अनुदान रखडले आहे. त्या त्या तालुक्यातील विद्यार्थ्यांचे प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत संबधीत वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविले होते.

ते प्रस्ताव समितीने मंजूर करून शिक्षण संचालक प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडे निधीची मागणी केली होती. त्या प्रस्तावानुसार ३७ लाख ३ हजार ७६८ रुपयांची मागणी करण्यात आली आहे. सोलापूर शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या योजना विभागाने १६ जुलै २०२४ ला सुधारित मागणीदेखील नोंदविली आहे. मात्र एक वर्षापासून निधी मंजूर होऊ शकलेला नाही. त्यामुळे ३१ विद्यार्थ्यांचे प्रस्ताव निधीअभावी रखडले असून, लाभार्थ्यांना अजूनही विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेची रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांनी व कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे शिक्षण विभागात योजना या नावाने विशेष विभाग कार्यान्वित करण्यात आला आहे. तरीदेखील अपघातग्रस्त व मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना व लाभार्थ्यांना वेळेवर दिलासा मिळू शकलेला नाही. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यात लक्ष घालावे व निधी मंजूर करावा, अशी मागणी होत आहे.



“सदरची राजीव गांधी अपघात सानुग्रह अनुदान योजना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून, यांच्या मान्यतेबाबत काटेकोरपणे कार्यवाही केली जाते. तथापी शासनस्थरावर सन २३-२४ व २४-२५ चे अनुदान प्राप्त होताच तात्काळ वितरीत करण्याची दक्षता घेण्यात येईल.

**- सुलभा वटारे,**
**शिक्षणाधिकारी, योजना, जिल्हा परिषद**

### तत्काळ निधी मंजूर होणे गरजेचे

शासनाकडून निधी मंजुरीसाठी व निधी हस्तांतर करण्यासाठी सध्या ऑनलाईन प्रणाली वापरली जाते. त्यासाठी जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तर विविध लॉगिन कोड कार्यान्वित झाले आहेत. त्यात या योजनेसाठी डीडीओ कोड कार्यान्वित झालेला नसल्याचे समजते. मात्र यात कोणतीही तांत्रिक अडचण जरी असली तरी योजनेची गंभीरता लक्षात घेता तत्काळ निधी मंजूर होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

# पूर्वाच्या पावसाने शेतकरी बांधवांतून आनंद

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**



यंदा मृग नक्षत्रापासूनच आजतागायत जिल्हाभरात चांगल्या पाऊसधारा कोसळल्याने जिल्ह्यात चोहीकडेच मुबलक पाणीसाठाही होत आहे. आज (दि. १०) मंगळवारीही दिवसभर ऊन होते आणि सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास म्हणजेच गौराई आगमनाचे सर्व घरात स्वागत झाल्यानंतर पूर्वा नक्षत्रातील पावसानेही गौराईचे पाऊसधाराने स्वागत केले. या पावसामुळे शेतकरी बांधवात समाधानाचे वातावरण पसरले आहे.

जूनमधील मृगाचा पाऊस पडल्याने यंदा जिल्ह्यात सरासरीच्या दीडपट खरिपाची पेरणी झाली आहे. यानंतर वार्षिक सरासरीपेक्षाही जास्त पाऊस ऑगस्ट एन्डपर्यंत जिल्ह्यात पडला आहे. यामुळे जिल्ह्यातील पिके जोमात डोलत आहेत. आर्द्रा, पुनर्वसू, पुष्य, आश्लेषा आणि मघा नक्षत्रातील पावसानेही जिल्हाभरात चांगली हजेरी लावल्याने जिल्ह्यातील नदी, नाले, साठवण तलाव, पाझर तलाव भरून वाहू लागले आहेत. जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरण आणि इतर मध्यम स्वरूपाचे ३ प्रकल्पही १०० टक्केच्यावर भरले आहेत. इतकेच नाहीतर रोज पडत असलेल्या पाऊसधारांनी इतर साठवण तलावही भरू लागले आहेत. शेतातील विहिरी, बोअर्सचे पाणी मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पाण्याची पातळी वर आल्याने आगामी दोन्ही हंगामातील पिकांचा याचा मोठा फायदा होणार आहे.

आता उत्तरा, हस्त, चित्रा ही मोठी नक्षत्रे लवकरच येणार आहेत. याही नक्षत्रातील मोठा पाऊस आपल्या सोलापूर जिल्ह्यात पडत असतो. गतवर्षी याच नक्षत्रातील पाऊस काही तालुक्यात पडल्याने रब्बी हंगामातील पिके शेतकऱ्यांना साधली होती. आता खरिपातील पिके शेवटच्या टप्प्यात आहेत. मूग, उडीद निघाला आणि आणि सोयाबीन हळूहळू पिवळे पडू लागले असून, या महिनाखेर याचीही काढणी सुरू होणार आहे. यानंतर हस्त नक्षत्राच्या पाऊसधारा पडल्यावर शेतकरी रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी तिफणीवर हात ठेवतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे यंदा पाऊसकाळ चांगला होत असल्याने शेतकरी बांधवांत सध्यातरी समाधानाचे वातावरण आहे. जनावरांना मुबलक पाणी-चारा निर्माण झाल्याने जिल्हा प्रशासनावरचाही दुष्काळी ताण कमी झाला आहे. गतवर्षी चारा बियाणे वाटपासाठी जिल्हा प्रशासनाने तब्बल ३५० कोटीचे चारा बियाणे जिल्हाभरात वाटले होते.

टंचाईच्या ठिकाणी २५० च्या घरात पाण्याचे टँकर चालू केली होती. दुष्काळी मदतनिधी मोठ्या प्रमाणात शासन स्तरावरून दिला होता. यंदा चांगला पर्जन्यकाळ असल्याने पिकेही जोरात येणार आहेत मात्र आता आगामी नक्षत्रातील अतिवृष्टीचा त्यांना फटका बसू नये, इतकीच माफक अपेक्षा शेतकरी बांधवांची आहे.

### दाते पंचांगकर्त्यांचाही पावसाचा अंदाज ठरतोय खरा

दाते पंचांगानुसार यावर्षीच्या नक्षत्रानुसार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला होता. केरळमध्ये मान्सूनचे आगमन १ ते ४ जून मध्ये वेळेवर होईल, मात्र महाराष्ट्रात १० जून नंतर मान्सून प्रवेश करेल आणि २२ जून ते १० ऑगस्ट या काळात चोहीकडे मुबलक पाऊस होईल. काही भागात जनजीवन विस्कळीत होईल. १० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या काळात पर्जन्यमान मध्यम राहील नंतर २० सप्टेंबर पर्यंत पाऊस ओढ धरेल व वृष्टीखंडित होईल. पुन्हा पाऊस सक्रीय होऊन २० ऑक्टोबर पर्यंत मध्यम पाऊस पडेल आणि सरासरी भरून निघेल इतका पाऊस होईल. तसेच १ ते १५ नोव्हेंबरपर्यंत पाऊस अपेक्षित आहे. एकंदरीत आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, हस्त व चित्रा नक्षत्राचा पाऊस समाधानकारक होईल, असा अंदाज दाते पंचागकर्ते मोहन दाते यांनी बांधला होता. सध्याचे चित्र पाहिले तर त्यांचा अंदाज बऱ्यापैकी खरा ठरतो आहे, असे वाटते.

### ऊस, फळबागा, रेशीम लागवड वाढणार

जिल्ह्यात जास्तीचा पाऊसकाळ झाल्यास ऊस पीक जोरात येते. थोडा कमी पाऊस झाल्यास आपल्या जिल्ह्यात डाळिंब पीक आणि रेशीम लागवडही करता येते आणि याचे उत्पन्नही कमी पाण्यात मिळते. यंदा ऊस पिकाबरोबर डाळिंब आणि रेशीम लागवडीवरही भर द्या, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केल्याने यावर्षी ऊस लागवडीबरोबर डाळिंब आणि इतर फळबागा व रेशीम लागवड वाढण्याची शक्यता आहे. उसाला पर्याय म्हणून आणि चांगले आर्थिक उत्पादन म्हणून सध्या डाळिंबाकडेच शेतकरी वळत असल्याचेही चित्र दिसून येत आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनीही काही शेतकऱ्यांच्या शेतात जावून डाळिंब पिकाची पाहणी करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे.




सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींची महापूजा मंगळवारी माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख यांच्या हस्ते झाली. याप्रसंगी उपस्थित कार्यकारी संचालक तथा समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, अॅड. चैतन्य पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, होटगी स्टेशनचे सरपंच जगन्नाथ गायकवाड, भाजपाचे जिल्हा चिटणीस यतीन शहा, महेश स्वामी.

## अभिनेता गश्मीर महाजनी व्यंकटध्वरी नरसिंह शास्त्री यांच्या भूमिकेत

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

छत्रपतींनंतर मराठा साम्राज्याची धुरा पेशव्यांनी अतिशय समर्थपणे सांभाळली. त्यांच्या दरबारात एकापेक्षा एक धुरंदर होते.त्यातील एक म्हणजे सकल शास्त्रपारंगत व्यंकटध्वरी नरसिंह शास्त्री ! श्रीमंतांच्या दरबारातील साक्षात बृहस्पती! पेशव्यांच्या दरबारात त्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या लेखणीतून उतरलेली 'फुलवंती' कादंबरी चित्रपटरूपात आपल्यासमोर ११ऑक्टोबरला भेटायला येणार आहे.यात व्यंकटशास्त्री यांची अतिशय सशक्त व्यक्तिरेखा अभिनेता गश्मीर महाजनी याने साकारली आहे. सोबत अभिनेत्री प्राजक्ता माळी पहायला मिळणार आहे.








## दक्षिणमधून धनगर समाजाला उमेदवारी द्या


### ● समाजाची माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० सप्टेंबर-**

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांची धनगर समाज शिष्टमंडळाने दक्षिण सोलापूर विधानसभा मतदासंघातून धनगर समाजाला उमेदवारी द्यावी, या मागणीचे निवेदन दिले.

सदरचे निवेदन महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीकडे पाठविण्यात येणार असुन याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे शिंदे यांनी शिष्टमंडळास आश्वासन दिले.

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदासंघातून या वेळी धनगर समाजालाच उमेदवारी देण्यात यावी यासाठीचे शिष्टमंडळाद्वारे टाकळी येथील जाई-जुई फार्महाऊसवर भेट घेतली. यावेळी सर्वप्रथम श्री गणेशाचे दर्शन घेऊन श्री. शिंदे यांना उमेदवारीबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी सुरेश डवले व कल्याणी कोकरे यांनी श्री. शिंदे यांचा घोंगडी घालून सत्कार केला. यावेळी सिद्राम चोपडे, अप्पाराव हाके, रावसाहेब होनमाने, कल्याणी कोकरे, सुरेश डवले, मल्लिनाथ देशमुख, शेंडगे, मोटे, लक्ष्मीकांत देवकते, रामदास शिनिवडीयार, राजु बल्लारी, किरण पुजारी, धर्मराज पुजारी, टेळे तसेच दक्षिण सोलापूर मतदारसंघातून प्रत्येक गावातील धनगर समाजबांधव उपस्थित होते.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सातलिंग शटगार यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

एमआयडीसी आकाशवाणी येथील रविकिरण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री दत्तप्रशाला आणि जुनिअर कॉलेजचे प्राचार्य सातलिंग शटगार यांना सोलापूर शहर जिल्हा माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे वतीने दिला जाणारा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर झाला. श्री शटगार हे गेल्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे२० वर्षे काम केले.



३५ वर्षापासून शिक्षकी पेशात आहेत. वरिष्ठ व निवड वेतन श्रेणीचे जिल्हा समन्वयक म्हणून आणि अनेक वर्षापासून दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेचे भरारी पथक सदस्य म्हणून त्यांनी कामगिरी बजावली आहे. शासनातर्फे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे सर्व प्रशिक्षणाचे जिल्हाप्रमुख म्हणून ते काम करीत आहेत. सोलापुरात झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलन व साहित्य संमेलनामध्ये जिल्हाभर फिरून ज्योत यात्रा त्यांनी यशस्वी केली होती. अंधश्रद्धा निर्मूलन बरोबरच अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, गांधी फोरम हुतात्मा प्रतिष्ठान गुरु विद्या प्रतिष्ठान, लायन्स क्लब ट्वीन सिटी आदी सामाजिक संघटनेमध्ये ते कार्यरत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### ताता गणपती मंडळातर्फे शुक्रवारी अथर्वशीर्ष पठण

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

पूर्व विभाग प्रमुख मानाचा ताता गणपती सांस्कृतिक मंडळातर्फे शुक्रवार, दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता सामुहिक अथर्वशीर्ष पठणचे आयोजन करण्यात आले आहे. हे अथर्वशीर्ष पठण ताता गणपती मंडपासमोर, मार्कंडेय चौक येथे होणार आहे. अथर्वशीर्ष पठणमध्ये जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष बालाजी आरकाल ९४२३०६५३२९, उपाध्यक्ष ॲड. संदीप संगा ९४२०६४८५७७ या नंबरवर संपर्क करावे, असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

### रिपाइं वाहतूक संघटनेच्या अध्यक्षपदी इरफान शेख

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व अल्पसंख्याक विभाग सोलापूर शाखेची बैठक संपर्क कार्यालय येथे घेण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे हे होते. या वेळी वाहतूक संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेच्या शहर अधक्ष्यपदी इरफान शेख यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच नियाज शेख यांची शहर उपाध्क्षपदी, असिफ शेख यांची सचिवपदी, इस्माईल शेख यांची संघटकपदी, आरमन शेख यांची शहर सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली. यावेळी माणिक आठवले, जक्कपा कांबळे, मेजर साबळे, रझाक मुजावर, सलीम मुल्ला, शिकंदर शेख, संगराज बिराजदार, इम्रान शेख, जुबेर बागवान, अझहर चौधरी, युसुफ मौलाली, फारुक शेख, समीर सैय्यद, दाऊद बागवान, रझाक तडमोड, वहाब दारूवाले आदी उपस्थित होते.



### भीम शक्ती संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी मिलिंद प्रक्षाळे

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर -**

माजी सामाजिक न्याय मंत्री खा. चंद्रकांत हांडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या भिम शक्ती संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी मिलिंद प्रक्षाळे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा प्रभारी नागनाथ बंगाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये फेरबदल करण्यात आला आहे. जिल्हाध्यक्ष संजय रणदिवे यांची महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर विभागीय जिल्हाध्यक्ष रामचंद्र ननावरे व राजा कदम यांना जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. दरम्यान, संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष नागनाथ बंगाळे यांच्याकडे सोलापूर जिल्हा प्रभारी पदाचीही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. लवकरच जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात येणार आहे. अन्यायग्रस्त लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटना नेहमीच तत्पर राहणार असल्याचे नूतन जिल्हाध्यक्ष मिलिंद प्रक्षाळे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस डॉ. सतीश खारवे, विलास सरवदे, नागनाथ कांबळे, अदम बागवान, अश्फाक शेख आदी उपस्थित होते.

### आमदार राऊत यांचा निषेध

**मोडनिंब, दि. १० सप्टेंबर -**

मोडनिंब (ता.माढा) येथे आमदार राजेंद्र राऊत यांचा निषेध करण्यात आला. राज्यात मराठा समाज बांधव आरक्षणासाठी आपला लढा देत आहेत. मराठा समाजाच्या वतीने प्रत्येक घटकाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे-पाटील उपोषणाच्या माद्यमातून प्रयत्न करत आहेत. मिडीयाच्या माद्यमातून समाजाच्या भावना दुखवण्याचे काम आ. राऊत करित असल्याचे आरोग्य समन्वयक दिपक सुर्वे यांनी सांगितले. कोरफळे येथील मराठा सेवक राजाराम पाटील हे मराठा मावळा यांना आमदार राऊत यांचा मुलगा व सहकारी यांच्याकडून अपहरण करून मारहाण करण्यात आली. याचा निषेध करण्यात आला.

# हमाल, माथाडी कामगारांचे कामबंद आंदोलन

- ऐन सणासुदीत बाजार समितीत शुकशुकाट
- टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द करण्यासह घरकुलाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १० सप्टेंबर -**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत असणाऱ्या हमाल मापडी कामगारांनी आंदोलन आता तीव्र स्वरूपाचे केले आहे. टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द करण्याच्या मागणीकडे प्रशासन गांभीर्याने विचार करत नसल्याने, बाजार समितीत कार्यरत असणाऱ्या सोलापूर जिल्हा हमाल, मापाडी, माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीने मंगळवारी कामबंद आंदोलन करत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रमुख प्रवेशद्वारासमोर निदर्शने केली.



आपल्या प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी हमाल, मापडी, माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीने प्रशासनाला सोमवार ९ सप्टेंबरपर्यंतचा अल्टिमेटम दिला होता. परंतु समन्वय समितीच्या झालेल्या बैठकीत प्रशासनाला या प्रश्नावर विचारविनिमय करण्यासाठी आणि तोडगा काढण्यासाठी एक दिवस मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे कामगारांनी सोमवार ऐवजी मंगळवार, दि. १० सप्टेंबरपासून काम बंद करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार आज मंगळवारी सकाळपासून बाजार समितीमधील कांदा फळ आणि भुसार विभाग पूर्णतः बंद ठेवून निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला. दरम्यान कांदा सेलहॉल मधील कांद्याचे लिलाव संपूर्णपणे बंद ठेवण्यात आल्याने सर्वत्र शुकशुकाट होता. तर फळ विभागात देखील कोणताही व्यवहार झाला नाही. भुसार विभागात काही अडत व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली होती. तर काहींनी दिकाने उघडले, परंतु कामगारच कामावर नसल्याने कोणत्याही व्यवहार झाले नाहीत. संबंधित बाजार समिती प्रशासकीय कार्यालय, जिल्हा उपनिबंधक कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, कामगार आयुक्त कार्यालय, या प्रशासकीय कार्यालयांना यासंबंधीचे पत्रव्यवहार करून कामबंद आंदोलन करण्यासंबंधी कळवण्यात आले होते.

**आंदोलनात सहभागी संघटना**

*माता रमाई संघटना
*माथाडी कामगार विकास मंडळ
*फ्रुट कामगार संघटना
*लाल मिरची कामगार संघटना
*माथाडी कामगार संघ

**निदर्शने देऊन नोंदवला निषेध**

शासन आणि प्रशासन कामगारांच्या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. आंदोलन सुरू करून अनेक दिवस उलटले तरी देखील यावर निर्णय होत नसल्याने, शेवटी कामबंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार मंगळवार सप्टेंबर रोजी सकाळपासून कांदा विभाग, भुसार-आडत विभाग आणि फळ विभागातील सुमारे दोन हजार कामगार आपले कामबंद ठेवले आहेत. अत्यावश्यक असणारे भाजीपाला विभाग सुरू ठेवण्यात आला होता.

**- भिमा सिताफळे,**
**उपाध्यक्ष कामगार समन्वय समिती**



**टप्पा दुरुस्ती मागणी ही न्यायप्रविष्ठ बाब :** हमाल माथाडी माथाडी कामगारांच्या टप्पा दुरुस्तीची मागणी ही न्यायप्रविष्ठ बाब आहे. यामध्ये जिल्हा उप निबंधक कार्यालयाकडून सूचना दिल्या आहेत. बाजार समिती प्रशासन यामध्ये कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. कामगारांनी त्यांच्या कामाचा मोबदला माथाडी बोर्डात भरावा, अडत व्यापाऱ्याकडून रोखीने व्यवहार करू नये. वास्तविक पाहता राज्यामध्ये हमाली १ रुपया ५० पैसे इतकी असताना, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हमाली १ रुपया ९० पैसे इतकी आहे.

**- दत्तात्रेय सूर्यवंशी, सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती**

**हमालीचे टप्पे :** ●१ ते १० किलोसाठी - ३८ पैसे ●११ ते ३० किलोसाठी - १.रू. १४ पैसे●३१ ते ५० किलोसाठी - १. रु. ९० पैसे●कामगारांना पाहिजे सरसकट हमाली - १.रू.९० पैसे

# सोन पावलांनी गौरी आली घरी!

- सुवासिनी महिलांनी गौरीचे केले विधिवत आवाहन

**तभा वृत्तसेव ,**
**सोलापूर, दी. १० सप्टेंबर -**

गौरी आली...सोन पावलांनी... काय घेऊन आली...सुख समृद्धी... गौरी आली... सोन पावलांनी...काय घेऊन आली...आरोग्य धन संपदा ! असे म्हणतं, सुवासिनी महिलांनी सायंकाळी गौरीचे आवाहन केले.

यावेळी भक्तांच्या घरोघरी मंगलमय आणि चैतन्यमय वातावरण निर्माण झाले होते. गौराई आणि पिळवंडाच्या येण्याने सर्वत्र आनंदोत्सव पसरला होता. निमित्त होते गौरी गणपती सणाचे ! सोलापूर शहर जिल्ह्यात गौरी गणपतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. दिवसभर गौरीचे विधिवत आवाहन करण्याचा मुहूर्त होता, त्यानुसार सुवासिनी महिलांनी एकत्रित येऊन सुपामध्ये जेष्ठा आणि कनिष्ठा गौराईचे मुखवटे ठेवून त्यांची तुळशी वृंदावनासमोर पूजन आणि विधिवत आरती करण्यात आली.



रात्री उशिरापर्यंत गौरी सजावट करण्यात आल्यानंतर गौरीच्या मुखवट्यांना साडी परिधान करून त्यांची विधिवत प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी आगमनास जेष्ठा आणि कनिष्ठा गौरीला शेपूची भाजी आणि भाकरीचा नैवद्य अर्पण करण्यात आला. दुसऱ्या दिवशी म्हणजेच, गौरी पूजनादिवशी सकाळी गौरीस विविध अलंकारांनी सजवले गेले, सुवसिक पुष्पहार अर्पण करून परंपरेनुसार वेदोक्त मंत्र पुष्पांजली वाहून आरती करण्यात आली. यावेळी गौराई समोर विविध सोळा प्रकारच्या भाज्यांचा आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. दिवसभर घरामध्ये मांगल्याचे प्रतीक असलेल्या गणरायाचे चरणी भक्तगण तल्लीन होऊन जातात. गौरीपूजन करून सुवासिनी महिला हळदी-कुंकवाच्या समारंभात व्यस्त असल्याचे चित्र दिसून येते. अनेक आप्तेष्टांच्या घरी जाऊन गौरी पूजन आणि हळदी कुंकू समारंभ संपन्न होते. गौरी विसर्जन दिवशी मोठ्या जड अत:करणाने सुवासिनी महिला भाविक गौरीचे विधीनुसार दोऱ्यांचा कार्यक्रम घेऊन गौरी विसर्जन करण्यात येते. या तीन दिवसांच्या काळात भक्तांच्या घरोघरी आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण दिसून येते.

**विधिवत आवाहन करून पूजन**

सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील परंपरेनुसार आमच्या घरामध्ये गौरीचे आगमन झाले. यावेळी गौरीचे पूजन करण्यात आले. हळदी कुंकू वाहून आरती केली. तद्नंतर सुपात गौरी ठेवून घरात सर्वत्र फिरविण्यात आले. गौरीला शेपूची भाजी नेवेद्य दाखवला.यावेळी साऱ्या घरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे.

**- लक्ष्मी राशिनकर, भवानी पेठ**

# फुलांच्या हाराची किंमत कमी करा म्हटलं की निघा पुढं...

**गौरी-गणपती सणामध्ये फुल व्यापाऱ्यांची झाली चांदी**

- गौराई आगमनादिवशी ८०० ते अडीच हजारापर्यंत हाराचे सेट
- सर्वसामान्य नागरिकांचे कोलमडले बजेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

वर्षभर या हो साहेब, दादा, काका, मावशी, ताई...हार घ्या...फुलं घ्याऽऽ ...इकडे कमी किंमत आहे...इकडे चांगले हार आहेत, असे म्हणणाऱ्या व्यापाऱ्यांनी आज गौरी-गणपतीच्या सणानिमित्त ग्राहक दारात आला आणि त्यांनी हारांची किंमत किंचीत जरी कमी करा...इतकंही म्हटलं तरी निघा पुढं...अशी काही फुल व्यापाऱ्यांची कठोर प्रतिक्रिया ऐकायला मिळाली. हार-दांडा-फुलांच्या सेटचे भलतेच दर वाढवून सर्वसामान्य नागरिकांची त्यांनी चांगलीच पंचायत केली. आज दिवसभर शहरातील मधला मारूती, विजापूर रोड, ७० फुटी रोड, सात रस्त्यावरील फुलबाजारात गौराईंच्या हाराचा सेट कमीत कमी ८००ते जास्तीत जास्त अडीच हजारापर्यंत विक्री केल्याची माहिती मिळाली. यामुळे सर्वसामान्यांचे बजेट चांगलेच कोलमडले.

श्री गणेशाची प्रतिष्ठापना झाल्यापासून विविध रंगी फुलांची मागणी वाढल्याने किंमतीही वाढल्या आहेत. यामुळे शेतकरी बांधवांना २ पैसेही वाढीव दर मिळत आहे. मात्र, शेतकरी बांधवांच्या चारपटीने व्यापाऱ्यांनी मात्र चांगलीच चांदी करून घेतल्याचे दिसून येत आहे. आज दिवसभर फुलांच्या बाजारात ग्राहकांची तोबा गर्दी दिसून आली. इतकेच नाहीतर आरास करण्यासाठीचे साहित्य, विविध फळे, मिठाई, केळीची पाने आदींचेही दर चांगलेच भडकले होते. एक दिवसाचा गौराईंचा सण असतो... आपापल्या गौराईला चांगले सजवावे...नटवावे... म्हणत सर्वच ग्राहकांनी हार, गजरे, दांडे आदींचे सेट या व्यापाऱ्यांकडून विकत घेतले आणि शहरातील गौराईचे आगमन मोठ्या उत्साहात करण्यात आले आहे. दरम्यान, या फुलांच्या हारांच्या किंमती मात्र सर्वसामान्यांना परवडतील, अशाच व्यापाऱ्यांनी लावाव्यात, अशी अपेक्षाही काही जाणकार ग्राहकांनी दै. तरूण भारतशी बोलताना मंगळवारी (दि. १०) व्यक्त केली.



सोलापूर : सोलापूर शहरात मंगळवारी दुपारी लक्ष्मी आगमन फुलाचा बाजार चांगलाच बहरला. मधल्या मारुती चौक परिसरात गर्दी (छायाचित्र : केवल तिवारी)

# सोलापुरात छत्रपती श्री शिवाजी महाराज कथा

- प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज मराठीतून करणार उद्बोधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या सात दिवसीय कथेचे मराठीतून आयोजन समस्त हिंदू समाजातर्फे भारतात प्रथमच सोलापुरात होत आहे. श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्याचे कोषाध्यक्ष प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज दि. १९ ते २५ सप्टेंबर दरम्यान दररोज दुपारी ४ ते सायंकाळी ७.३० दरम्यान जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूल येथे मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सी. ए. राजगोपाल मिणीयार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

समस्त हिंदू समाज सोलापूरतर्फे ही विशेष पर्वणी शिवभक्तांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. शेकडो वर्षे अत्याचाराने ग्रासलेला आणि गुलाम गिरीत अडकलेला हिंदू समाज छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करून मुक्त केला. छत्रपती श्री शिवाजी महाराजांची महती आजवर अनेक व्याख्याने, नाटक, चित्रपट, पोवाडे अशा अनेक माध्यमांतून गायली गेली आहे. मात्र छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या महान कार्याची माहिती कथा रूपाने मराठी भाषेत सांगण्याची ही पहिलीच वेळ आहे. प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून ही कथा मराठीतून ऐकण्याची सुवर्णसंधी सोलापूरकरांसह महाराष्ट्रातील शिवभक्तांना मिळणार आहे.





छत्रपती श्री शिवरायांचा जन्म, शिव संस्कार, शिवप्रताप, शिवधैर्य, शिवशौर्य, शिवचातुर्य आणि शिवविजय या सात विषयांवर सात दिवस श्री शिवचरित्रातील विविध प्रसंग प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज आपल्या ओघवत्या शैलीतून शिवभक्तांसमोर मांडणार आहेत. सोलापूर शहर जिल्ह्यासह सर्व शिवभक्तांनी या कथेस दररोज उपस्थित राहून श्री शिवचरित्र कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सी. ए. राजगोपाल मिणीयार यांनी केले. या पत्रकार परिषदेस हेमंत पिंगळे, संगीता जाधव, सतीश सिरसिल्ला, आकाश शिरते आदी उपस्थित होते.

**गुरुवारी निघणार शोभायात्रा**

छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेच्या निमित्ताने पहिल्या दिवशी गुरुवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता समस्त हिंदू समाजातर्फे शहरातून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. बाळीवेस येथील श्री मल्लिकार्जुन मंदिरापासून ही शोभायात्रा छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक, मेकॅनिक चौकमार्गे जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूल येथे विसर्जित होणार आहे. या शोभायात्रेत शहरातील विविध शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटना, महिला मंडळे आपल्या कला पथकांसह सहभागी होणार आहेत. शोभायात्रा कथेच्या ठिकाणी आल्यानंतर प. पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज शिवभक्तांना पहिला भाग सांगणार आहेत. सोलापूरकरांनी या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन हेमंत पिंगळे यांनी याप्रसंगी केले.

## डॉ. नेताजी कोकाटे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ सुटाचे अध्यक्ष तथा विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभुर्णी येथील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. नेताजी कोकाटे यांना मंत्रालय समन्वय समिती मुंबई आणि स्वाभिमानी शिक्षक महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. येथील सिंहगड कॉलेज येथे माध्यमिकचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख, सहाय्यक पोलिस आयुक्त राजन माने आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. डॉ. नेताजी कोकाटे हे सोलापूर विद्यापीठात इंग्रजी विषयाचे पीएच.डी.चे मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. नुकतीच त्यांची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८८४

**यया बोला येरें विचक्षणें । म्हणितलें हां जी कवणासि तें उणें।**
**तुम्ही बकाकरवीं चांदिणें। चरऊं पहा मा।।**

अर्जुनाने विश्वरुप दाखवा म्हणताच, भगवंतांनी मागचा पुढचा विचार न करता तात्काळ विश्वरुप दाखवायला सुरुवात केली. भगवतांच्या ठिकाणी आप-पर भेद नसल्याने हे सर्व विश्व म्हणजे त्यांचे स्वरुप आहे. सर्व प्राणीमात्र म्हणजेच ईश्वराचा अंश आहेत. हा सर्व निसर्ग म्हणजेच ईश्वर असल्याचे भगवंत अर्जुनाला बोलून गेले होते. म्हणून आपल्या विश्वरुपात भगवंतांनी अर्जुनासमोर सर्व प्राणीमात्रांचे एकत्रीकरण दाखविले. या ईश्वरीय विश्वरुपात कांही रुपे रोडकी, कांही लठ्ठ, कांही बुटकी, कांही विशाल, कांही अत्यंत सात्विक, कांही क्रियाशील, तर कांही स्तब्ध, काही उदास, तर काही प्रेमळ, कांही अतिसंतप्त होती. काही



झोपेत असलेली, काही सतर्क, काही साधव, काही सर्वापासून अलिप्त, तर कांही गंभीर, काही उदार तर काही अतिकृपण, काही रागीट, काही रुपे शांत, काही आशाबध्द काही विरक्त कित्येक उग्र, तर कित्येक प्रेमळ, कांही भयंकर तर काही विचित्र, कांही समाधानी काही निर्माण करणा-या वृत्तीची, तर काही संहार करणा-या वृत्तीची तर काही अलिप्त रुपे या विश्वरुपात सामावलेली होती. या विश्वरुपात एखादे प्राणीमात्र नाही असे अजिबात नव्हते. अर्थात, सर्व जीवसृष्टीचा मिलाप या विश्वरुपात होता.

विश्वरुपातील ही सर्व रुपे, वेगवेगळया प्राणीमांत्राची होती. माणूस स्वभावप्रमाणो वेगवेगळा वाटतो, मानवी स्वभाव सारखा असत नाही. प्रत्येकजण भिन्न त-हेने वागतो. ही भिन्नता एकत्र केली म्हणजे विश्व रुप तयार होते. विश्वरुप म्हणजे दुसरे-तिसरे कांही नसून वेगवेगळया स्वभावांच्या व्यक्तिंचे एकत्रीकरण होय. सर्वांना सोबत घेऊण चालणारा, सर्वांना समान समजणारा म्हणजे भगवंत, असेच कांही या विश्वरुपातून भगवंतांना सांगावयाचे असेल. आपण अर्जुनाला हे विश्वरुप दाखवित असतांना ते पाहण्याची योग्यता दिली किंवा नाही हे भगवंत विसरले होते. हे सर्व सविस्तर स्वरुप दाखवून झाल्यानंतर भगवंतांनी अर्जुनाला विचारले की, अर्जुना पाहिलासना माझे स्वरुप कसे आहे ते. त्यावर अर्जुन कांहीच बोलला नाही. तो पुर्वीप्रमाणे विश्वरुप पाहण्याच्या इच्छेने स्तब्ध उभा होता. श्रीकृष्णाने पुन्हा-पुन्हा विचारल्यानंतर अर्जुन म्हणाला, यया बोला येरें विचक्षणें । म्हणितलें हां जी कवणासि तें उणें। तुम्ही बकाकरवीं चांदिणें। चरऊं पहा मा।।. अर्थात, अर्जुन म्हणाला अहो भगवंता, मी विश्वरुप पाहू शकलो नाही, हा कमीपणा माझा नाही. हा कमीपणा तुमचा आहे. कारण तुम्ही मला प्रथम योग्यता दयायला पाहिजे होती. बगळयाकडून चांदण्याचे सेवन होत नाही. ते सेवन चकोराकडूनच होते याची जाण असतांनाही आपण मला बगळाच ठेवून चांदण्याचे सेवन केले का असे विचारत आहात. प्रथम आपण मला चकोर बनवायला पाहिजे हे आपण विसरलात. शिष्याला पाहिजे. ती प्राप्ती झाली नाही तर हा शिष्याचा कमीपणा नसुन तो त्याच्या सदगुरुचा असतो. कारण सदगुरु देण्यात कुठेतरी कमी पडले असा त्याचा अर्थ असतो, हे अर्जुनाने येथे पटवून दिले आहे. भगवंतच येथे कमी पडल्याचे अर्जुनाने स्पष्ट करुन दाखविले. यातून अर्जुनाचा भगवंतावरील अधिकार स्पष्ट दिसुन येतो. आपल्या जीवनात एखादे तरी व्यक्तिमत्व असे असावे की, ज्यावर आपण असा अधिकार गाजवू शकतो.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## डिजीसीएची टीम करणार कसून तपासणी

### जिल्हाधिकारी यांच्याकडून होटगी रोड विमानतळाची पूर्व पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

होटगी रोड येथील विमानतळाचे नियमन आणि सुरक्षा निरीक्षण प्रणाली द्वारे सुरक्षितता आणि हवाई सक्षमता तपासणी करण्यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची टीम दि. १० सप्टेंबर रोजी सायंकाळी सोलापूर येथे येणार आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज सकाळी सोलापूर विमानतळावरील कामकाजाची व सुरक्षा व्यवस्थेची पूर्व पाहणी केली.



यावेळी सोलापूर विमानतळाचे अधिकारी चांपला बानोथ यांनी विमानतळाच्या पूर्ण होत असलेल्या कामकाजाची इत्यंभूत माहिती देऊन सुरक्षेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. इतकेच नाहीतर ब्युरो ऑफ सिविल एव्हिएशन सिक्युरिटीचे अधिकाऱ्यांनी पहिल्या भेटीत काढलेल्या त्रुटींची पूर्तताही केल्याची माहिती बानोथ यांनी दिली.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची टीम दि. ११ व १२ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने विमानतळाची पाहणी व तपासणी करणार आहे.

ब्युरो ऑफ सिव्हिल एव्हिजन सिक्युरिटी (नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो) च्या अधिकाऱ्यांनी होटगी रोड सोलापूर विमानतळाची सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विविध पातळीवर अत्यंत काटेकोरपणे तपासणी केली.

विमानतळ प्राधिकरण कडून सुरक्षेच्या त्रुटींची पूर्तता केल्यानंतर पुन्हा ब्युरो ऑफ सिविल एव्हिएशन सिक्युरिटीचे अधिकारी तपासणीसाठी आलेले होते. त्यांची तपासणी झाल्यानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची टीम विमानतळाच्या विविध सुरक्षा मानके याबाबत तपासणी करण्यासाठी येत आहे. तपासणी झाल्यानंतर त्यांच्या कडून प्रमाणपत्र मिळेल व त्यानंतर सोलापूर विमानतळ येथून विमानसेवा सुरू होण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

## 'श्रद्धा हा मानवी जीवनाचा आधार'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० सप्टेंबर-**




श्रद्धा हा मानवी जीवनाचा आधार आहे. आधारावाचून आधेय असू शकत नाही.आधेय सांभाळण्यासाठी आधार सशक्त हवा.श्रद्धा ही मजबूत असावी. श्रद्धा ही नुसते आधार नव्हे तर श्रद्धेमध्ये महान प्रेरक शक्ती असते, असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

आपण रोज ईश्वराची वाणी,जिनवाणी ऐकतो.फक्त ऐकणे नको तर ईश्वराच्या वाणीप्रती आपली आस्था व श्रद्धा हवी.ही वाणी हृदयात धारण करा.आपण फक्त एखादा डॉक्टर चांगला आहे एवढे ऐकून विश्वास ठेवून त्या डॉक्टरांकडे जातो. औषधोपचार घेतो आणि बरे देखील होतो. आपली त्या डॉक्टरांवर श्रद्धा वाढते,विश्वास वाढतो. आपणही त्या डॉक्टरांचा संदर्भ दुसऱ्यांना देतो. त्याप्रमाणे ईश्वरावर देखील श्रद्धा हवी.शास्त्र,आगम, धर्मग्रंथ आपण वाचतो,ऐकतो.नंतर त्याप्रती आपल्याला रुची जागृत होते. यासाठी श्रद्धा ही जागृत हवी.श्रद्धा ही निःशंक हवी साशंक नको.ईश्वराची वाणी हेच सत्य एवढा आपल्याला दृढ विश्वास हवा.श्रद्धा ही आपल्या अंतरात्म्यात,हृदयात खोलवर रुजलेली असावी.

## धन धन मुनिवरा पारणा महामहोत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

जैन पर्युषण पर्वनिमित्ताने श्री. जैन श्वेतांबर आदेश्वर भगवान मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष उद्योजक इंद्रमल जैन परिवाराच्या वतीने उपवास सोडण्याचा कार्यक्रम झाला.



या कार्यक्रमास प.पु. आचार्य भगवंत श्री विजय हितरत्नसूरीश्वरजी महाराजा के परम विनयी शिष्य, वैयावच्च प्रेमी प.पु.मुनिराज श्री कुलचंद्रविजयजी महाराजा यांचा १७ दिवस तसेच उद्योजक जैन यांची अमेरिकेतील कन्या रेश्मा जयजी संघवी यांचाही ८ दिवसाचा उपवास कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी आदिनाथ भगवान मंदिर जोडभावी पेठ येथून प्रभाकर महावीर हाउसिंग सोसायटी येथील उद्योजक जैन यांच्या निवासस्थानापर्यंत वाजत-गाजत पंचतुर्थी (चैत्य परिपाठ) करत सर्व सकल संघासोबत येऊन हा कार्यक्रम संपन्न झाला. या धन धन मुनिवरा पारणा महोत्सवेळी आमदार विजयकुमार देशमुख, उषा जैन, गटनेते आनंद चंदनशिवे, नगरसेवक गणेश पुजारी, उद्योजक तुकाराम गायकवाड, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी बोंधर, ब्रिजमोहन फोफलिया, महावीर बँकेचे चेअरमन दीपक मनोज, उद्योजक हर्षल कोठारी, गौतम संचेती, जयचंद वेद, विकी जैन, चेतन बाफना, विकास संघवी, भैरूलाल कोठारी, गौतम, मनमोहन वेद, प्रतिक चंदनशिवे आदी उपस्थित होते.

## ठोकळ प्रशालेची मुख्य हेड पोस्ट ऑफिसला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेतील इयत्ता नववी मधील विद्यार्थी तसेच शिक्षकांनी ऐतिहासिक वारसा लाभलेल्या इमारतीस भेट या उपक्रमांतर्गत सोलापूर येथील मुख्य हेड पोस्ट ऑफिस येथे भेट दिली.




सोलापूरात पोस्ट व टेलिग्रामची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ब्रिटिशांना १९०८ मध्ये या कलोनियन इमारतीची बांधणी केली. स्थानिक हवामानानुसार पोषक अशा असणाऱ्या इमारतीचे सौंदर्य व भव्य वास्तू पाहून विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले.

याप्रसंगी तज्ञ मार्गदर्शक म्हणून सोलापूर भारतीय मुख्य डाक विभागाचे वरिष्ठ पोस्ट मास्तर विलास मस्तूद यांनी विद्यार्थ्यांना भारतीय डाक विभागाचा इतिहास, बदल, गतिमानता, पारदर्शकपणा सुकन्या योजना, खाते उघडणे, आधार कार्ड योजना, लाडकी बहीण योजना, पाचवी ते नववी पर्यंत शिष्यवृत्ती योजना ,विविध खात्यांचे प्रकार विविध, प्रकारच्या ठेवी, विविध ठेव योजना, रखमा काढणे व जमा करणे यासाठी लागणाऱ्या विविध फॉर्म, विविध खात्यावर व ठेवींवर मिळणारे व्याज व सुविधा इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी पोस्ट व्यवहारासंबंधी आपले प्रश्न विचारून शंकांचे समाधान करून घेतले. संस्थेचे उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका शिल्पा ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे यांनी विद्यार्थी तसेच शिक्षकांचे कौतुक केले. तसेच उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डी.डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सहशिक्षक युसुफ शेख व सहशिक्षिका पूनम चव्हाण यांनी परिश्रम घेतले.



## गुरूविद्या आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जन्मदिनी शिक्षक दिनाच्या औचित्य साधून गुरूविद्या प्रतिष्ठानचे गुरूविद्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण हॉटेल समद्ध येथे समारंभ थाटात संपन्न झाले.

हे पुरस्कार वितरण समारंभ अक्कलकोटचे माजी गटशिक्षण अधिकारी राजशेखर नागणसुरे, संगमेश्वर कॉलेजचे माजी प्राचार्य नरेश बदनुरे, प्राध्यापक भिमाशंकर बिराजदार, प्रतिष्ठानचे संस्थापक सोमशेखर भोगडे, अध्यक्ष सातलिंग शटगार, उपाध्यक्षा राजश्री तडकास, सहसचिवा रेणुका हब्बू, कार्याध्यक्षा नमिता थिटे, विजयकुमार भोगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. सुरूवातीस मान्यवरांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. उपाध्यक्षा राजश्री तडकासे यांनी प्रास्ताविक केले. सचिवा श्रीदेवी यळमेली यांनी सूत्रसंचलन केले.

**पुरस्कार प्राप्त शिक्षक :** राजकुमार उंबरजे सिद्धेश्वर (उपमुख्याध्यापक, सिद्धेश्वर प्रशाला), नागराज पंडित-पाटील (रामलिंगेश्वर प्रशाला तीर्थ), महादेव करे (यमाई देवी प्राथमिक आश्रम शाळा, मार्डी), रुद्रमणी वैजिनाथ स्वामी (सहशिक्षक, करंजकर विद्यालय सोलापूर), मिनाक्षी कुलकर्णी (संगीत शिक्षिका नू..म.वि प्राथमिक शाळा सोलापूर), प्रिती अंकुश दिवसे (सहशिक्षिका मनपा मुलांची मराठी शाळा रामवाडी), शबाना शकूर जिनेदी (सेवानिवत सहशिक्षिका मनपा मराठी मुलांची शाळा रामवाडी). शिक्षकेतर : दत्तात्रय जयहिंद सुतार (छत्रपती शिवाजी प्रशाला, सोलापूर), राचया इरया स्वामी (गेनसिध्द प्रशाला, कुंभारी).

**आदर्श शाळा पुरस्कार :** श्रीदत्त प्रशाला आणि ज्युनियर कॉलेज सोलापूर, श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित श्री सिद्धेश्वर कन्या प्रशाला सोलापूर.

## ध्येयवादी विद्यार्थी घडविण्याचे कार्य शिक्षकच करतात : डॉ. शिवपुजे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

आजच्या गतीशील युगात शिक्षकांचे कार्य ही मोलाचे आहे. संस्कारक्षम, चारित्र्यवान विद्यार्थी घडविण्याचे कार्य शिक्षकच करतात. गुणवंत गुरूवर्यांना एकत्र आणून गौरव संस्था करते, हे कौतुकास्पद आहे, असे विचार वीरशैव ज्येष्ठ नागरिक संघ्याच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित गौरव समारंभात बोलताना अश्विनी मेडिकल कॉलेजच्या मेडिसन विभागप्रमुख डॉ. अंजली शिवपुजे यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी शिवसंतोषी रुणालयाचे प्रमुख स्त्रीरोग तज्ञ डॉ. महादेवी दामा या होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर सर्वश्री



निलकंठप्पा कोनापूरे, राजेंद्र मायनाळ, बाबासाहेब कुलकर्णी, लिलावती मडकी, ताराबाई कोनापूरे प्रमुख अतिथी आप्पासाहेब बिराजदार, मंगला कोनापूरे, बाबुराव पटणे, मुनाळे स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते. माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेची पूजा करून अतिथींनी पुष्पहार अर्पण केले. गंगाबाई कोंपे यांच्या वचनगीतांनी कार्यक्रमाची सुरूवात झाली. श्री निलकंठप्पा कोनापूरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून संस्थेची माहिती दिली. राजेद्र मायनाळ यांनी अतिथींचा परिचय करून दिला. डॉ. महादेवी दामा यांनी प्रार्थना, संस्कार, धर्म, संस्कृती यावर आपले विचार व्यक्त केले.

यावेळी गुणवंत प्राध्यापिका, लेक्चरर यांना भेटवस्तू, श्रीफळ, गुलाब पुष्प, देऊन गौरव करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन सपना पाटील, यादी वाचन प्रा.सुप्रिया कुलकर्णी यांनी केले. बाबासाहेब कुलकर्णी यांनी आभार मानले. ओंकार मंत्रानी कार्यक्रमाची सांगता झाली.

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार**
**दि. ११ सप्टेंबर २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - ज्येष्ठ**
**शु. अष्टमी (२३.४५)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र- ज्येष्ठा (२१.२०)**
**योग - प्रीति (२३.५३)**
**करण - विष्टि (११.३४)**
**सुर्योदय - ०६.२८**
**सूर्यास्त - १८.४२**
**दिनविशेष -**
**ज्येष्ठ गौरी आवाहन**
**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ-लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख-शांती मिळेल.

**वृषभ :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्याच्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

## शिवसैनिकांचा गुरुवारी मेळावा

### शिवसेना उबाठाचे नेते खा. संजय राऊत यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांचा मेळावा गुरुवार दि. १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता विजापूर रोडवरील निर्मिती लॉन्स येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कार्यक्रमासाठी शिवसेनेचे नेते खा. संजय राऊत, सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मेळावा घेतला जात आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून शिवसेना आगामी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकणार आहे. या मेळाव्यासाठी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त शिवसैनिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी केले आहे.





#### जुळे सोलापूर संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

ट्रायंगल टॉवर, लोकप्रिया हॉटेल समोर, जुळे सोलापूर येथे अमर पाटील यांचे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन देखील याचवेळी खा. संजय राऊत यांचे हस्ते केले जाणार आहे.

कार्यक्रमासाठी महिला आघाडीच्या संजना घाडी, उपनेते शरद कोळी, उपनेते अस्मिता गायकवाड, सह संपर्कप्रमुख उत्तमप्रकाश खंदारे, लोकसभा क्षेत्र प्रमुख पुरुषोत्तम बरडे, जिल्हाप्रमुख गणेश वानकर, अजय दासरी, संभाजी शिंदे, धनंजय डिकोळे, दीपक गायकवाड, शहर प्रमुख विष्णू कारमपुरी, दक्षिण सोलापूर संपर्क प्रमुख अरविंद अडविलकर, उप जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, दत्तात्रय गणेशकर, शहर मध्य शहर प्रमुख दत्तोपंत वानकर, उत्तर शहर प्रमुख महेश धाराशिवकर, युवासेनाचे विठ्ठल वानकर, शहर संघटक अतुल भवर आदी उपस्थित राहणार आहेत.

पत्रकार परिषदेस उपनेते शरद कोळी, उपनेत्या अस्मिता गायकवाड, सहसंपर्कप्रमुख उत्तमप्रकाश खंदारे, लोकसभा क्षेत्र प्रमुख पुरुषोत्तम बरडे, जिल्हाप्रमुख गणेश वानकर, भीमाशंकर म्हेत्रे, शरणराज केंगनाळकर , संतोष पाटील, धर्मराज बगले उपस्थित होते.

#### मी इतर कोणाचे नेतृत्व मान्य करत नाही- गणेश वानकर

पत्रकार परिषदेत जिल्हाप्रमुख गणेश वानकर अचानक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. मी इतर कोणाचे नेतृत्व मान्य करत नाही. माझे नेतृत्व मातोश्रीवर उद्धव ठाकरे हेच आहेत, असे त्यांनी उभे राहून सांगितले. पत्रकाराने विचारलेल्या एका प्रश्नावर श्री. वानकर हे चांगलेच भडकल्याचे दिसून आले. अचानक आक्रमक होत गणेश वानकर यांनी आपण स्वतंत्र आहोत, थेट उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व आपण मान्य केले आहे. येथील कोणाच्या नेतृत्वात काम करण्याचा प्रश्नच नाही. हातवारे करत बोलत असलेल्या वानकर यांची आक्रमकता पाहून अखेर सहसंपर्कप्रमुख उत्तमप्रकाश खंदारे तसेच उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनी सारवा सारव करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, उपनेते शरद कोळी हे शांतच होते.



## रोटरी क्लब सोलापूरद्वारे १० सायकलींचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० सप्टेंबर-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर द्वारे गणपती घाट जवळील सरस्वती मंदिर संचलित सखुबाई हिराचंद नेमचंद शाळेतील १० गरजू विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील माहेश्वरी, सचिव ब्रिजकुमार गोयदानी, माजी अध्यक्ष किशोर चंडक, प्रांतपाल जयेश पटेल, धनश्री केळकर, डॉ. ज्योती चिडगुपकर, कालिदास जाजू, निलेश फोफलिया, संतोष कणेकर, मितेश पंचमीया, पराग कुलकर्णी, आकाश बाहेतीसह संस्थेचे अध्यक्ष ॲड. रघुनाथ दामले, कार्यवाहक सौ. चिलजवार, खजिनदार सुधीर देवसह मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. या सायकली किशोर चंडक व रोटरी जिल्हा ३१३२च्या माध्यमातून देण्यात आल्या असून ह्या सायंकाळी शाळेद्वारे प्रतिवर्षी गरजू विद्यार्थ्यांना वापरण्यास देण्यात येणार आहेत, अशी माहिती सुनील माहेश्वरी यांनी दिली .

## संक्षिप्त वृत्त



### मंगळवेढा शहरातून पोलिसांचे पथसंचलन

**मंगळवेढा दि. १० सप्टेंबर-**

मंगळवेढा शहरात व लगतचा दामाजी तसेच चोखामेळा ग्राम पंचायत हद्दीतून गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाच्यावतीने पथसंचलन करण्यात आले. दरम्यान गणेशोत्सव कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी हे पथसंचलन करण्यात आल्याचे सांगण्यात आले. मंगळवेढा पोलीस ठाणे ते शहरातील दामाजी चौक, शिवप्रेमी चौक, मुरलीधर चौक, शनिवार पेठ, अर्बन बँक, जुने डीवायएसपी कार्यालय, बाजार चौक, किल्ला भाग, दामाजीनगर व चोखामेळानगर ग्रामपंचायत हद्दीतून गणेशोत्सव कालावधीत शांतता नांदावी या दृष्टीने पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांच्या मार्गदर्शनाखाली आरसीपीचे ३२ जवान, २५ पोलीस कर्मचारी, ५२ होमगार्ड,२ पोलीस अधिकारी या पथसंचलनात सहभागी झाले होते. हे पथसंचलन शिस्तबध्द पध्दतीने करण्यात आले. दरम्यान शहराच्या मुख्य मार्गावरुन जात असताना नागरिकांनी बघण्यासाठी रस्याच्या दुतर्फा गर्दी केली होती.




### शितल उलभगत राष्ट्र शिल्पकार नेशन बिल्डर पुरस्काराने सन्मानित

**बार्शी, दि. १० सप्टेंबर-**

येथील शितल चंद्रकांत उलभगत या उपशिक्षिका म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपळे दुमाला मुली या शाळेवर कार्यरत असून त्यांनी विद्यार्थिनींचा सर्वांगिण विकास होण्यासाठी विविध उपक्रम राबविलेले आहेत. त्याचबरोबर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले असून जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत आले आहेत व सैनिक स्कूल परीक्षेतही दोन विद्यार्थिनींनी यश संपादन केले आहे. शिक्षक दिनानिमित्त भारत विकास परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत शाखा बार्शी यांच्याकडून राष्ट्रशिल्पकार पुरस्काराने उलभगत यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. रोटरी इंटरनॅशनल सेवाभावी संस्थेच्या शाखा बार्शीकडून त्यांना नेशन बिल्डर अवॉर्ड या पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले आहे. या त्यांच्या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका छाया कुंभार, जि.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक हनुमंत सोनवणे, ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, वृक्षसंवर्धन समितीचे अध्यक्ष उमेश काळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### मंगळवेढा शहरातून अज्ञात चोरट्याने मोटरसायकल पळविली

**मंगळवेढा दि. १० सप्टेंबर-**

मंगळवेढा शहरातील शिवाजीनगर येथे टेलरच्या दुकानासमोर लावलेली ३० हजार रुपये किंमतीची मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान मागील दोन महिन्यांपूर्वी पाच लाख रकमेसह पळविलेली मोटरसायकल अद्यापही पोलिसांना सापडेना. फिर्यादी बालाजी पांडुरंग ढगे (रा. भाळवणी) यांचे भाऊ सुहास ढगे यांच्या नावावर असलेली (क्र. एम. एच. १३/ डी.के. ७०१०) ३० हजार रुपये किंमतीची मोटरसायकल घेऊन ते बाजार करण्यासाठी मंगळवेढ्याला आले होते. सदर मोटरसायकल ३० ऑगस्ट रोजी रात्री नऊच्या सुमारास शिवाजीनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकी शेजारी असलेल्या टेलरचे दुकानासमोर हँडल लॉक करुन बाजारात गेले होते. रात्री १०.३० वाजता फिर्यादी हे गाडी लावलेल्या ठिकाणी आले असता सदर ठिकाणी मोटरसायकल दिसली नाही. मोटरसायकलचे सर्वत्र आजूबाजूला शोध घेतला. मात्र ती मिळून आली नसल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान मागील दोन महिन्यांपूर्वी शहरातील दामाजी चौकालगत असलेल्या एका दुकानासमोर सेवानिवृत्त शिक्षकाने डिक्कीत ठेवलेले पाच लाख रुपयेसह मोटरसायकल पळविण्याचा प्रकार घडला आहे. अद्यापही पोलिसांना तपास लावण्यात यश आले नसताना पुन्हा दुसरी मोटरसायकल चोरीला गेल्याने मोटरसायकल चोरीची मालिका थांबता थांबेना, अशा प्रतिक्रिया शहरवासीयांमधून व्यक्त होत आहेत.

### विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा

**सोलापूर दि. १० सप्टेंबर,**

येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने हिंगुलांबिका सांस्कृतिक भवन येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. संस्थेच्या विद्यानिकेतन हायस्कूल व हिंगुलांबिका प्राथमिक शाळा व बालक मंदिर येथील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी प्रा. संजय मठ यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेचे सचिव विजय पुकाळे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्ष बापूसाहेब ढगे यांचा सत्कार मुख्याध्यापक गोपीनाथ नवले यांनी केला. प्रा. संजय मठ यांचा सत्कार मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांनी केला तर संस्थेचे सदस्य जगदीप दंतकाळे यांचा सत्कार पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी यांनी केला. संस्थेचे सदस्य जगदीप दंतकाळे यांनी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांचा सत्कार केला. सूत्रसंचलन सहशिक्षक संतोष बनसोडे यांनी केले तर सहशिक्षक नितीन मुसळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.


# 'प्रधानमंत्री आवास'ला जाचक अटींचे कुंपण

## लाभार्थी राहणार वंचित; जागेचा उतारा बंधनकारक, लाभार्थ्यांची होणार दमछाक

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० सप्टेंबर-**

केंद्र सरकारने ग्रामीण भागातील सर्वसामान्य व गोरगरीब नागरिकांना हक्काचा निवारा मिळावा म्हणून प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली. यानुसार प्रत्येक गावात घरापासून वंचित लोकांचा सर्व्हे होऊन त्याची प्राधान्य क्रमाने यादीही प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समितीकडे तयार आहे. पण यामध्ये शासनाने जाचक अट लावली आहे. यामुळे अनेक सर्वसामान्य लाभार्थी वंचितच राहणार हे निश्चित आहे. यामध्ये जो यादीतील पात्र लाभार्थी आहे. त्याच्या स्वतःच्या नावावर जागेचा उतारा असेल तरच त्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

अनेक लाभार्थ्यांच्या नावावर जमिनीचा उतारा किंवा जागेचा उतारा नाही, त्याचे वडील किंवा आईच्या नावेच जागेचा उतारा आहे. या जाचक अटीमुळे अनेक लाभार्थी वंचितच राहणार आहेत. यापूर्वी वडील किंवा आईने स्टॅम्प पेपरवर संमती दिली की संबंधित लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळत होता. पण या जाचक अटीमुळे अनेक लाभार्थी वंचितच राहणार हे स्पष्ट झाले आहे. एकाच कुटुंबातील व्यक्तीने लाभार्थ्यांना संमती देणे चालत नाही. एकतर सध्या एक-दोन गुंठ्यांची खरेदी करायची म्हटले तर खरेदी होत नाही किंवा बक्षीसपत्र करायचे म्हटले तर कमीत कमी दहा गुंठे क्षेत्र आवश्यक आहे. यामुळे पात्र घरकुल लाभार्थ्यांनी अचानक काय करायचे हा कठीण प्रश्न आहे. सध्या सर्वत्र घरकुल यादीला मंजुरी मिळाली असून १७ सप्टेंबरपर्यंत जागेचा स्वतःचा उतारा व सर्व आवश्यक कागदपत्रे ग्राम पंचायत स्तरावरुन पंचायत समितीकडे द्यायची आहेत. शासनाने ही जाचक अट रद्द करुन कुटुंबातील व्यक्तीने लाभार्थ्यांना दिलेल्या संमतीपत्रावरुन घरकुलाचा लाभ द्यावा अशी मागणी होत आहे.



**स्वतःची जागा बंधनकारक**

माळशिरस पंचायत समितीचे प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेचे संबंधित अधिकारी स्वामी यांना विचारले असता त्यांनी या योजनेसाठी लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा पाहिजे, असे सांगितले.

या योजनेसाठी लाभार्थ्यांना स्वतःचा उतारा आवश्यकच आहे. २०१६ पासून हा नियम आहे. सध्या पात्र लाभार्थ्यांकडे जागा उपलब्ध नाही असे लिहून दिल्यानंतर व परत जागा उपलब्ध असल्याचा पुरावा संबंधित लाभार्थ्याने दिल्यास पुढच्या यादीतील मंजुरीवेळी त्याला लाभ देता येतो.

**- नवले,** ग्रामसेवक, कुसमोड

शासनाने सर्वसामान्य नागरिकांसाठी ही योजना सुरु केली आहे. पण केवळ स्वतःच्या जागेचा उतारा नसल्यामुळे लाभ नाकारणे चुकीचे आहे.

**- संजय पाटील**, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत, कुसमोड

# गावकऱ्यांच्या प्रेमाने भारावून गेलो

## आ. समाधान आवताडे : आपला आमदार, आपल्या गावी मुक्कामी उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १० सप्टेंबर-**

'आपला आमदार, आपल्या गावी मुक्कामी' या उपक्रमांतर्गत गेल्या दोन दिवसात सलगर बुद्रुक येथील माता भगिनी, वडीलधारी मंडळी अन् ग्रामस्थांनी भरभरून प्रेम दिले. या प्रेमामुळे मी भारावून गेले अशी भावना समाधान आवताडे यांनी व्यक्त केली.

सलगर बुद्रुक येथे आ. समाधान आवताडे यांनी 'आपला आमदार, आपल्या गावी मुक्कामी' या उपक्रमांतर्गत मुक्काम करून ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. गावात येताच गावकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.सध्या गावांमध्ये गणरायाचे आगमन झाले असल्याने गावात गणेशभक्तीचे वातावरण आहे. हे लक्षात घेऊन आ. आवताडे यांनी गावातील वेगवेगळ्या गणेश मंडळांना भेटी दिल्या व गणरायाची आरती केली. नागरिकांच्या अडचणीबाबत त्यांनी अधिकारी, ग्रामसेवकांना धारेवर धरले. म्हैसाळ योजनेने बंधारे भरून घेणे, ओव्हरलोड डीपीचा भार कमी करण्यासाठी आरडीएसएस अंतर्गत नवीन डीपीसाठी प्रस्ताव सादर करणे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील अडचणी सोडविण्याबाबत सूचना केल्या. यावेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य प्रदीप खांडेकर, सभापती सुधाकर मासाळ उपस्थित होते.

आ. आवताडे यांनी शिंदे वस्ती, बनसोडे वस्ती, चौधरी वस्ती, पुकळे वस्ती, बौद्ध नगर, संगोलकर वस्ती, टिक्के वस्ती, जिल्हा परिषद केंद्र शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, धायगोंडे वस्ती, दूध संकलन केंद्र आदी ठिकाणी भेटी देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.





**सलगरसाठी खर्चला २० कोटींचा निधी**

गेल्या तीन वर्षांत आ. आवताडे यांनी आमदार फंडातून सुमारे २० कोटींचा निधी सलगर बुद्रुकला दिला असल्याचे गावकऱ्यांना सांगितले. यात नवीन अंगणवाडी बांधकाम, मंदिरांना सभामंडप, गावातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य उपकेंद्र आदी कामांसाठी गेल्या तीन वर्षांत २० कोटी रुपयांचा निधी मिळाल्याची माहिती आ. आवताडे यांनी दिली.

**चिमुकल्यांशी संवाद अन् दौऱ्याची सांगता**

दोन दिवसांच्या दौऱ्याचा शेवटचा कार्यक्रम जिल्हा परिषद केंद्र शाळा सलगर बुद्रुक येथे घेतला गेला. यात आ. आवताडे यांनी चिमुकल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिवाय शाळेतील समस्या जाणून घेऊन त्यावर उपायोजना करण्याच्या वरिष्ठांना सूचना केल्या.

# बिबट्यासदृश्य प्राण्याचा लवकरात लवकर बंदोबस्त करा

**खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वन विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज,दि. १० सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यातील फळवणी-काळमवाडी, तांदुळवाडी, कोळेगाव, साळमुख व आजूबाजूच्या परिसरात बिबट्या सदृश्य प्राणी दिसल्याच्या अनेक नागरिक शेतकऱ्यांच्या तक्रारी येत होत्या. या पार्श्वभूमीवर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी तात्काळ यावर उपाययोजना कराव्यात अशा सूचना वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

या परिसरात सातत्याने बिबट्या सुदृश प्राणी दिसत असल्याने लोकांमध्ये घबराट निर्माण झाली होती.या पार्श्वभूमीवर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी वनखात्याचे उपवनसंरक्षक विशाल चव्हाण व वनपरीमंडळ पिलीव, माळशिरस, नातेपुते या अधिकाऱ्यांच्या समवते व ग्रामस्थांच्या उपस्थितीत फळवणी येथे आढावा बैठक घेतली. यावेळेस खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी ज्या भागात बिबट्या सदृश्य प्राणी दिसला आहे त्या भागात सीसीटीव्ही बसवा, तसेच बिबट्या सदृश्य प्राण्याचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा यासाठी अधिकचे पिंजरे बसवण्यात यावे म्हणून वन अधिकारी यांना सूचना केल्या. यावेळी वनअधिकारी लोखंडे, डी. एम. सावंत, एस. एम. लडकत, जगदाळे उपस्थित होते.

# अक्कलकोटच्या न. प. सेंट्रल स्कूलमध्ये विद्यार्थिनींनी दिले धडे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० सप्टेंबर-**

भारताचे माजी राष्ट्रपती, शिक्षण तत्त्वज्ञान, तत्त्ववेत्ता डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन म्हणून देशभर साजरा करण्यात येतो. शिक्षक दिनाचे औचित्य साधून न. प. वरिष्ठ प्राथमिक सेंट्रल स्कूल, अक्कलकोट येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस शिक्षिका बनलेल्या विद्यार्थिनींच्या हस्ते पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. काही विद्यार्थिनींनी शिक्षिकेच्या भूमिकेत विद्यार्थ्यांना अध्यापनाचे धडे दिले. अशा प्रकारे शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

शिक्षक दिनानिमित्त डॉ. प्रशांत वाली व डॉ. विपुल शहा यांनी न. प. वरिष्ठ शाळेत येऊन सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. यानिमित्त आलेल्या मान्यवरांचे मुलींची शाळा नं. १ चे मुख्याध्यापक अय्युब कलबुर्गी व वरिष्ठ शाळेचे ज्ञानोबा केंद्रे यांनी त्यांचे स्वागत केले. इनरव्हील क्लब ऑफ अक्कलकोटमार्फत संस्थेच्या अध्यक्षा रूपाली शहा, चंचल जाजू यांजकडून गुड टच, बॅड टच हा उपक्रम राबवण्यासाठी तिन्ही शाळांच्या पूर्व परवानगीनुसार आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी प्र. मुख्याध्यापक सिद्धाराम पुजारी प्रास्ताविक केले. यावेळी संगीता बावलती, मंजू काळे, उषा बनसोडे, फर्जाना अन्सारी, रजिया जमादार, सविता शिंदे, दिलशाद कलबुर्गी, शशिकला मुकणार, अनिता व्हसुरे उपस्थित होते. संगीता बावलती यांनी आभार मानले.



# शेळगावचे प्रवीण वीर रेशीमरत्न पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१० सप्टेंबर-**

यशदा पुणे येथे रेशीम संचालनालयाच्या वतीने रेशीम रत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सात जिल्ह्यातील २१ शेतकऱ्यांना रेशीमरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये १ एकरामध्ये सर्वाधिक उत्पन्न घेतलेल्या सोलापूर जिल्ह्यातील तीन शेतकऱ्यांना रेशीमरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रथम क्रमांक प्रवीण पांडुरंग वीर ११ हजार, द्वितीय रामा पालवे ७ हजा ५००, तृतीय विनोद केचे ५ हजार तसेच शाल, साडी व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी रेशीम संचालनालयाचे उपसंचालक महेंद्र ढवळे, वस्त्रोद्योग विभागाच्या उपसचिव श्रद्धा कोचरेकर, सहाय्यक संचालक डॉ. कविता देशपांडे, राज्याचे कृषी संचालक सुनील बोरकर, जिल्हा रेशिम विकास अधिकारी पुणेचे संजय फुले, बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार, अधीक्षक अविनाश खडस व इतर अधिकारी उपस्थित होते. रेशीम शेती ही अपारंपारिक व नाविन्यपूर्ण उद्योग असूनही प्रवीण वीर यांनी यश मिळवल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सूत्रसंचालन संजय फुले यांनी तर रेशीम विकास अधिकारी राजेश कांबळे यांनी आभार मानले.




२०१८ साली रेशीम व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला अपयशही आले. तालुक्यामध्ये रेशीम व्यवसायाचा प्रचार आणि प्रसार झालेला नसल्यामुळे मार्गदर्शनही मिळत नव्हते. परंतु जिल्हा रेशीम कार्यालय सोलापूर यांच्याशी जोडलो गेल्यानंतर आमच्या रेशीम व्यवसायाचा कायापालट झाला. जिल्हा रेशीम अधिकारी विनीत पवार व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच आम्ही भरघोस रेशिम उत्पन्न घेऊ शकलो.

**- प्रवीण पांडुरंग वीर**

# उद्धव ठाकरे शिवसेना कोणत्याही परिस्थितीत सांगोला विधानसभा लढवणार

**पंढरपूर विभाग जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १० सप्टेंबर-**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना कोणत्याही परिस्थितीत सांगोला विधानसभा लढवणार अशी माहिती पंढरपूर विभाग जिल्हाप्रमुख संभाजीराजे शिंदे यांनी दिली. ते आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सांगोला येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी पंढरपूर विभाग जिल्हा उपप्रमुख सूर्यकांत घाडगे,सांगोला तालुका प्रमुख अरविंद पाटील, विधानसभा प्रमुख कमरुद्दिन खतीब, शहर प्रमुख तुषार इंगळे,युवा सेना तालुका अधिकारी सुभाष भोसले, शहर अधिकारी सौरभ चव्हाण उपस्थित होते.

पुढे बोलताना संभाजीराजे शिंदे म्हणाले,सांगोला विधानसभा मतदारसंघ हा पारंपारिक शिवसेनेचा असून येथे विजयी उमेदवार देणार आहे. लवकरच आपण सांगोला तालुक्यातील शिष्टमंडळ घेऊन उद्धवजी ठाकरे, शरदचंद्र पवार व नाना पटोले यांना भेटणार असून सांगोला विधानसभा ही जागा ठाकरे शिवसेनेला मिळावी अशी विनंती करणार आहोत. अरविंद पाटील यांनी सांगोला विधानसभा मतदारसंघातील ३०५ बूथ पैकी २५० बुथवर यंत्रणा लावण्याची तयारी पूर्ण झाली असून ५ हजार सदस्य नोंदणी झाली असल्याची तसेच लवकरच सांगोला ग्रामीण भागात २० तर शहरात ६ शाखा काढण्यात येणार आहेत. प्रास्ताविक तुषार इंगळे यांनी केले.




**पक्षाकडे मागणी करणार**

सांगोला विधानसभा ही जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मिळावी अशी विनंती वरिष्ठांकडे करणार असल्याचे सूर्यकांत घाडगे यांनी सांगितले.



# नातेपुतेतील पाठांतर, वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नातेपुते, दि. १० सप्टेंबर-**

परमपूज्य आचार्य श्री शांतिसागर महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त नातेपुते नगरीत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी जैन क्लासेसच्या वतीने घेण्यात आलेल्या पाठांतर व वकृत्व स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला. स्पर्धा तीन गटात घेण्यात आल्या,. पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशाप्रकारे गट पाण्यात आले होते. प्रत्येक गटात तीन-तीन नंबर काढण्यात आले. त्याप्रमाणे पहिल्या गटातील त्वारा नंदन दाते, सौम्या देवकर, श्लोक जाडकर. दुसऱ्या गटात कल्याणी उराडे, शिया कुंभार, सारा दोभाडा तर तिसऱ्या गटातील अर्णव उराडे, तनुजा खर्च या विद्यार्थ्यांनी अव्वल स्थान पटकाविले. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला दोषी मेडिकल, जीना कलेक्शन, सतीश सेल्स, शितलकुमार माणिकचंद जोशी, अशोक गांधी या दातारांच्या हस्ते बक्षिस देण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षक तेजस मोरे होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिवसेनेच्या महिला भजन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १० सप्टेंबर-**
गणेशोत्सव व संत गजानन महाराज पुण्यस्मरण दिनानिमित्त शिवसेनेच्यावतीने आ. शहाजीबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या सांगोला विधानसभा मतदारसंघातील महिलांच्या भजन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत २४ भजनी




मंडळे सहभागी झाली होती. आ. शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते या स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.या स्पर्धेत माऊली महिला संगीत भजनी मंडळ प्रथम, श्री दत्त महिला भजनी मंडळ द्वितीय, श्रीराम महिला भजनी मंडळ तृतीय क्रमांक पटकावला. यावेळी प्रत्येक सहभागधारक महिला भजनी मंडळास प्रोत्साहन बक्षीस देण्यात आल्याची माहिती या स्पर्धेचे संयोजक, शिवसेना सांगोला शहर उपप्रमुख सोमेश यावलकर यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त...



**तडवळे येथील उज्ज्वला पवार या पारंपारिक पध्दतीने ताट-चमच्या वाजवत कुंकवाचे स्वस्तिक, लक्ष्मीच्या पायाचे ठसे उमटवत घराच्या उंबऱ्यातून सोन्याच्या पावलांनी गौरी-लक्ष्मीचे स्वागत केले.**



**बार्शी : वाणी प्लॉट येथे राहणारे नितीन घंटे यांच्या घरी विठुमाऊलीच्या भक्तीरथाचा देखावा सादर केला आहे.**



**अकलूज : शंकरनगर, अकलूज येथील तरुण भारतचे पत्रकार चंद्रकांत कुंभार यांच्या घरी पारंपरिक पद्धतीने मातीच्या महालक्ष्मीचे आगमन झाले. महालक्ष्मीचे मुखवटे ५६ वर्षे पूर्वीचे आहेत. यावेळी कुंभार कुटुंबातील शामा चंद्रकांत कुंभार, दीपाली रोहित कुंभार, अपूर्वा संदीप कुंभार, शितल ओंकार कुंभार, साक्षी वसंतराव कुंभार, सिद्धांत कुंभार.**



**पाटील चाळ तरुण गणेश मंडळ, तुळजापूर रोड, बार्शी**



### रामलिंगेश्वर प्रशालेच्या नागराज पाटील यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**
सोलापुरातील गुरु विद्या प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा आदर्श शिक्षक पुरस्कार तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील सहशिक्षक नागराज पंडीत पाटील यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे प्रशालेत त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य सुधीर सोनकवडे, शिल्पा महिंद्रकर, सचिन गुजा, सिद्धेश्वर बिराजदार, अमर पाटील, सिद्धाराम पाटील, शांतप्पा बगले, रेवणय्या मठपती व सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अटल भूजल ग्रामसमृद्धीत माढ्याचा डंका

## नाशिक येथे पुरस्कार वितरण; भेंड, लोंढेवाडी, सोळंकरवाडी ग्रामपंचायतींचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० सप्टेंबर-**
राज्यस्तरीय अटल भूजल ग्रामसमृद्ध स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा सोमवारी नाशिक येथे मोठ्या उत्साहात पार पडला. अटल भूजल ग्रामसमृद्ध स्पर्धेत सन-२०२२-२३ या वर्षासाठी जिल्हास्तरीय गटात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार भेंड (ता. माढा), व्दितीय क्रमांक पुरस्कार लोंढेवाडी (ता. माढा), आणि तृतीय क्रमांक पुरस्कार सोळंकरवाडी (ता. माढा) या ग्रामपंचायतींना प्रदान करण्यात आला.




पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्ष पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील होते. नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांच्या पुरस्कार देण्यात आले. या सोहळ्यात जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार ५० लाख, व्दितीय पुरस्कार ३० लाख आणि तृतीय पुरस्कार २० लाख रूपये रोख रक्कम, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह स्वरूपात देण्यात आले. या सोहळ्यात खा. भास्कर भगरे, पाणीपुरवठा स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेचे आयुक्त पवनीत कौर, अतिरिक्त संचालक डॉ. विजय पाखमोडे, सहसंचालक डॉ. प्रविण कथने, नोडल अधिकारी श्रृषीराज गोस्की, वरिष्ठ भूवैज्ञानिक मुश्ताक शेख, तसेच जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, जिल्हा अंमलबजावणी भागीदार (मार्च) चे समन्वयक यासह भेंड, लोंढेवाडी व सोळंकरवाडी येथील सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक उपस्थित होते. याप्रसंगी अटल भूजल योजनेच्या मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. अटल भूजल योजना सध्या राज्यातील १३ जिल्ह्यामधील १,१३३ गावांमध्ये यशस्वीपणे राबविली जात आहे. महाराष्ट्र हे या योजनेच्या अमंलबजावणीमध्ये देशात पहिल्या क्रमांकावर आहे, अशी माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. येत्या काळात अटल भूजल योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रयत्न सुरू आहेत, असे पाटील यांनी सांगितले. नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी अधिकाधिक ग्राम पंचायतींनी या योजनेत सहभागी होऊन आपल्या गावातील पाण्याची पातळी वाढवावी, असे आवाहन केले. शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी थकीत अनुदान लवकरच देण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली.

### योजनेची उद्दिष्ट्ये

* मागणी (पाणी बचतीच्या उपाययोजना) व पुरवठा (जलसंधारण व भूजल पुनर्भरण) व्यवस्थापनाच्या सूत्राचा अवलंब करुन भूजलाच्या साठ्यात शाश्वतता आणणे.
* सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनाच्या मनरेगा, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन इत्यादी माध्यमातून होत असलेल्या गुंतवणुकीमध्ये एककेंद्राभिमुखता साधणे.
* भूजलाच्या शाश्वत विकासाकरिता राज्य, जिल्हा व ग्राम पातळीवर सक्षम संस्थात्मक व्यवस्था निर्माण करणे.

### केंद्राची योजना... २०१९ मध्ये सुरुवात

* भूजलाच्या अनियंत्रित उपशामुळे होत असलेली भूजल पातळीतील घसरण थांबविण्यासाठी केंद्र शासन व जागतिक बँकेतर्फे महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, हरियाणा, कर्नाटक, गुजरात आणि राजस्थान या सात राज्यात १०० टक्के केंद्र पुरस्कृत अटल भूजल योजना राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असून या बाबतची अधिकृत घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २५ डिसेंबर २०१९ रोजी केली आहे.
* ही योजना सात राज्यामध्ये राबविण्याकरीता केंद्र शासन व जागतिक बँकेद्वारे एकूण सहा हजार कोटी आर्थिक तरतूद करण्यात येणार असून त्यामध्ये तीन हजार कोटी केंद्र शासन व तीन हजार कोटी जागतिक बँक याप्रमाणे ५०:५० वाटा असणार आहे.
* या करीता महाराष्ट्र राज्याला एकूण ९२५.७७ कोटींची तरतूद उपलब्ध आहे.
* ही योजना पूर्णत: केंद्र पुरस्कृत असून राज्य शासनाचा प्रत्यक्ष वाटा निरंक आहे. मात्र मनुष्यबळ व प्रकल्प क्षेत्रातील गावांमध्ये अस्तित्वातील जलसंधारण व सूक्ष्म सिंचनाच्या योजनांची एककेंद्राभिमुखता याद्वारे राज्याचे योगदान असणार आहे.
* योजनेचा कालावधी सन २०२०-२१ ते २०२४-२५ एवढा असून १ एप्रिल २०२० पासून अंमलबजावणी सुरु करावयाची आहे
* ही योजना भूजल उपशाच्या दृष्टीने अतिशोषित, शोषित आणि अंशत: शोषित क्षेत्र असलेल्या क्षेत्रांमध्ये राबवायचा असून त्याकरीता राज्यातील अति शोषित, शोषित आणि अंशत शोषीत पाणलोट क्षेत्रातील १३ जिल्ह्यातील १,१३३ ग्राम पंचायती मधील १४४२ गावांची निवड केलेली आहे.

## मंद्रुप अंगणवाडीच्या पोषण आहारात अळ्या; निकृष्ट तांदळामुळे मुलांचे जीव धोक्यात



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १० सप्टेंबर-**
अंगणवाडी क्रमांक एकमधील शालेय पोषण आहारामध्ये आळ्या आढळून आल्याने चिमुकल्यांचे जीव धोक्यात आला आहे.

हलगर्जीपणाचा फटका लहान मुलांना बसत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे निकृष्ट तांदूळ पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. रबरी तांदूळ पुरवठा करण्यात आल्याची तक्रार केली होती. मात्र प्रशासनाने लक्ष न दिल्याने हा प्रकार घडला आहे. पालकांनी अंगणवाडी सेविका व मदतनीसांकडे तक्रार केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व हलगर्जीपणामुळे लहान मुलांना निकृष्ट अन्न देण्यात आल्याने पालकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

### प्रशासनाचा हलगर्जीपणा

मंद्रुपच्या अंगणवाडी क्रमांक एकमध्ये लहान मुलांना देण्यात येणाऱ्या तांदळामध्ये व अन्नामध्ये अळ्या आढळून आल्या आहेत. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे लहान मुलांच्या जीवाशी खेळण्याचा संतापजनक प्रकार आहे. वरिष्ठांनी ठेकेदारांवर कारवाई करावी.

**-सद्दाम शेख, पालक, मंद्रुप**

## अक्कलकोटमध्ये ४९ गावांत एक गाव, एक गणपती

### 303 सार्वजनिक गणेश मंडळांकडून श्रीची प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० सप्टेंबर-**
अक्कलकोट शहर व तालुक्यात भक्तिमय वातावरणात श्री गणेश उत्सवास प्रारंभ झाला असून ३०३ सार्वजनिक गणेश मंडळांनी श्रीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. अक्कलकोट दक्षिण आणि उत्तर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ४९ गावांत एक गाव, एक गणपती उपक्रम राबविण्यात आला आहे.

दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मैदर्गी, दुधनी यासह इतर गावात १४८ सार्वजनिक गणेश मंडळ आहेत. हद्दीत ७६ गावे असून ३२ ठिकाणी एक गाव, एक गणपती उपक्रम राबविण्यात आला आहे.उत्तर पोलीस ठाण्याच्या अक्कलकोट, शहरासह ५६ गावे असून १५५ ठिकाणी सार्वजनिक गणेश मंडळाने श्रीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. हद्दीत १७ गावात एक गाव, एक गणपती उपक्रम राबविण्यात आला आहे. श्री गणेश विसर्जनापर्यंत अनेक सार्वजनिक गणेश मंडळांनी विविध सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि महेश स्वामी, पीएसआय सिद्राम धायगोडे, सपोनि कांबळे यांच्यासह ३ अधिकारी, ६८ पोलीस कर्मचारी, ५५ होमगार्ड कडक बंदोबस्तासाठी कार्यरत आहेत. उत्तर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंदोबस्तासाठी ७ अधिकारी, ६५ पोलिस कर्मचारी, ६५ होमगार्ड, एक एसआरपी प्लाटून असे कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, सपोनि निलेश बागाव, पोलीस उपनिरीक्षक सुशीलकुमार पाखरे, पीएसआय पवार, पंडित चव्हाण, सिद्राम चव्हाण, रामचंद्र राठोड यांच्यासह मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



### २९० पोलिसांचा बंदोबस्त

पोलीस प्रशासनाकडून अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस विभागाने कडक बंदोबस्तासाठी अधिकारी, कर्मचारी असे मिळून २९० जणांचे कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## सिंहगड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे स्केटिंग स्पर्धेत यश

**पंढरपूर, दि. १० सप्टेंबर-**
जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत मंगळवेढा येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत सिंहगड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.


या स्पर्धेत ११ वर्ष वयोगटातील देवांश मर्दा इनलाईन चौथा, १४ वर्ष वयोगटतील स्वराली मुचलंबे इनलाईन व्दितीय, १७ वर्ष वयोगातील मुले इनलाईन प्रदुमन देशमुख प्रथम, सुधांशू भानवसे चौथा, १७ वर्षे वयोगट मुली स्कॉड साची कोरडे चौथा, १९ वर्ष वयोगट स्कॉड शार्दुल बाजारे द्वितीय, सार्थक माळी तृतीय, मुलीमध्ये जागृती कोळी प्रथम, १९ वर्षे वयोगट इनलाईन अन्वित चव्हाण चौथा मिळवून यश संपादन केले. विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. संस्थापक एम. एन. नवले, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे, प्राचार्या स्मिता नवले व मुख्याध्यापिका स्मिता नायर यांनी मुलांचे कौतुक केले.

## वळसंग हद्दीतील मंडळांचे 'एकीचे बळ'

### सपोनि अनिल सनगल्ले यांचा पुढाकार

### ३५ पैकी १२ गावांमध्ये एक गाव, एक गणपती

**तभा वृत्तसेवा । कल्लय्या स्वामी**
**वळसंग, दि. १० सप्टेंबर-**
गणेशोत्सवात सामाजिक उपक्रमांचा बोलबाला व्हावा, प्रबोधनाबरोबरच अनुचित प्रकाराच्या विरोधात जनजागृती व्हावी आणि उत्सवाला वैचारिक, एकीचे अधिष्ठान प्राप्त व्हावे, यासाठी वळसंग पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी पुढाकार घेतला. ३५ पैकी १२ गावांनी एक गाव, एक गणपतीचा उपक्रम राबवून उत्सवात एकीचे बळ दाखविले आहे.



चांगल्याचे पुरस्कार आणि वाईटाचे निर्दालन करण्याची भूमिका घेत स्वत: रस्त्यावर उतरुन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रयत्न करणारे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांनी गणशोत्सवापूर्वी वळसंगसह मोठ्या गावांमध्ये गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. एकीचे आवाहन केले. विघ्नहर्त्यांच्या उत्सवात विघ्न निर्माण होऊ नये यासाठी बैठकीतून प्रबोधन केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, गरजवंतांना मदतीचा हात, निराधारांना आधार, महिला सन्मान, कायदा साक्षरता, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन असे उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते.

सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, नो डीजे, नो ड्रीक्स, नो प्लेईंग कार्डस् मुव्हमेंटसाठी पुढाकार घेतला. यामुळे नेहमीच वादातीत असलेल्या वळसंग पोलिस ठाण्यात यंदा गणेशोत्सवात एकोपा निर्माण झाला आहे. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अक्कलकोट विभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सपोनि अनिल सनगल्ले यांनी पथक तैनात करुन जबाबदारी नेमून दिली. यामुळे हे शक्य झाले. यासाठी पोलीस उपनिरीक्षक तम्मा बिराजदार, पोलीस नाईक अंबादास दूधभाते, बीट अंमलदार रामदास मालचे, पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद मांढरे यांनी परिश्रम घेतले.



देशभक्ती, समाजप्रेम, दयाभाव निर्माण व्हावा, या हेतूने गणेशोत्सवाची सुरुवात झाली. आता प्रत्येक उत्सवात वेगवेगळे रंग भरण्यात येत असल्याने देशहित हरवून गेले आहे. यंदा वरिष्ठांच्या सूचनेनुसार प्रबोधन करण्यात आले. त्याला मंडळांनी चांगला प्रतिसाद दिला. उत्सव काळात सामाजिक भान जपले जात असून, मिरवणुकाही शांततेत पार पडतील.

**-अनिल सनगल्ले, प्रभारी अधिकारी, वळसंग पोलिस ठाणे**

### सहा हजार लोकसंख्येची धोत्री... अनेक मंडळांना लागली कात्री

दक्षिण सोलापूर तालुक्यातील पाच ते सहा हजार लोकसंख्या असलेल्या धोत्रीमध्ये आतापर्यंत अनेक मंडळांकडून गणेशाची प्रतिष्ठापना होत होती. पूजा, वर्गणी, मिरवणुका, जागरण, स्पर्धा, संघर्ष निर्माण होत होते. यंदा सपोनि सनगल्ले यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक मंडळांना कात्री लागली असून, एक गाव, एक गणपती उपक्रम राबवून गावाने एकी दाखविली आहे. यासाठी अध्यक्ष राहुल बिराजदार, प्रसाद दहिटणे, सोमनाथ हिरोळे, नागनाथ बिराजदार, गब्बर होनाजी, धुळप्पा चौगुले, पोलीस पाटील श्रीमंत बिराजदार, गुरुमूर्ती पाटील, सरपंच वैशाली पाटील, उपसरपंच सैपन शेख, लक्ष्मण बिराजदार, भीमशा पाटील, नंदकुमार यरगले, निंबण्णा चौगुले, नागप्पा बिराजदार यांनी पुढाकार घेतला.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## जिल्हा शल्य चिकित्सक यांची रुग्णालयास भेट



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१० सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील ग्रामीण रुग्णालयास प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नागनाथ धमधिकारी यांनी भेट देऊन पाहणी केली.

यावेळी प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.संगमेश्वर धोंगडे, डॉ.विजय विश्वकर्मा, रूग्ण कल्याण समितीचे सदस्य सुभाष कुलकर्णी, जुनेद मोमीन यांच्यासह रुग्णालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### गौरी आवाहनामुळे बाजारात गर्दी

**धाराशिव, दि.१० सप्टेंबर -**
मंगळवारी गौरीचे आव्हान असल्यामुळे वाशी येथे शिवाजीनगर बाजारपेठेमध्ये लक्ष्मीचे मुखवटे खरेदी करण्यासाठी गर्दी होती. तसेच स्टेशनरी दुकानात गौरी समोर आरास करण्यासाठी फुलांच्या माळा वगैरे शोभिवंत वस्तूची खरेदी मोठ्या प्रमाणात चालू होती. तसेच महालक्ष्मी उभे करण्यासाठी आडणी तसेच सजावटीचे साहित्य तसेच पूजेचे साहित्य खरेदी करण्यासाठी महिलांची रविवारी बाजाराचे दिवशी तसेच सोमवारी खूपच गर्दी होती. शहरातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात उलाढाल वाढल्यामुळे व्यापारी वर्गातून उत्साहाचे वातावरण निर्माण आल्याची दिसून येत आहे.

### उपद्रवी व्यक्तींवर प्रतिबंधक कारवाई करा : पोलिस अधिक्षक

**नळदुर्ग, दि.१० सप्टेंबर -**
गणेशोत्सव आणि ईद-ए- मिलाद या सण आणि उत्सवात शहरातील उपद्रवी व्यक्तींवर प्रतिबंधक कारवाई करण्याबरोबरच तडीपार सारखी कडक कारवाई करण्याचे आदेश धाराशिव जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी पोलिसांना दिले आहेत. आगामी काळात साजरे होणारे गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद या सणाच्या पार्श्वभुमीवर दि.९ सप्टेंबर रोजी सायंकाळी धाराशिव जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी नळदुर्ग शहराला भेट देऊन तेथील परीस्थितीची पाहणी केली. मार्चमध्ये जिल्हा पोलिस अधीक्षक संजय जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.निलेश देशमुख यांच्यासह पाच पोलिस अधिकारी, २० पोलिस अंमलदार,१ एसआरपीएफ प्लाटुन व ३५ होमगार्ड सहभागी झाले होते.



### चव्हाण यांना शिक्षक पुरस्कार

**जळकोट दि.१० सप्टेंबर -**
अलियाबाद येथील सहशिक्षक रमेश भोजूसिंग चव्हाण यांना स्वाभिमानी शिक्षक कर्मचारी महासंघ व मंत्रालय समन्वय समिती, मुंबईतर्फे शिक्षक दिनानिमित्त राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सहशिक्षक रमेश चव्हाण यांनी शैक्षणिक व विविध सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सोलापूर जिल्हा शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष मनीष काळजे, माध्यमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, सोलापूर सचिन जगताप, प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, सोलापूर कादर शेख तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष बापूसाहेब अडसूळ यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे ज्ञानदीप कलोपासक मंडळ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव चव्हाण, उपाध्यक्ष भीमराव मोरे, कोषाध्यक्ष मल्लिनाथ माळगे, सचिव ॲड.सयाजी शिंदे, सहसचिव वसंतराव रामदासी, सदस्य किरण पाटील, सर्व सदस्य व प्रशालेचे मुख्याध्यापक पुजारी सुनील, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### शाळेच्या धोरणाविषयी शासनाचे जाचक परिपत्रक रद्द करण्याची मागणी

**तुळजापूर दि.१० सप्टेंबर -**
शासनाच्या संच मान्यता व २० पटसंख्या असलेल्या शाळेच्या धोरणाविषयी जाचक शासन परिपत्रक रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाने मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याप्रसंगी शिक्षक संघाचे धनंजय मुळे, तालुकाध्यक्ष सचिन राऊत, सोमनाथ निटुरे, काशिनाथ सुरवसे, राहुल जाधव वैजनाथ कुलकर्णी, शिवाजी माने, विकास माळी, बालाजी पडवळ व आणखी बरेच शिक्षक बांधव उपस्थित होते.

## न्यायालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग तुळजाभवानी देवीच्या मंदिराशी साधर्म्य असणारा

### बांधकामासाठी निधी कमी पडू देणार नाही: आ.राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० सप्टेंबर -**
तुळजापूर येथील न्यायालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग तुळजाभवानी मंदिराशी साधर्म्य असलेले राहणार आहे. इमारतीच्या दर्शनी भागात दगडी बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे. तालुकस्तरीय न्यायालयाच्या सुधारित आराखड्याप्रमाणे राज्यात होणारी ही पहिलीच इमारत आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी कोणत्याही परिस्थितीत निधी कमी पडू देणार नाही, अशा शब्दांत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी ग्वाही दिली. तुळजापूर येथील न्यायालयासंदर्भात विधीज्ञ मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी आज आ. राणाजगजितसिंह पाटील यांची भेट घेतली.

आमदार पाटील यांनी इमारत बांधकामाची पाहणी करून आढावा घेतला. न्यायालयाचे जवळपास काम पूर्ण होत आले आहे. अत्यंत आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या या इमारतीचा दर्शनी भाग कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या मंदिराशी साधर्म्य असलेला साकारण्यात येणार आहे. न्यायालयाच्या नवीन इमारतीचा आराखडा तयार करण्यात आल्यानंतर राज्यातील हे पहिले बांधकाम असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले.

या इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करून या ठिकाणी न्यायालयीन कामकाज सुरू करण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे. या बांधकामासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, असा शब्दही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी तुळजापूर विधीज्ञ मंडळास दिला.

तुळजापूर येथील दिवाणी न्यायालयाची इमारत जुनी होती व कामकाजासाठी जागा अपुरी पडत होती. त्यामुळे हंगरगा (तुळ) येथे दोन हेक्टर जागेत न्यायालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सुरू आहे. या नवीन इमारतीमध्ये तळमजला व अधिक दोन मजले आहेत.

सर्व सोयी-सुविधांनी युक्त असलेल्या न्यायालयाच्या इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्पही असणार आहे. त्याचबरोबर पावसाच्या पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन करून जमिनी खाली तयार करण्यात आलेल्या टाकीत साठवणूक केली जाणार आहे. या पाण्याचा वापर न्यायालय परिसरातील उद्यान आणि वृक्षसंगोपनासाठी केला जाणार आहे. इमारत बांधकामास सुरुवात करतेवेळीच परिसरात सर्व बाजूंनी वड, पिंपळ, करंज, कदंब, बकुळ, बहावा, रुद्राक्ष, कडुलिंब, नारळ यासारखी भारतीय प्रजातीची जवळपास ३०० झाडे लावण्यात आली आहेत. विधिज्ञ मंडळाच्या सदस्यांनी देखील यामध्ये सातत्याने लक्ष दिले. पाठपुरावा केला आहे. इमारतीचे बांधकाम जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. यावेळी तुळजाभवानी मंदिर देवस्थानचे महंत श्री तुकोबा बुवा महाराज, नारायण नन्नवरे, विधीज्ञ मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी यांच्यासह सर्व सदस्य उपस्थित होते.

## उडीद, मुग धान्याला हमी भावाप्रमाणे व्यापाऱ्यांनी भाव द्यावा, परंडा भाजपाच्या वतीने मागणी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१० सप्टेंबर -**
परंडा तालुक्यातील शेतकऱ्यांचे उत्पादित केलेल्या उडीद, मुग, मका व इतर धान्य परंडा येथील व्यापाऱ्यांकडे आणले असता कोणताही व्यापारी शासनाचा हमी भाव देत नाही. उलट कमी दराने माल खरेदी करून शेतकऱ्यांना वेठीस धरून फसवणूक करत आहे.

याबाबतचे निवेदन परंडा तहसीलदार यांना देउन उडिद, मुग, मका व इतर धान्याला शासनाच्या हमी भावाने खरेदी करून शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवावी अशी मागणी केली.

यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, तालुकाध्यक्ष ॲड.गणेश खरसडे, शहर उपाध्यक्ष धनंजय काळे, मनोहर पवार, गौरव पाटील, परसराम कोळी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, अजित काकडे, साहेबराव पाडुळे, बाळासाहेब गिरी, कांतीलाल पाटील, सारंग घोगरे, गजानन तिवारी राहुल बनसोडे, बाळासाहेब वाघ तसेच इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाशी इंदापूर पारडी येथे किशोर किशोरी हितगुज मेळावे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० सप्टेंबर -**
वाशी तालुक्यातील इंदापूर पारडी जिल्हा परिषद शाळेत अजिंक्य प्राथमिक विद्यामंदिर वाशी वंचित विकास जाणीव संघटनेच्या वतीने किशोर किशोरी हितगुज मेळावे वंचित विकास जाणीव संघटनेच्या वतीने घेण्यात आले. यामध्ये किशोर किशोरीचे प्रश्न गैरसमज व्यक्तिमत्व विकास संवाद कौशल्य नेतृत्व कौशल्य गुणवत्ता वाढीविषयी मार्गदर्शन जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी घेतले.



खेळ-गाणे गोष्टी स्पर्धात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक माने बी.पी, शिंदे एम.बी, चौधरी ए.बी, कुंभार पी.एम, म्हेत्रे एस.पी मुख्याध्यापक मिलिंद करंडे, गवळी बी.एल, केळे एस.एल, चोरगे के.बी, महाकले जी.सी, काशीद डी.सी, मस्के वाय.बी, संस्थापक एस.एल पवार, मुख्याध्यापिका माने मनीषा यांनी परिश्रम घेतले. या हितगुज मेळाव्याला ७०० ते ८०० किशोर-किशोरी सहभागी झाले होते.

## परंडा येथे दिव्यांग तपासणी कॅम्प संपन्न

**परंडा, दि.१० सप्टेंबर -**
परंडा तालुक्यातील दिव्यांग बांधवांना दिव्यांग प्रमाणपत्र मिळावे. दिव्यांग प्रमाणपत्र पासून वंचित राहू नये यासाठी दिव्यांग उद्योग समूहाच्या पाठपुराव्यातून दिव्यांग तपासणीचे आयोजन जिल्हा शैल्य चिकित्सक अधिकारी धाराशिव, उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परांडा यांच्या संयुक्त विद्यमानाने ६ सप्टेंबर रोजी उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परांडा येथे दिव्यांग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग मनोरुग्न,अंध, अशा ४२ दिव्यांग व्यक्तीची तपासणी करण्यात आली. ही तपासणी करण्यासाठी अस्तिव्यंग तज्ञ डॉ. कवढे, मनोरुग्ण विभागाचे डॉ.शिंदे, अंध विभागाचे डॉ.महेश पाटील या तज्ञांच्या टीमने कामकाज पाहिले.



यावेळी दिव्यांग उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, प्रकाश काशीद, मुजीब काझी, फारुख शेख, शहर प्रमुख गोरख देशमाने, रावसाहेब खरसडे शिक्षण विभागातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी काम पाहणारे कर्मचारी, विशेष तज्ञ-आत्तार, जाधव विशेष शिक्षक-हाजगुडे, कवडे, बेडके, गोरे कर्मचारी व तालुक्यातील दिव्यांग बांधव उपस्थित होते.



## केशेगाव येथे स्वयंम शिक्षण प्रयोग कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१० सप्टेंबर -**
तुळजापुर तालुक्यांतील केशेगाव येथे सोमवार दि. ९ सप्टेंबर रोजी स्वंयम शिक्षण प्रयोग कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

जलसंधारण, पाणलोट व्यवस्थापन,व फळबाग लागवड यावर ग्रामपंचायत कार्यालय येथे गावचा नकाशा तयार करून, संस्थेचे वॉटर एक्सपर्टस अभिजित चव्हाण यांनी शासकीय योजनांचा गावकऱ्यांना व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला संस्थेचे लीडर मुमताज इब्राहिम नदाफ, ग्रा.पं सदस्य रतनबी नदाफ, उपसरपंच लक्ष्मण क्षिरसागर, ग्रा.पं.सदस्य महीबुब फकीर, रोजगार सेवक मल्लिनाथ पाटील, शिवानंद बिराजदार टेलर, रूकुमतोला नदाफ, रशीद नदाफ, प्रकाश साखरे, सच्चिदानंद हंद्राळे, चिदानंद स्वामी, नागनाथ पाटु, अनिल जळकोटे,अप्पाराव हान्नुरे, देविदास कांबळे, राम भदाडे, विश्वनाथ जळकोटे, गुलाब नदाफ, रतन पवार, अरूण साखरे, इब्राहिम नदाफ हे बहुसंख्य नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहरातील विकास कामांसाठी निधी कमी पडु देणार नाहीः आ.राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० सप्टेंबर -**
नळदुर्ग शहरातील विकास कामांसाठी निधी कमी पडु देणार नाही असे आमदार राणा जगजितसिंह यांनी नळदुर्ग येथील विविध विकास कामांचे उदघाटन व विविध गणेश मंडळाना भेटी दिल्यानंतर बोलतांना सांगितले.



दि.९ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग शहरातील विविध गणेश मंडळाना भेटी देऊन श्री गणेशाची आरती केली. प्रारभी नळदुर्ग शहरातील श्री शिवलिंगेश्वर हिरेमठास आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी भेट दिली. यावेळी मठाचे मठाधीपती श्री ष. ब्र.बसवराज शिवाचार्य महास्वामीजी यांच्याशी त्यांनी चर्चा केली. यावेळी महाराजांच्या हस्ते आ.राणाजगजितसिंह पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर भीमनगर येथील सभागृह तसेच अंगणवाडी बांधकामाच्या कामाचा शुभारंभ सेवानिवृत्त प्रा.शिवाजी बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर इंदिरानगर येथे बांधण्यात येणाऱ्या सभागृहाच्या कामाचा शुभारंभ आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर शहरातील जय हिंद तरुण गणेश मंडळं व्यासनगर, शिवनेरी तरुण गणेश मंडळं, इंदिरानगर येथील गणेश मंडळ, दुर्गानगर व वसंतनगर येथील गणेश मंडळाना भेट देऊन आ.राणाजगजितसिंह यांनी श्री गणेशाची आरती केली.

यावेळी बोलतांना आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले की, येणाऱ्या काळात नळदुर्ग शहराचा आणखी मोठ्याप्रमाणात विकास करण्यात येणार आहे. विकास कामासाठी निधी कमी पडु देणार नाही. शहरातील नागरीकांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असेही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

यावेळी त्यांच्यासोबत भाजपचे सुशांत भुमकर, नारायण नन्नवरे, माजी नगरसेवक नय्यर जागीरदार, दत्तात्रय दासकर, दत्तात्रय कोरे, निरंजन राठोड, नगरसेविका छमाबाई राठोड, शहर भाजपचे अध्यक्ष धीमाजी घुगे, माजी शहरअध्यक्ष पद्माकर घोडके, बबन चौधरी, कैलास चव्हाण, आनंद पवार,संजय विठ्ठल जाधव यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते व गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान

### जिल्हाधिकारी यांनी केले विभागनिहाय जबाबदाऱ्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० सप्टेंबर -**
धाराशिव दि.१० सप्टेंबर (जिमाका) राज्य सरकारने सर्व जिल्ह्यांमध्ये मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान सुरू केले आहे.याच अभियानाच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शनिवारी १४ सप्टेंबर रोजी परंडा शहरात येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरु आहे.या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी १० सप्टेंबर रोजी तहसील कार्यालय, परंडा येथील सभागृहात घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी व अन्य अधिकाऱ्यांनी कार्यक्रम स्थळ, हेलिपॅड आणि पार्किंग व्यवस्थेची पाहणी केली. बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.ओम्बासे यांनी विभाग प्रमुखांना कार्यक्रमाच्या विविध जबाबदाऱ्या सोपविल्या.



यावेळी बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा पोलिस अधिक्षक संजय जाधव, अतिरिक्त पोलिस अधिक्षक गौहर हसन, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्राजंल शिंदे,कार्यकारी अभियंता एन.व्ही.भंडे,उपविभागीय पोलिस अधिकारी गौरीप्रसाद हिरेमठ,पालकमंत्री यांचे प्रतिनिधी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान राज्यात राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत जिल्हास्तरावर महिला बचत गट संमेलन आयोजीत करुन महिलांना प्रेरित करण्याकरिता अभियांनातंर्गत विविध शासकीय योजना लोकाभिमुख करुन व त्याची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी विविध शासकीय योजनांचा लाभ महिलांपर्यत पोहचविणे,महिला बचत गट स्टॉल उभारणे,विविध सरकारी विभाग व महामंडळाच्या योजनांची माहिती स्टॉलच्या माध्यमातून या कार्यक्रमस्थळी लावण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कोटला मैदान, परंडा ता.परंडा जि.धाराशिव येथे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.त्यानुसार कार्यक्रमाच्या नियोजनाकरिता जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी बैठकीत मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमाच्या नियोजनाच्या अनुषंगाने विभागनिहाय अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या.राज्य सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केलेली आहे. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेतून आर्थिक लाभ पात्र महिलांच्या बँक खात्यात जमा करणे सुरू आहे. महिला सक्षमीकरणासह त्यांच्या सुरक्षेसाठीही प्राधान्य देण्यात येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेतील महिला लाभार्थी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील लाभार्थी, तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात उत्कृष्ट कार्य केलेल्या अंगणवाडी सेविकांचा प्रातिनिधीक स्वरूपात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अन्य मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात येणार आहे.


## TENDER NOTICE

**A) Supply, Installation, Commissioning & Testing of Seed Cleaning & Grading Unit (2 TPH) ( Semi Automatic)**
**B) Supply, Installation, Commissioning of Weight Bridge (50 MT)**
**C) Supply, Installation, Commissioning of Diesel Generator (100KVA)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Naitik Agro Producer Company Ltd.Tq. Washi, Dist. Dharashiv** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of Offline bids is **24/09/2024** up to **14.00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Naitik Agro Producer Company Ltd.Tq. Washi, Dist. Dharashiv**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





## आकर्षक मुखवट्यांची महिलांना भुरळ

गौराईंचे मंगळवारी आगमन झाले. विविध दागिणे, रेडिमेड साड्या खरेदी करण्याची लगबग बीड शहरातील बाजारपेठेत दिसून आली.
(छाया-श्रीकांत कुलकर्णी)

# परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार:उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




## प्रकल्पग्रस्तांना ५० %टक्के जागा नोकरीमध्ये मिळणार:पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**

प्रकल्प ग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये योग्य जागा मिळाव्या यासाठी राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केलल्या विनंतीला उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी होकार दिला असून यापुढे मंजुर आकृतीबंधाच्या ५०% जागा प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये मिळणार, असल्याचे आजच्या बैठकीत निर्णय झाला.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात परळी वैजनाथ येथील थर्मल पावरच्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याबाबत दूरदृश्य प्रणाली माध्यमातून बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. यावेळी परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न व मागण्या प्राधान्याने सोडवल्या जातील, असा शब्द उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिला आहे.मुंबईतील सह्याद्री शासकीय विश्रामगृहातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक तथा पर्यावरण व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार चंद्रशेखर बावनकुळे हे यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यासह प्रकल्पग्रस्त प्रतिनिधी निळकंठ चाटे, श्रीकांत फड, राज गडदे, सुधीर फड, आत्माराम फड, मुजा भांगे, प्रविण मुंडे, प्रमोद नागरगोजे उपस्थित होते.वीज निर्मिती प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात काही समस्या बाबत आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित करण्यात आली यावेळी श्री. मुंडे यांनी प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्यासाठी विविध मागण्या केल्या. यामध्ये प्रशिक्षण सेवेमध्ये ३ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांना विनाअट सामावून घेण्यात यावे. कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता यांच्या झालेल्या भरतीमध्ये महानिर्मितीचा एकही प्रकल्पग्रस्त घेतला गेलेला नाही, तरी त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन रिक्त जागेमध्ये प्राधान्य देऊन समावेश करावे, २०१० पासून बंद असलेले तंत्रज्ञ ४ हे पद सुरु करुन त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्यात यावे, ज्या प्रकल्पग्रस्तांचे वय ४५ वर्षे पूर्ण झाले आहे,

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या समारंभाची पूर्वतयारी बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**

मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाच्या समारंभाची पूर्वतयारी बैठक निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात पार पडली.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) शैलेश सुर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार चंद्रकांत शेळके, अविनाश सिंटे, नायब तहसीलदार माधव काळे आणि संबधित विभागाचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम ध्वजारोहणाच्या कार्यक्रमासंबधी सर्व संबधित विभागास कार्यक्रमाच्या पुर्वतयारीसाठी सूचना दिल्या तसेच दि. १६ सप्टेंबर व १७ सप्टेंबर रोजी रात्री कार्यक्रमास्थळी रोषनाई करण्यात यावी, अशा सूचनाही निवासी उपजिल्हाधिकारी यांनी यावेळी संबधित यंत्रणेस दिल्या.

## अंधारे मॅडम धरणं भरले, किमान चार दिवसाला पाणी सोडा-नवनाथ शिराळे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**

बीड शहरला पाणीपुरवठा करणारे बिंदुसरा धरण ओव्हरफ्लो झाले. तर माजलगाव बॅक वॉटर मध्ये पन्नास टक्के पेक्षा अधिक जलसाठा उपलब्ध आहे. गणपती, महालक्ष्मी सन चालू आहे. दसरा, दिवाळी तोंडावर असताना बीड करांना अजूनही पंधरा दिवसाला पिण्याचे पाणी मिळते. धरण उशाला आणि जलसाठा असूनही बीडकरांच्या घशाला कोरड कायम आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी प्रशासक व नगरपालिकेचे सीओ अंधारे मॅडम यांनी वेठीस धरू नये. तातडीने किमान चार दिवसाला पिण्याचे पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा. असे आवाहन भाजपाचे माजी नगरपरिषद सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

बीड शहरातील नागरिक रहिवासी नगरपालिकेचा कर, पाणी पट्टी, घर पट्टी इमाने इतबारे वर्षाची वर्षाला नगरपालिकेला भरणा करतात. लाखो रुपयाचा कर व्याजासह बीड शहरातील नागरिक नगरपरिषद कडे भरणा करतात. या पैशाचा सदुपयोग करून जनतेला पाणी दिले पाहिजे. एकीकडे रोख कर घेतात परंतु त्या मोबदल्यात जबाबदारी असूनही पाणी मिळत नाही. अनेक कारणे सांगून नागरिकांचे तोंड बंद करतात. ही कारणे ऐकून नागरिकांचे कान बधीर झाले आहेत. त्यांच्या सहनशिलतेचा अंत न पाहता जनतेच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी. असे आवाहन भाजपा नेते तथा माजी न.प. सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.



# गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा असल्याने यंत्रणेने सज्ज राहावे: जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**

गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा असल्याने यंत्रणेने सज्ज राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिले.

जिल्हाधिकारी यांनी सोमवारी सायंकाळी प्रगती सभागृहात दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून गोदावरी नदीकाठच्या गांवाना सतर्कतेच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तसेच दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

जायकवाडी प्रकल्प, नाथसागर जलाशय, पैठण येथुन गोदावरी नदीपात्रात सांडव्याद्वारे विसर्ग सुरू करण्यात आल्याने नदी काठच्या गावात आवश्यक उपाययोजना करण्यासाठीच्या सुचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. यातंर्गत जायकवाडी प्रकल्प येथुन गोदावरी नदीपात्रात विसर्ग सुरू केल्यामुळे पिण्याचे स्त्रोत दुषीत झाल्यास पाणी पुरवठ्याचे शुद्धीकरण करणे, गरज पडल्यास टैंकर लावणे बाबत गटविकास अधिकारी, तहसीलदार यांनी तात्काळ उपाययोजना कराव्यात, तसेच तालुका आरोग्य अधिकारी, ग्रामिण रुग्णालय यांच्या सोबत संपर्क ठेवून कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव वाढणार नाही याकडे लक्ष देण्यात यावे. तसेच या कालावधीत नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी पोहोच होईल याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देशित केले.

गोदावरी नदी किनारी असणाऱ्या लोकवस्तींना सावधगिरीच्या सुचना गावांमध्ये दवंडी देऊन व ईतर माध्यमातून देण्याचे ही निर्देशित केले.अत्तिवृष्टीमध्ये सापांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने सर्पदंश, डेंग्यूची लागण तसेच पावसाळ्यात उद्भवणाऱ्या रोगांकरीता इंजेक्शन, औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य येथे उपलब्ध राहील याची जिल्हा शल्यचिकित्सक, बीड व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दक्षात घेण्याच्या सूचना केल्या .

नदीकाठी पाळीव जनावरे येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. बऱ्याचदा पाण्याचा प्रवाह जास्त असतो प्रवाहामध्ये जनावरांची सांगाडे वाहत येतात, त्यांची व्यवस्था करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. जायकवाडी प्रकल्पातून एक लाख क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात आला तर खबरदारीसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी गावामध्ये अन्नधान्याची आगाऊ व्यवस्था करावी.मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी गेवराई व माजलगांव या तालुक्यांसाठी दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करून बाधित होणाऱ्या शेतक-यांबाबत त्वरीत कार्यवाही करावी, अशा महत्वाच्या सूचना यंत्रणेला जिल्हाधिकारी यांनी बैठकीत केल्या.

## कृषी मंत्री धनंजय मुंडेंच्या पिक विमा कंपनीस कडक सुचना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**

मागील काही दिवसात झालेल्या सततच्या पावसाच्या पाण्यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून तातडीने त्याचे सॅम्पल सर्व्हे विमा कंपनी व कृषी विभागाने संयुक्तरित्या ८ दिवसात पूर्ण करुन त्यापुढील १५ दिवसात शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा अग्रीम पिक विमा मिळावा, असे निर्देश कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याबैठकीस आमदार बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, ऍड.राजेश्वर चव्हाण , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा कृषी अधिक्षक बाबासाहेब जेजुरकर, आत्माचे प्रक्लप संचालक सुभाष साळवे यांच्यासह विमा कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## आठ दिवसात केजच्या महामार्गावरील पथदिवे सुरू करा-केविसंस

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१० सप्टेंबर**

केज शहरातील महामार्गावरील पथदिवे गेली चार वर्षांपासून रस्ता बांधकाम कारणाखाली बंद आहेत. यामुळे रात्री उशिरा व सकाळी लवकर या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशी व स्थानिक नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. अपघात व इतर प्रकार ही घडत आहेत. या महामार्गावरील पथदिवे तात्काळ सुरू करा या मागणीसाठी समिती संबंधित यंत्रणेकडे सतत पाठपुरावा करत आहे. अगोदर रस्ता काम करणाऱ्या कंपण्या व आता केज नगरपंचायत या कामात विलंब करत आहे. गेली दोन वर्षांपासून वेगवेगळ्या तारखा व आश्वासने दिली गेली आहेत. सध्या गणेशोत्सव सुरु आहे. संदल चे आयोजनही होत आहे. तरी केज नगरपंचायत ने केज शहरातील बीड-अंबेजोगाई महामार्ग, धारूर रोड महामार्ग व कळंब रोड चे बंद असणारे पथदिवे येत्या आठ दिवसात सुरु करावेत, तसेच शहरातील इतर रस्त्यांची अत्यंत संथ गतीने सुरू असलेली कामे तात्काळ पूर्ण करावीत व लोकनेते गोपीनाथराव मुंडे नाट्यगृहाचे काम उत्कृष्ट दर्जासह वेळेत पूर्ण करावेत नसता येत्या १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ पासून वरील मागण्यासाठी केज नगरपंचायत समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू करणार असल्याचे समितीच्या वतीने समन्वयक हनुमंत भोसले यांनी कळविले आहे.



याबाबत केज विकास संघर्ष समितीने वरील सर्व मागण्यासाठी सतत पाठपुरावा केला आहे. वास्तविक पाहता हा विषय आंदोलने किंवा निवेदनाचा नाही. नगरपंचायत प्रशासनाने नागरिकांच्या अत्यावश्यक व मुलभूत सुविधांचा विचार करून तात्काळ या समस्या स्वतः सोडवायला हव्या आहेत. मात्र या अत्यावश्यक व गंभीर समस्येकडे केज नगरपंचायत व तालुका प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याची जनतेची भावना बनली आहे. म्हणून नागरिकांना शेवटचा पर्याय म्हणून आंदोलनासाठी रस्त्यावर यावे लागत आहे.

यासाठीच येत्या आठ दिवसात वरील समस्या नगरपंचायत व तालुका प्रशासनाने न सोडवल्यास येत्या १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता समिती बेमुदत आमरण उपोषण सुरू करत आहे.

निवेदनावर हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, संपत वाघमारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## आ.क्षीरसागरांनी स्वतः उभे राहून शहरात स्वच्छता करवून घेतली कंत्राटदाराचे बिल आणि कर्मचाऱ्यांचे वेतन रखडल्याने थांबले होते काम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**

बीड शहरात मागील काही दिवसांपासून स्वच्छतेचा आणि कचर्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत होता. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावरून यामागील कारण शोधून त्यावर तोडगा काढला तसेच सोमवारी (दि.९) रोजी स्वतः रस्त्यावर उभे राहून शहरात स्वच्छता करवून घेतली. यावेळी, येत्या आठ दिवसांत शहरातील स्वच्छता मोहीम पूर्ववत होईल व येत्या दोन ते दिवसांपासून शहरांमध्ये घंटागाडी नियमितपणे कार्यरत होणार असल्याची माहिती आ.क्षीरसागर यांनी दिली.




सध्या गणेशोत्सव तसेच विविध सण-उत्सवांचा काळ आहे. परंतु यातच बीड शहरात गेल्या अनेक दिवसांपासून स्वच्छता होत नव्हती. तसेच कचरा उचलला जात नव्हता. त्यामुळे शहरात स्वच्छतेचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत होता. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी यामागील कारण जाणून घेतले. दरम्यान, नगरपरिषदेच्या माध्यमातून ज्या कंत्राटदाराला स्वच्छतेचे काम देण्यात आले होते. त्या कंत्राटदाराचे बिल मागील सात महिन्यांपासून थकले होते. परिणामी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले होते. त्यामुळे बीड शहरात स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला होता. यावर आ.क्षीरसागर यांनी शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निकाली लागावा यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून नगरपरिषद व कंत्राटदाराची संयुक्त बैठक घडवून आणत तोडगा काढला. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकाराने बीड शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागला आहे. सोमवारी (दि.९) रोजी आ.क्षीरसागर यांनी स्वतः उभे राहून स्वच्छता करवून घेतली. तसेच पुढील आठ दिवसांमध्ये शहरात स्वच्छतेची मोहीम पूर्ववत झालेली असेल आणि येत्या दोन-तीन दिवसांपासून शहरात नियमित घंटागाडी कार्यरत होतील असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

## वक्रतुंड गणेश मंडळाचे रक्तदान शिबीर १८ रक्तदात्यांनी रक्त दिले

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१० सप्टेंबर**

वक्रतुंड गणेश मंडळाचे १६ वे रक्तदान शिबीर सम्पन्न झाले यावेळी केज उपजिल्हा रुग्णालय ची टीम उपस्थित होती

वक्रतुंड गणेश मंडळ हे मागील १५ वर्षे सामाजिक आध्यत्मिक वैज्ञानिक परंपरा जपत आलेली आहे. हे वक्रतुंड गणेश मंडळाचे १६ वे वर्ष आहे. याही वर्षी आपली परंपरा जपून तुलसी रामायण कथा चालू आहे दररोज दोन ते पाच रामकथा सोबत इतरही कार्यक्रम चालू असतात याचाच भाग म्हणून दि १० मंगळवार रोजी सकाळी १० ते १ रक्तदान शिबीर घेण्यात आले यावेळी केज उपजिल्हा रुग्णालयाचे नागरगोजे श्रीकिशन यांची रक्त संकलन टीम उपस्थित होती. यावेळी १८ रक्तदात्यांनी रक्तदान केले तर पहिल्यांदा रक्तदान करणारे पाच नवीन तरुणांनी रक्तदान केले धनंजय कुलकर्णी , अभिजित अंधारे , शुभम अंधारे , अथर्व कुलकर्णी , वैभव काळदाते , सागर चाळक, मस्के हेमंत , नवनाथ जाधव , शिवम बडे , शंकर कसबे , संजय कोरडे , सुमित पन्नामावर , प्रसाद वैरागे , सुमित राऊत , राहुल एखांडे, काशिनाथ गोरे , सोहम राऊत , सचिन कवळे या रक्तदात्यानी रक्तदान केले. पहिल्यांदा रक्तदान करणारे अथर्व कुलकर्णी , वैभव काळदाते, सोहम राऊत , सुमित राऊत काशिनाथ गोरे यांनी प्रथमच रक्तदान केले. यावेळी रक्त संकलन साठी आलेली टीम डॉ ओंकार भालेराव , डॉ तन्मयी वैद्य , डॉ रिया बागडे , संतोष गायकवाड , नितीन सोळंके , सतीश गायकवाड व श्रीकीशन नागरगोजे उपस्थित होते.वक्रतुंड गणेश मंडळाच्या वतीने सर्व टीमचे आभार मानले.



CMYK

लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

# बोळेगाव येथे बेकायदेशीर बांधकाम विरोधात निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी, दि. १० सप्टेंबर-**

तालुक्यातील बोळेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम बेकायदेशीर होत असल्याबाबतचे तक्रार बोळेगाव येथील समस्त ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी जिल्हा परिषद लातूर व गटविकास अधिकारी पंचायत समिती देवणी यांच्याकडे देण्यात आले आहे.

कारण सध्या कार्यरत असलेली ग्रामपंचायत कार्यालय जुनी झाल्यामुळे नवीन इमारतीच्या बांधकामास मंजुरी मिळाली आहे. परंतु ग्रामसेवक व ग्रामपंचायत सरपंच व सदस्य हे मनमानी कारभार करून ग्रामपंचायतीच्या मूळ ठिकाणी बांधकाम न करता ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोळेगावच्या मालकी व ताब्यातील जागेत अरेरावी व पदाचा गैरवापर करून ग्रामपंचायत नमुना नंबर ८ अ ला शाळेच्या जागेची ५०÷१००चौरस फूट अशी ग्रामपंचायतीच्या जागेची नोंद ही कोणत्याही कायदेशीर आधाराशिवाय केलेली आहे. जे की चुकीचे व बेकायदेशीर आहे त्यामुळे भविष्यात सदर शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मूलभूत व घटनात्मक अधिकारावर गदा येणार आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलमाचा भंग होऊन शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. निवेदनावर ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

> बांधकाम विरोधात चौकशी चालू आहे चौकशी होईपर्यंत मी काहीही बोलू शकत नाही.
> **-एम.बी. अचोले ग्रामसेवक, बोळेगाव.**



## संक्षिप्त वृत्त



### शास्त्री विद्यालयात विद्यार्थ्यांनी साकारले पर्यावरण पूरक गणेशमूर्ती

**उदगीर, दि. १० सप्टेंबर-**

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात आनंददायी शनिवार दप्तराविना शाळा या उपक्रमांतर्गत चित्रकला विभागाच्यावतीने शाडू मातीपासून पर्यावरणपूरक (इको फ्रेंडली) गणेश मूर्ती बनविण्याची तसेच शाडू मातीपासून बैल निर्मितीची कार्यशाळा घेण्यात आली.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी विविध पर्यावरण पूरक गणराय साकारले.तसेच पोळासणाचे औचित्य साधून बैलही शाडू माती पासून बनविण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला .पर्यावरणाचे रक्षण करण्याचे मूल्य कृतीतून शिकवण्यासाठी व मातीपासून नवनिर्मिती साकारणे यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यालयातील इयत्ता ५ वी ते १० वी वर्गातील निवडक ५७ विद्यार्थी सहभागी झाले होते.कार्यशाळेत कलाशिक्षक गुरुदत्त महामुनी व सहशिक्षक संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना मूर्ती बनविण्यासाठी मार्गदर्शन केले. या उपक्रमशील कार्यशाळेसाठी मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुणराव पत्की,मा. पर्यवेक्षक कृष्णा मारावार,किरण नेमट व माधव मठवाले यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या कलाकृतींचे शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.




### डॉ. स्मिता नागोरी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**उदगीर, दि. १० सप्टेंबर-**

प्राध्यापकांच्या आयुष्यात सेवापूर्ती सोहळा यावा. पण असा सेवापूर्ती सोहळ आपल्या वाट्याला येण्यासाठी आपल्या अध्यापनाच्या व्यवसायाला आपण न्याय दिला पाहिजे. आपल्या अध्यापनाच्या व्यवसायावरती आपली कमालीची निष्ठा ठेवून असंख्य विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविले पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारणी सदस्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री बसवराज पाटील नागराळकर यांनी केले. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या प्रमुख प्रोफेसर स्मिता नागोरी-लखोटिया यांचा महाविद्यालयातील आजी व माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या सेवापूर्ती सोहळ्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. मंचावर सत्कारमूर्ती प्रोफेसर स्मिता नागोरी-लखोटिया, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्री रामचंद्र तिरुके, सहसचिव, अडवोकेट एस टी पाटील चिगळीकर, डॉ. रामाप्रसाद लखोटिया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, वेत्सा संतोषकुमार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सत्कारमूर्ती प्रोफेसर स्मिता नागोरी- लखोटिया यांचा आजी व माजी विद्यार्थ्यांतर्फे शाल व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वतीने ही सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सहसचिव ॲड. एस.टी. पाटील चिगळीकर, डॉ. रामाप्रसाद लखोटिया, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. संजय सूर्यवंशी, प्रा शिवनंदा रोडगे, प्रा. डॉ. पद्मजा मंठा- जोशी, प्रा. लांडगे, माजी विद्यार्थी प्रा बब्रुवान कोरे, डॉ. विष्णू पाटील, प्रा कृष्णा पळनाटे, डॉ. सचिन घुगे, प्रा नीतीन पोटलाशेरू, प्रा. उल्हास सोनकांबळे, ॲड. अजिंक्य रेड्डी इत्यादींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य सचिन पाटील यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रा मनोहर भालके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समितीतील सर्व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

### दूध भुकटी प्रकल्प; भंगार विक्रीची प्रक्रिया थांबवण्याची मागणी

**उदगीर, दि. १० सप्टेंबर-**

येथील शासकीय दूध योजनेच्या दूध भुकटी प्रकल्पाच्या भंगार विक्रीसाठी शासनाने प्रक्रिया सुरू केली आहे .जोपर्यंत या ठिकाणी नवीन प्रकल्प मंजूर होत, तोपर्यंत इथले भंगार विकू नये अशी आग्रहाची मागणी असलेले निवेदन सोमवारी शासकीय दूध योजना पुनर्जीवन समितीने उपविभागीय अधिकारी उदगीर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. त्या निवेदनात नमूद केली आहे, उदगीर येथील शासकीय दूध योजनेच्या दूध भुकटी प्रकल्पाचे भंगार विकण्याची शासनाने प्रक्रिया सुरू केली आहे. शासकीय दूध योजना पुनर्जीवन समिती उदगीरच्या माध्यमातून इथल्या दूध भुकटी प्रकल्पाला पुनर्जीवित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तत्कालीन केंद्रीय दुग्ध मंत्री पुरुषोत्तम रूपाला उदगीरला आल्यानंतर त्यांनी सदरील प्रकल्प पुनर्जीवित करण्याचे आश्वासन दिले होते. या संबंधात केंद्र शासनाच्या स्तरावर हालचाली सुरू आहेत. त्यामुळे जोपर्यंत या ठिकाणी नवीन प्रकल्प मंजूर होत नाही, तोपर्यंत या ठिकाणचे भंगार विकू नये ही समितीची आग्रही भूमिका आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ दुध भुकटी प्रकल्पाचे भंगार विकण्याची प्रक्रिया थांबवावी अन्यथा समिती तीव्र आंदोलन करेल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर समितीचे निमंत्रक आशिष पाटील, प्रा. एस. एस. पाटील अहमद, चंद्रकांत टेंगेटोल आदींच्या सह्या आहेत.

# १८ सप्टेंबरला ओबीसी आरक्षण जनजागृती मेळावा

**ओबीसी नेते लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांची उपस्थिती**



**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. १० सप्टेंबर-**

चाकूर अहमदपूर मतदार संघातील ओबीसी समाजाचा दि.१८ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता ओबीसी आरक्षण जनजागृती महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा अहमदपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात घेण्यात येणार असून चाकूर अहमदपूर मतदार संघातील सर्व पक्षांतील ओबीसी समाजाचे कार्यकर्ते, समाज बांधव एकत्र येऊन हा मेळावा घेण्यात येणार असल्याची माहिती ॲड. माधवराव कोळगावे यांनी पत्रकार परिषदेत घेऊन दिली.

दि.१० सप्टेंबर रोजी लातूर रोड येथे ओबीसी समाजातील सर्व समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत अहमदपूर येथे होणाऱ्या ओबीसी आरक्षण जनजागृती मेळाव्याचे सुक्ष्म नियोजन करण्यात आले यावेळी वेगवेगळ्या गावातील समाज बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन स्वखर्चाने या मेळाव्यास स्वतः येणार व इतरही ओबीसींच्या नागरीकांना या मेळाव्याला घेऊन येणार असल्याचे आश्वासन दिले. त्यानंतर ओबीसी समाजाच्या वतीने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी आंदोलन केले होते.त्यांनी केलेल्या आंदोलनाच्या लढ्याला पाठींबा देण्यासाठी अहमदपूर येथे हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.या मेळाव्यात ओबीसी समाज एकत्र करून ओबीसी समाजाच्या शैक्षणिक, राजकीय व ओबीसींच्या संघटनासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे माधवराव कोळगावे यांनी सांगितले.अहमदपूर येथे होणाऱ्या ओबीसी समाजाच्या मेळाव्याचे सुक्ष्म नियोजन करण्यात आले असून ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद नुसार या मेळाव्याला जास्तीत जास्त ओबीसी बांधव घेऊन येण्याची जबाबदारी ओबीसी समाजातील समाज बांधवांनी घेतली असून अहमदपूर येथे होणाऱ्या ओबीसी मेळाव्याला चाकूर अहमदपूर मतदार संघातील सरासरी २० हजार ओबीसी समाज उपस्थित राहतील असे नियोजन करण्यात आले असल्याचे माधवराव कोळगावे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.या मेळाव्यास चाकूर तालुक्यातील आठ ते दहा हजार ओबीसी समाज येतील असा विश्वास बैठकीत समाज बांधवांनी व्यक्त केला आहे.यावेळी ॲड. माधवराव कोळगावे,डिसीसी बँकेचे संचालक एन.आर.पाटील, सुरेश हाके, गंगाधर केराळे, सुरेश मुंडे, माधव भिंगोले, मधुकर मुंडे,राम खंदाडे, अशोक चिंते, नामदेव मांडूरके,विकास सुगावकर,अशोक शेळके आदी उपस्थित होते.

> अहमदपूर येथे होणाऱ्या ओबीसी मेळाव्यास लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे उपस्थित राहणार असून ओबीसींचे शैक्षणिक, राजकीय, सामाजिक प्रश्नावर हा मेळावा होणार आहे.या मेळाव्यानंतर अहमदपूर मतदार संघातील विधानसभेचे चित्र बदलणार असल्याचे जनतेतून बोलले जात आहे.

# ५ दिवसात १,६४० मेट्रिक टन कचरा उचलला

**मनपाचा पुढाकार**

**नवीन एजन्सी नेमण्याची प्रक्रिया सुरू**




**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १० सप्टेंबर-**

शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी नेमलेल्या जन-आधार सेवाभावी संस्थेचे कंत्राट संपले असून महानगरपालिकेने शहरातील कचरा उचलण्यासाठी पुढाकार घेतला आहे.मागील ५ दिवसात मनपाच्या वतीने १६४० मेट्रिक टन कचरा उचलण्यात आला असून आगामी ८ दिवसात उर्वरित कचरा उचलण्याची ग्वाही मनपाच्या वतीने देण्यात आली आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर घनकचरा व्यवस्थापनासाठी नवी एजन्सी नेमण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे.

जन-आधार सेवाभावी संस्थेला शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचे कंत्राट देण्यात आलेले होते.दि. ३१ ऑगस्ट रोजी हे कंत्राट संपुष्टात आले.त्यामुळे १ सप्टेंबर पासून महानगरपालिकेच्या वतीने शहरात साचलेला कचरा उचलण्याची यंत्रणा राबविण्यात येत आहे. शहराच्या विविध भागातील कचऱ्याचे ढिगारे उचलण्याचे काम सुरू आहे.यासाठी ४ जेसीबी,९ हायवा व १२० घंटागाड्यांचा वापर सुरू आहे.५ सप्टेंबर पासून आजपर्यंत एकूण १६४० मेट्रिक टन कचरा उचलण्यात आला आहे. उर्वरित कचरा उचलण्याची कार्यवाही पुढील ८ दिवसात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मनपाच्या वतीने कळविण्यात आले आहे. नवीन कंत्राटदार नेमून घनकचरा व्यवस्थापनाचे काम सुरळित केले जाणार आहे.शहरातील प्रत्येक घरी घंटागाडी जाईल यासाठी आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या मार्गदर्शनात कृती आराखडा व रूटमॅप तयार करून ओला व सुका कचरा संकलन करण्याचे काम मनपाच्या वतीने हाती घेण्यात येत आहे.त्यामुळे शहर लवकरच कचरामुक्त होणार आहे अशी माहिती अतिरिक्त आयुक्त शुभम क्यातमवर यांनी दिली आहे.

# एस.टी. आगारांमध्ये प्रवासी राजा दिनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १० सप्टेंबर-**

राज्य परिवहन विभागाच्या प्रत्येक आगारात १५ जुलैपासून प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन राज्य परिवहन विभागाचे लातूर विभाग नियंत्रक हे प्रवासी राजा दिन (सकाळी १० ते दुपारी २ ) व कामगार पालक दिन (दुपारी ३ ते ५ ) या वेळेत साजरा करण्यासाठी अहमदपूर येथे दिनांक १३ सप्टेंबर रोजी, उदगीर येथे दिनांक २० सप्टेंबर रोजी, लातूर येथे दिनांक २३ सप्टेंबर रोजी, निलंगा येथे दिनांक २७ सप्टेंबर रोजी, औसा येथे दिनांक ३० सप्टेंबर रोजी उपस्थित राहतील.

# सोनकवडे विद्यालयात सहकार महर्षी देशमुख यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी, दि. १० सप्टेंबर-**

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न करणारे सहकार महर्षी आदरणीय दिलीपराव देशमुख यांना डेक्कन शुगर टेकनॉलॉजिस्ट अशोशिएन ऑफ इंडियाचा सन २०२४ चा राज्यस्तरीय साखर उद्योग गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार देवणी तालुक्यातील अनुसयादेवी सोनकवडे विद्यालय वलांडी येथे पार पडला.

नागरी सत्काराला उत्तर देताना दिलीपराव देशमुख म्हणाले की, शासनाच्या वेळोवेळी बदलत्या धोरणामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीचा वाढीव भाव देण्यासाठी साखर कारखानदारांना मोठी कसरत करावी लागली लागत आहे, तरीही मांजरा परिवाराकडून दर हंगामास २०० रुपये वाढीव भाव देण्यात येत आहे. आणि जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांना ५ लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज मिळणार असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मल्लिकार्जुन मानकरी हे होते. प्रमुख पाहुणे खासदार डॉ. शिवाजी काळगे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस बस्वराज पाटील नागराळकर, माजी आमदार त्र्यंबक नाना भिसे आणि प्रमुख उपस्थिती धर्मा सोनकवडे, अशोकराव पाटील निलंगेकर, अभय साळुंके, दिलीप पाटील नागराळकर, लक्ष्मण मोरे, देवणी तालुकाध्यक्ष अजित बेळकोने, निलंगा तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष आबासाहेब पाटील, तसेच काँग्रेस सह महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख नेते, तालुका प्रमुख उपस्थित होते.अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय काँग्रेसच्या डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांम्ब्रे व निलंगा विधानसभा मतदार संघ काँग्रेस कमिटी महाविकास आघाडी यांच्या वतीने करण्यात आले होते.




> **देशमुख यांनी निलंगा मतदारसंघांचे नेतृत्व करावे : पाटील-नागराळकर**
> आगामी विधानसभा निवडणूकीसाठी निलंगा मतदार संघात इच्छुक असलेल्या अशोकराव पाटील, अभय साळुंके, अरविंद भातंबरे, अजित माने या उमेदवारासमोरच निलंगा मतदार संघांचे नेतृत्व दिलीपराव देशमुख यांनी करावे अशी विनंती केली मात्र दिलीपरावाणी त्याला नकार देत आपण कोणतीच निवडणूक लढवाणार नाही असे सूचक विधान केले.

# शिरूर अनंतपाळ तालुक्यातील ३७ गावात एक गाव, एक गणपती

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. १० सप्टेंबर-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यात प्रतिवर्षाप्रमाणेच यंदाही शेकडो बाप्पांचे आगमन होऊन तालुक्यातील एकूण ५३ गावातून १०६ गणेश मंडळाची वाजत गाजत ढोल ताशांच्या गजरात प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे.



तालुक्यात गेल्या वर्षी जेमतेम पाऊस झाल्याने गणेश उत्सवावर दुष्काळाची दाट छाया होती. पण यंदा मोठ्याप्रमाणात पाऊस पाणी चांगल्या प्रमाणात झाल्याने यावर्षीच्या गणेश उत्सवात मोठ्या प्रमाणात नागरिकांचा समावेश झाल्याने गणेशोत्सव उत्साहात सर्वत्र साजरा करण्यात आला. शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एकूण ५३ गावातून १०६ गणेश मंडळाची स्थापना करण्यात आली. यापैकी ३७ गावात एक गाव एक गणपती बसवण्यात पोलीस प्रशासनाला यश आलेले आहे. तर या १०६ गणेश मंडळापैकी शहरी भागात २१ गणेश मंडळाची तर ग्रामीण भागात ८५ गणेश मंडळाची स्थापना करण्यात आल्याची माहिती शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वाखालील विभागाचे प्रमुख पोलीस हेड कॉन्स्टेबल येडले-पाटील यांनी सांगितले.

# जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम अभिमानास्पद : पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १० सप्टेंबर-**

महाराष्ट्राचे विधीमंडळ देशाला दिशा देणारे विधीमंडळ आहे आणि या विधीमंडळात जनतेचे प्रश्न मांडून सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे काम हे लोकप्रतिनिधीच्या दुष्टीने अत्यंत महत्त्वाचे काम आहे राज्याच्या विधीमंडळात बोलणे म्हणजे बारा कोटीं लोकांना न्याय मिळवून देणे असून आमदार अभिमन्यू पवार यांनी आपल्या पहिल्या पंचवार्षिक काळात जनतेचे अनेक प्रश्न विधीमंडळात मांडून ते सोडविण्याचे काम केले असून याची परिणीती म्हणून त्यांना महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूजी यांच्या हस्ते महाराष्ट्र विधानसभेतील 'उत्कृष्ट भाषण' पुरस्काराने सन्मानित केले असून ही बाब मतदारसंघातील जनतेसाठी अभिमानास्पद असल्याचे गौरवोद्गार माजीमंत्री बसवराज पाटील यांनी काढले आहेत.

कासारसिरशी मंडळाच्यावतीने कासारसिरसी येथे कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांची मुख्यमंत्री पर्यावरण आणि शाश्वत विकास टास्क फोर्स च्या कार्यकारी अध्यक्ष निवड झाल्याबद्दल आणि आमदार अभिमन्यू पवार यांना विधानसभेतील उत्कृष्ट भाषण पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल या दोन्ही नेत्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात माजीमंत्री बसवराज पाटील बोलत होते.

यावेळी मंचावर राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार अभिमन्यू पवार, कासारसिरसी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वाकडे, जिल्हा उपाध्यक्ष नितीन पाटील, मंडळाध्यक्षा कविता गोरे, शहराध्यक्ष मयुर गब्बुरे, जिल्हा सरचिटणीस कल्पना ढविले, सभापती चंद्रशेखर सोनवणे, प्रकाश आष्टे, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, शेषेराव मोहिते, बाजार समितीचे संचालक युवराज बिराजदार, गोविंद भोसले, प्रकाश काकडे, संजय कुलकर्णी, जिलानी बागवान, ज्योती शिंदे, ज्योती कलशेट्टी, ओम बिराजदार, बळवंत पाटील, धनराज होळकुंदे, गोरख होळकुंदे, सोनाली हाडुळे, कल्पना गायकवाड, वामन मुळे उपस्थित होते.

> **मला जनता पुन्हा आशिर्वाद देईल : आ. अभिमन्यू पवार**
> यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की विकासापासून वंचित राहिलेल्या या भागात विकासकामे पूर्ण करीत या भागातील नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर अधिक भर दिला.गत पाच वर्षापूर्वी या भागातील नागरिक विकासाच्या संदर्भात जी खंत व्यक्त करीत होती ती खंत विकासाच्या माध्यमातून या पाच वर्षांत दूर केली असून आता माझ्यासोबत माजीमंत्री बसवराज पाटील व कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल असून या ट्रिपल इंजिनमुळे या भागातील विकासाला आणखी गती मिळणार आहेत.मला जनता पुन्हा आशिर्वाद देईल असा विश्वास व्यक्त करीत कासारसिरसी च्या विकासासाठी अनेक शासकीय कार्यालये उभारले जात असून येणाऱ्या दोन वर्षांच्या काळात कासारसिरसी येथे महात्मा बसवेश्वर यांचा भव्य पुतळा उभारला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

